


• मराठी मासिक पत्र •

ः लं : जून....१९६१ : अंक १ ल

भिराष्ट्रेण वर्धताम् —



## नवा जीवनमार्ग

मति कुंठित करून टाकील असा आमचा हा वर्तमानकाल आहे. भविष्याकडे आमची दृष्टि लागली आहे आणि भूतकालालाहि आम्ही विसरूं शकत नाहीं. भूतभाविष्याच्या रस्सीखेचींत आम्ही सांपडलों आहोंत. हा संघर्ष कसा सोडवायचा आणि आमच्या आधिभौतिक गरजा भागवणारा परंतु त्याबरोबर आमची आध्यात्मिक धारणा कायम राखणारा जीवनमार्ग कसा शोधून काढायचा हाच आमच्यापुढें प्रश्न आहे. कोणतीं नवीं ध्येयें किंवा नव्या जगाला अनुरूप होतील अशा रीतीनें फेरबदल करून कोणतीं जुनीं ध्येयें आम्हांला जनतेपुढें ठेवतां येतील आणि जनतेला कशा रीतीने जागृत आणि कार्यप्रवृत्त करणें आम्हाला शक्य होईल हा प्रश्न आमच्यापुढे आहे.

—पंडित जवाहरलाल नेहरू
'भारत : आज आणि उद्यां'
आझाद स्मारक व्याख्यानमाला—

# माणूस

**मराठी मासिकपत्र**

**वार्षिक वर्गणी रुपये पांच फक्त**

प्रिय माजगांवकर—

माणुसची कल्पना तुम्हीं मला सांगितलीत नि परिचय-पत्रकहि दिलेंत. तुम्हीं ध्येयवादी नि जिद्दीचे आहांत हें मला माहीत आहे. तुमचे व्यावसायिक प्रयत्नहि त्या ध्येयानें चालू आहेत. 'माणूस' हा त्यांपैकींच एक प्रयत्न. तुमची कल्पना व संकल्प उत्तम आहे. साहित्य, विज्ञान, वाणिज्य, संस्कृति या सर्वांचा समावेश या मासिकांत करण्याचें योजिलें आहे. पण या बाबतींत डोळसपणानें व स्पष्टपणें लिहिणारे जाणकार मिळणें हें काम खडतर आहे. मासिकें चालविण्याचा मला फारसा अनुभव नाहीं. पण तो व्यवसाय स्लो सायकलिंग शर्यती-सारखा आहे असें मला वाटतें. सुरवातीच्या काळांत स्पर्धकांच्या पायांत अडखळून पडण्याची भीति असते. तो अडथळा दूर करून पुढें गेल्यावर यश निश्चित आहे. आपलें हें मासिक पुरोगामी व यशस्वी व्हावें असें इच्छितों.

— अ. ह. लिमये

प्रिय श्री अनंतराव,

स. न. वि. वि. आपलें पत्र मिळालें. मी सुरू करीत असलेल्या मासिक-व्यवसायांतील धोक्याचे तांबडे कंदील आपण प्रथमच मला दाखविलेत याबद्दल खरोखरच आपले आभार मानावयास हवेत. परंतु कां कुणास ठाऊक, मला या तांबड्या कंदिलांची भीति फारशी वाटत नाही. कारण हा कालच अशा प्रकारच्या प्रयत्नाला अनुकूल आहे अशी ग्वाही माझें मन मला आंतून देत आहे. असं नसतं तर अपुरें द्रव्य व मनुष्यबळाचा तुटवडा या अडचणी असतांनाहि मी हा धोका पत्करण्यास कां तयार झालों असतों!

पहा आज खेड्यांतून शिक्षणाचा प्रसार किती झपाट्याने होत आहे! जवळजवळ प्रत्येक गांवाला एक शाळा आहे. तालुक्यांच्या गांवातूनहि आता कॉलेजें निघूं लागलीं आहेत. शहरांतहि शिक्षणाचा ओघ आता नव्या दिशेकडे वळत आहे. वाङ्मयादि शास्त्रांपेक्षा शास्त्र-विषयक अभ्यासावर विशेष भर दिला जात आहे. खेड्यांतून पुढे येणारा नवा सुशिक्षित समाज व शहरांत यंत्रतंत्राच्या अभ्यासाकडे वळलेला पांढरपेशा वर्ग, यांचा परस्परसहयोग हें महाराष्ट्राच्या पुढील दहा वर्षांतील प्रमुख समाजस्थित्यंतर आहे असें मला वाटतें. यामुळे शहरें व खेडीं हा आजचा कृत्रिम भेद तर नाहीसा होईलच; परंतु ज्या सामाजिक एकात्मतेची आपल्याला आज नितांत गरज आहे तिचा मार्गहि बराचसा मोकळा होईल असा विश्वास वाटतो.

या दोन्ही ठिकाणच्या समाजांच्या कार्यप्रेरणा यापुढे एकाच दिशेने वाहू लागतील हें या सहयोगाचें मुख्य कारण आहे. यापूर्वीं अशी परिस्थिति नव्हती. शहरांतील पांढरपेशा वर्ग हा स्वातंत्र्यवादी चळवळी-मुळे संघर्षप्रधान व ध्येयवादी मनोवृत्तींने भारलेला होता; उलट खेड्यापाड्यांत या ध्येयवादाचा व्यापक फैलाव न झाल्याने हा सर्व बहुसंख्य समाज जुन्या व्यावसायिक भूमिकेवरूनच जीवनाचे सर्व व्यवहार करीत होता. शिवाय दोन्ही समाजांत शिक्षणामुळे अंतर पडलेलें होतेंच.

[ पान ४३ वर चालू



# तुफान

**ब. मो. पुरंदरे**

फार फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट ! अरबस्तानच्या दर्याकिनाऱ्यावरून खूप दूरच्या सफरीवर जाण्यासाठीं अगदीं तयारींत तें जहाज उभं होतं. निघण्यापूर्वींचीं कामंधामं उरकण्याकरितां जहाजावरच्या गुलामांची धांदल चालू होती. त्या धांवपळींत नाजूक हास्याची खळखळ मिसळत होती अन् अधूनमधून लाडिक शब्दांची सांडलवंडहि चालू होती. कित्येक अरबी, इराणी दासी त्या कामाधामांत झुलत होत्या.

बंदर बाजारानं गजबजलं होतं. अरबी झगे घातलेले गोरेपान सौदागर धंद्यांत चूर होते. काळेकुट्ट हबशी गुलाम ओझ्याखालीं वाकत होते. बुरखे घेतलेल्या खानदानी स्त्रिया क्वचित् हिंडतां-फिरतांना दिसत होत्या. सुरयांतून उंची शराब विकणाऱ्या युवती बाजार खुलवीत होत्या. गुलामांच्या भक्कम खांद्यावर नालख्यांत किंवा तागझामांत बसून बडेबडे सौदागर हिंडत होते. एखादी मलिका किंवा बेगम उंटावरच्या डेरेदार मेहमीलमधून चढतां उतरतांना दिसत होती. फकीर हिंडत होते. सुंदर साक्या खिदमतींत मश्गुल होत्या. खजुरीच्या दहावीस झाडांच्या सावलींत एखादी मैफल रंगलेली दिसत होती. रंगेल अरबांच्या त्या कोंडाळ्यांत एखादी माशुक मैना बेभान नाचत होती. अंवतीभंवतीं वाळू रणरणत होती. चार हडकुळ्या पायांवर आपला वेडावांकडा देह सांभाळीत जागोजागीं उंट उभे होते.

हा एका अरबी बंदरावरचा बाजार होता. इथं सगळं कांहीं होतं. अन् इथेंच एक पांढरी शुभ्र भव्य मशीद उभी होती. तिचे चारी मिनार जमिनींतून अचानक सुटलेल्या दारूच्या बाणांसारखे अस्मानांत घुसले होते. मशिदीचा घुमट टोलेजंग आणि तितकाच डौलदारहि होता. त्याच्यावरच्या उंचच उंच कळसावर सोन्याचा अर्धा चांद आणि चांदणी लखलखत होती. मशीद उंच चौथऱ्यावर होती. चौथऱ्याला असंख्य पायऱ्या आणि वर प्रचंड कमानदार दरवाजा होता.

जहाजावरील लोकांची धांदल, गडबड चालूच होती. अन् त्याचवेळीं प्रत्येकाची धाकानें दबलेली नजर सारखी टवकारली जात होती. मशिदीच्या त्याच दरवाजाकडे आतां एकदम सर्वांची धांदल वाढली. दबल्या आवाजांत कांहींतरी पुटपुटत जो तो भराभरा हलूं लागला. गुलाम स्त्रियांनीं तोंडावरचे जाळीदार बुरखे सांवरले. जो तो अदबीनें जागजागीं मान खालीं लववून उभा राहिला. पण त्यांच्या नजरा मात्र चोरून जात होत्या त्या मशिदीच्या दरवाजाकडे. सुकाणूवर असलेल्या खलाशाचं मात्र लक्ष फेंसाळलेल्या दर्याकडे तल्लीनतेनं लागलं होतं. एवढ्यांत दुसरा एक खलाशी घाईघाईनें त्याच्या मागून आला आणि त्यानें सुकाणूवाल्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याच्या कानांत कांहींतरी पुटपुटत एकदम त्या मशिदीच्या दरवाजाकडे आपल्या डाव्या हाताचं बोट टंवकारलं. सुकाणूवाला दचकून भानावर आला. त्याची नजर त्या दरवाजाकडे फेंकली गेली. तो झटकन् उभा राहिला; आणि अगदी नकळत लवलेल्या मानेनें कुर्निसात करीत त्याचा उजवा हात झुलत राहिला.

त्या भव्य मशिदींतून दोन दमदार पावलें अरबस्तानी चढावांचा करकर आवाज करीत पायऱ्या उतरत होतीं. वर घोळदार लेहंगा झगमगत होता. त्यावर भरजरी अंगरखा चकमकत होता. त्यावरून अरबी झगा अंगाभोंवती घुटमळत होता. रेशमी काळे गोंड लोंबत होते. बोटांवर टपोऱ्या हिऱ्यांच्या आंगठ्या चमचमत होत्या. त्या भरदार मानेभोंवती मोत्यांचे कंठे रुळत होते. ती काळीभोर टोंकदार दाढी त्या भव्य गोऱ्यापान चेहऱ्याचा रुबाब वाढवीत होती; अन् त्या विशाल कपाळाखालच्या टपोऱ्या, करड्या डोळ्यांत दरारा तरळत होता. कमरेला समशेर लटकत होती. अन् प्रत्येक पावलागणिक जणूं एकेक पायरी जमिनींत दबत होती. चढाव कर्र कर्र वाजत होते. अखेरच्या पायरीवर ते चढाव थांबले. किंचित् माघारी वळले. ती भरदार गर्दन आणि छाती आदरानें लवली. अर्धा क्षण गेला आणि वार्धक्यानें सुरकुतलेला एक थरथरता हात त्या लवलेल्या मस्तकावरून फिरला.

" सय्यद अझीज, फिक्र मत कर बेटा ! तेरी कामयाबी हासिल हो जायगी ! "

पायऱ्या उतरून मागोमाग आलेल्या एका वृद्ध मौलवीनें दुवा देत आपल्या डाव्या हातांतील एक नक्षीदार छोटी चंदनी संदूक सय्यद अझीजच्या हातांत दिली. अझीजनें अदबीनें तिचें झांकण उघडलें. आंत होती पवित्र कुराणाची एक प्रत. अझीजला मौलवींच्या त्या देणगीनें अत्यंत आनंद झाला. तो भारावलेल्या मनानें संदूक हृदयाशीं धरीत उद्गारला,

" हजरतका जर्रानवाजीका शुक्रिया ! "

मशिदीच्या पायरीखालीं अझीजचीं बायका-मुलें, नातलग आणि अनेक इष्टमित्र उभे होते. पोरांची किलबिल आणि स्त्रियांची कुजबुज चालली होती. ते सारे अझीजला निरोप द्यायला आले होते. तो आज खूप दूरदूरच्या सफरीवर निघत होता. लगेच तो त्या आप्तेष्टांसह हंसत, बोलत, आणि थट्टा-विनोद करीत जहाजाकडे चालूं लागला. दहावीस पावलें गेल्यावर त्यानें पुन्हां मार्गे वळून पाहिलें. पायरीवर उभ्या असलेल्या मौलवीनें हातांतली माळ उंचावीत म्हटलें,

" खुदा हाफिज ! खुदा हाफिज ! "

निरोपाचा अखेरचा सलाम करून अझीज सर्वांसह बंदराकडे पुन्हा चालूं लागला. वाटेनें बाजारांतील अनेक लहानमोठ्यांचे सलाम आणि दुवे घेत घेत तो चालला होता.

जहाज जय्यत तयार होतं. अझीज नजीक येतांक्षणींच जहाजावरच्या दोन हबश्यांनीं गालिचाची एक वळकटी वरून सर्रकन् जिन्यावर सोडली. गालिचा लाटेसारखा उलगडत थेट जमिनीपर्यंत येऊन पोहोंचला. आपल्या लहानग्या मुलांचीं चुंबनें आणि इतर सर्वांचा निरोप घेऊन आपला अरबी झगा सांवरीत सांवरीत अझीज जहाजाचा जिना चढूं लागला. त्याच्या एका हातांत कुराणाची चंदनी संदूक होती. जहाजावरचे खलाशी आणि गुलाम अदबीनें कुर्निसात करीत उभे राहिले. सय्यद वर पोहोंचला. तावडतोब खलाश्यांच्या इशारतीच्या आरोळ्या सुरू झाल्या. पाण्यांतून नांगर वर गेला. खलाशी सरसर डोलकाठीवर चढले. बांधलेलीं शिडें मोकळीं होऊन फुगूं लागलीं. गालिचा गुंडाळला गेला. जिना वर खेंचला गेला. सुकाणूं फिरूं लागलें. जहाज डोलूं लागलें. किनाऱ्यावरचे लोक हात उंचावीत ओरडत होते, ' खुदा हाफिज, खुदा हाफिज ! ' अझीज तसाच त्यांचा निरोप घेत होता. ' शुक्रिया, शुक्रिया ! '

जहाजानें किनारा सोडला. अझीजची नजर आपल्या बायका–मुलांवर, मायभूमीवर आणि मिनारदार मशिदीवर भिरभिरत होती. पाण्याची पाठ चळचळां कांपीत जहाज झपाट्यानें किनाऱ्यापासून दुरावत होतं. किनाऱ्यावरील माणसें, उंट, बाजार, घेंरदारें सारं सारं लहान होत चाललं. अस्पष्ट होऊं लागलं. अजूनहि स्पष्ट ठसठशीत दिसत होती फक्त ती मशीद अन् ते मिनार !

अझीज व्यापारासाठीं खूप दूरच्या सफरीवर निघाला होता....इराण....अफगाणिस्थान ...हिंदुस्थान ! अझीजची महत्त्वाकांक्षाच जबर. खजूर विकतां विकतां त्याच्या महत्त्वाकांक्षेनें उंटावर उडी मारली होती. उंटावरून तिनें गलबतावर झेंप घेतली होती. अन् गलबतावरून ती एका भल्यामोठ्या जहाजावर चढली होती. कांहीं वर्षांपूर्वीचा खजूरविक्या फेरीवाला अझीज आज एक बडा दर्यावर्दी सौदागर बनला होता. यश हात धुऊन मागं लागलं होतं. तो केवळ सौदागरच राहिला नव्हता, तर दर्यावर्दी लढाऊ सारंगसुद्धां ! लुटारू चांचेगिरांशीं, कारस्थानी प्रतिस्पर्ध्यांशीं आणि दर्यावरच्या लहरी निसर्गाशीं झुंजून सतत तो विजयी होत आला होता.

त्याचं जहाज दर्यावर केवळ वाऱ्याच्या जोरावर सुसाट धांवत नव्हतं. त्याच्या शिडांत वाऱ्याइतकीच त्याच्या जबरदस्त आत्मविश्वासाची व महत्त्वाकांक्षेची फुंकर पडत होती. अझीजचा दरारा भयंकर होता. पण तितकाच त्याचा स्वभाव प्रेमळहि होता. तो लोभी व्यापारी नव्हता, तो निर्दय मालक नव्हता. तो होता दिलदार सरदार.

प्रवास दूरचा होता. जहाज इराणच्या दिशेनं चाललं होतं. दिवस आणि रात्री उलटत होत्या. आणि एके दिवशीं जहाज इराणी बंदराला लागलं. गालिचा सर्रकन् जिन्यावरून घरंगळला. त्यावरून नेहमींच्या रुबाबांत पावलें टाकीत अझीज बंदरावर उतरला. मालाची देवघेव सुरू झाली. आणि भरगच्च पैसा अन् नवीन माल मिळवून एके दिवशीं अझीजनें आपलें जहाज पुढच्या सफरीस हांकारलें. अफगाणिस्थान !

तीहि सफर तुडुंब नफा पदरीं पाडून अझीजनें फत्ते केली. आणि त्यानें अफगाण किनारा सोडला. त्याचें जहाज पूर्वेच्या रोखानें धावूं लागलें. हिंदुस्थान ! हिंदुस्थान !

अंतर अफाट होतं. वाऱ्याची मर्जी सांभाळीत पुढं जावं लागत होतं. अझीजनें हिंदुस्थानची भूमि अजून पाहिलेली नव्हती. तिच्याबद्दल खूप खूप ऐकलं मात्र होतं. तिथलं अपार वैभव, प्रचंड बाजारपेठा, कलाकौशल्य, तिथलं दिलदार आगतस्वागत तिथलीं भोळसट माणसं, बळकट गुलाम, सुंदर बायका, सुंदर मोर, हिरे, मोतीं ! आणिकहि कित्येक गोष्टींबद्दल त्यानं ऐकलं होतं. अझीजला तीं वर्णनें ऐकून मोठी मजा आणि कुतुहल वाटत होतं. त्याच्या डोळ्यांपुढें अनेक रम्य चित्रें तरळत होतीं. त्याचं मन हिंदुस्थानच्या किनाऱ्याकडे अतिशय उत्सुकतेनं दौडत होतं. पण हिंदुस्थानबद्दल आणखी कांहीं गोष्टी ऐकून त्याच्या कपाळावर नाराजीची आठी उमटत होती. तिरस्काराची तिडीक त्याच्या मनांत उठत होती. त्या गोष्टी त्याच्या कानाला कडू कडू ठस्स लागत होत्या. कोणत्या त्या गोष्टी ?

—हिंदुस्थानांतले लोक दगडाच्या मूर्तींची देव समजून पूजा करतात ! तेथील सर्व लोक असेच मूर्तिपूजक आहेत ! हिंदु ! काफर ! तिथं राज्य आणि राजे त्यांचेच आहेत. दगडाधोंड्यांची पूजा करणारे काफर ! गायीला, झाडाझुडपांना आणि वाटेल त्याला देव मानणारे काफर ! ह्यांचे सगळेच आचार आणि विचार इस्लामच्या शिकवणुकींत न बसणारे !

बस्स् ! अझीजच्या अस्सल अरबी इस्लामी मनाला तें तेवढं अजिबात रुचत नव्हतं. त्याला वाटत होतं, तागडी घेऊन व्यापारासाठीं या काफिरी देशांत जाण्याऐवजीं घोडेस्वारांची प्रचंड फौज आणि इस्लामचा झेंडा घेऊन आपण तिथं जावं ! बुत्‌शिकन् व्हावं ! मूर्तिभंजक गाझी व्हावं ! अन् असे विचार त्याच्या मनांत नाचूं लागले कीं, त्याची दिलदारी अन् सरदारी पार पार लोपून जात असे. त्याच्या मनाचा रंग आणि गंध पालटून जाई. तुफानांत खवळणाऱ्या समुद्रासारखं तें क्षुब्ध अन् निर्दय बनें. तेंहि अगदी नकळत. त्याच्या स्वतःच्या नकळंत !

पण अझीजच्या मनांत स्वारीची कितीहि स्वप्नें तरळत असलीं तरी, तीं अशक्य होतीं. जायचंच असेल तर आज तरी केवळ तागडी घेऊनच हिंदुस्थानांत जाणं त्याला भाग होतं. नवी बाजारपेठ जोडायची महत्त्वाकांक्षा, नव्या सफरीचा आनंद, नव्या अनुभवांची हाव; पण कपाळावर आठी आणि मनांत तिरस्कार घेऊनच तो हिंदुस्थानच्या दिशेनं वाऱ्याचं बोट धरून चालला होता.

जहाजावरचे त्याचे खलाशी अनुभवी, तर्बेज होते. बरोबर अन्नपाणी भरपूर होतें. हिंदी भाषा जाणणारा एक दुभाषाहि सांगाती होता.


पोरवालनें



दांत शुभ्र व मजबूत होतात



मुख दुर्गंधी नाहिंशी होते



श्वास आल्हाददायक होतो

पोरवाल
काळी टूथ पावडर

पोरवाल आणि कंपनी पुणें २

प्रतिमा


प्रवासांत एक एक दिवस आणि रात्र उलटत होती. पौर्णिमा उलटून गेली होती. प्रत्येक रात्र वाढत्या प्रमाणांत काजळ धरीत होती. प्रवासानें जहाजावरचीं माणसं आंबत चाललीं होतीं. वर अस्मान, खाली पाणी, रखरखीत दिवस, काळीकुट्ट रात्र आणि भंवतीं तींच तींच माणसं !

आणि एक रात्र उगवली. पौर्णिमेची. जहाजावरती आरमारी टांगते कंदिल मिणमिणत झुलूं लागले. कुणीं मिणमिणत्या उजेडांत खडे मांडून हारजितीचा डाव सुरू केला. कुणी आळसावलें होतें. मात्र खलाशी आपआपल्या कामावर हुशारीनें उभे होते. सुकाणू फिरत होतें. आपल्या खास कमऱ्यांत अझीज पलंगावर पहुडला होता. एक गुलाम स्त्री हुक्का फुलवीत होती. दुसरी स्त्री कोणा अरबी कवीचें विरहगीत आळवीत होती. तो ऐकत होता. गीताची आर्तता वाढत होती.

अन् अचानक जहाजाची गति वाढूं लागली. खलाश्यांनीं चमकून वर पाहिलें. आभाळांत काळे ढग भराभर जमा होत होते. खालीं दर्या थिथरूं लागला होता. खलाश्यांची आपसांत कुजबुज सुरू झाली. जहाज जोरानें हेलकावे खाऊं लागलें.लाटा त्यावर आपटूं लागल्या. खलाश्यांची धांवपळ सुरू झाली.

नक्षीदार मेजावरची सुरई आपोआप कलंडून खण्कन् खाली पडली. आणि अझीज एकदम भानावर आला. तो झट्कन् उठला. विरहिणीचे सूर बंद पडले. जहाज मनस्वी डोलूं लागलें होतें. अझीज झपझप बाहेर आला. हां हां म्हणतां दर्यावर राक्षसी तुफान उसळत होतें. जहाजाला इशारे देण्याकरतां सरतांडेल आरोळ्या देत होता,

“ तूफाऽऽन, तूफाऽऽन ! ”

अझीज सुकाणूकडे धांवत सुटला. सरतांडेलानें त्या धांदलींतच धांवत येऊन कुर्निसात करीत अझीजला म्हटलें,

“ मालिक, तूफान आ गया ! गजबका तूफान ! ”

अझीजनें वर पाहिलें. काळ्या ढगांची प्रचंड फौज धुमसत-उसळत अस्मान जिंकीत होती.लाटांच्या धिंगाणा सुरू झाला होता.एकदा या बाजूला, तर लगेच त्या बाजूला जहाज कलंडत होतें. टांगलेले आरमारी कंदील जोरजोरांत हेलकावत होते. शिडें टरारा फाटत होतीं. शिडें गुंडाळण्याकरितां खलाशी डोलकाठ्यांवर चढले होते. पण सगळीं शिडें गुंडाळायच्या आंतच हां हां म्हणतां झंझावातानें राक्षसी रूप धारण केलें होतें. शिडें गुंडाळण्याची धडपड ते धाडसी खलाशी डोलकाठीवर तीस-तीस हात वर चढून शिकस्तीनें करीत होते. तेवढ्यांत जहाज एका अंगावर अतिशय कललें. आणि वर चढलेला एक खलाशी तेथून निसटलाच ! ‘ पडला ! पडला ! ’ भयंकर किंकाळी उठली ! अर्ध्या क्षणांत त्या क्षुब्ध समुद्रांत तो गडप झाला ! गेला, खलास ! फाटकीं शिडें झेंड्यासारखीं अविरत फडफडत होतीं. भयंकर सैतानी तुफान !

विजा कडाडूं लागल्या. वारा इतका भडकला कीं, कोणत्या क्षणीं जहाजाला तो लाटांच्या राक्षसी जबड्यांत लोटील त्याचा नेम नव्हता. जहाजावरचें एक छप्पर आणि कांहीं हलकें सामानसुमान वाऱ्यानें पतंगासारखें उडून गेलें. अझीजनें आजवर कित्येक तुफानें पाहिलीं होतीं. पण हें असलें तुफान त्यानें....त्यानेंच काय, पण कोणाच खलाशानें पाहिलें नव्हतें. दर्यांतला सैतान जागा झाला होता. विजा चमकत होत्या. वर तुफान, खाली तुफान. दाही दिशांना तुफान उठलं होतं. प्रत्येक क्षण भीषण होता. सुकाणूवाल्याची केविलवाणी धडपड चालू होती. अझीज त्याच्या पाठीवर हात ठेवून मागें उभा होता. आशा, केवळ आशा. वादळाचा जोर कमी होईल...पण तो वाढतच होता. मृत्यु आपले हजार जबडे आणि पंजे विस्फारीत त्या प्रचंड लाटांच्या रूपानं जहाजावर चालून येत होता. जहाजाची मृत्यूशीं शिवाशिवी चालली होती. एका मागोमाग एक प्रचंड लाटा रोंरावत येत आणि जहाजाला धुसंडी देत. जहाज एकदम उंच उंच गेल्याची अन् लगेच सर्कन् खालीं घसरल्याची जाणीव प्रत्येकाला होई. अंगावर शहारे उठत. बायकांच्या किंकाळ्या उठत. पाण्याचे तडाखे अंगावर चाबकासारखे बसत. वीज चमकली कीं, क्षणांत तो भीषण धुमाकूळ दिसे आणि लगेच कभिन्न अंधार ! पौर्णिमेचा चंद्र काळ्या ढगांत लुप्त झाला होता. अन् तेवढ्यांत धों धों पावसाला सुरुवात झाली.सर्व दिवे विझून गेले. जगण्याची आशाच संपली. दाही दिशांना सर्वांचे डोळे भिरभिरत. विजा-वारा-लाटा आणि ढग अगदीं भयंकर भुकेलेल्या हजारों वाघांसारखे वखवखले होते.

अन् त्यांना खाण्यासाठीं घांस होता फक्त एका जहाजाचा! कारुण्य आणि भीषणता शिगेला पोंहचली होती. वाढतच होती. अझीजच्या काळजांत त्याहून तुफान उसळलं होतं. त्याचं काळीज पिळवटून निघत होतं. केवळ माझ्यामुळें हे सगळे जीव फुका मरणार! जगाला कळणारसुद्धां नाहीं!

पाऊस वाऱ्यावर उडत होता. कोणत्यातरी क्षणीं आपण एकदम समुद्राच्या तळाशीं जाणार या खात्रीनें जो तो व्याकुळ झाला होता. अझीज मुक्या मनानं खुदाला आळवीत होता. पावसानें तो थबथबला होता. मरण स्पष्ट दिसत होतं. तेवढ्यांत तो एकदम तेथून निघाला. विजेच्या उजेडांत त्याची ओलीचिंब आकृति उजळून निघत होती. तो चांचपडत चांचपडत आपल्या खोलींत आला. त्यानें ती कुराणाची संदूक घेतली. आणि तो पुन्हां सुकाणूपाशीं आला. जहाजाच्या हेलकाव्यानें त्याच्या झुकांड्या जात होत्या. त्यानें ती संदूक आपल्या हृदयाशीं घट्ट धरली. आणि अस्मानाकडे पाहत तो आर्त शब्दांत म्हणाला,

"हे खुदा, तूंच वांचव आम्हांला—आम्ही हतबल आहोंत! आमच्या हातून जर कांहीं गुन्हे झाले असतील तर माफ कर. इस्लामच्या सेवेसाठीं आम्हाला वांचव!"

आणि त्यानें डोळे मिटले. कितीतरी वेळ तो तसाच उभा होता. तेवढ्यांत जहाज कितीदां तरी कलंडलं आणि सांवरलं गेलं. तेवढ्यांत एक खलाशी एकदम ओरडून अझीजला म्हणाला,

"मालीऽक! तें पाहा, तें पाहा!"

खलाशानें समोर क्षितिजाकडे बोट रोखलें होतें. अझीजनें अधाशी नजरेनें तिकडे पाहिलें. सर्वांच्याच नजरा क्षितिजावर खिळल्या. अन् अझीज एकदम मोठ्यानें ओरडला, "दिवाऽऽ दिवाऽऽ! तेथें नक्की—नक्की किनारा असला पाहिजे! दिवा! किनारा! इन्शाल्ला!"

अझीज आनंदानें मोठ्यानें हंसला. खरोखरच दूर क्षितिजावर तांबूस-पिवळ्या ज्योतीचा ठिपका लुकलुकतांना दिसत होता. जहाजावर क्षणांत आनंदाची लाट उसळली. सारेचजण एकमेकांना तो आशेचा किरण दाखवीत टाळ्या वाजवूं लागले. अल्लानें प्रकाश दाखविला! किनारा दाखविला! अझीजनें सुकाणूवाल्याला त्याची पाठ थोपटीत म्हटलं,

"तिकडे हाकार! त्या दिव्याकडे! किनाऱ्याकडे! जल्दी—जल्दी!"

सुकाणू फिरलें, जहाजानें दिव्याची दिशा धरली. कुराणाची संदूक हृदयाशीं घट्ट घट्ट धरीत अझीज गहिंवरला आणि गदगदून मोठ्यानें म्हणाला,

"हे खुदा, ती ज्योत जिथं जळत असेल त्या स्थळाचा उद्धार, उत्कर्ष मी करीन! मी तुला वचन देतों! तेथें कांहींहि असो; गरिबाची झोपडी असो, कुणाचें घर असो, धर्मशाळा असो कीं मैदान असो! मी त्या स्थळीं उत्कृष्ट, भव्य, सुंदर सायसंगीन बांधकाम करीन! हे खुदा, तूंच मला तो प्रकाश दाखविलास! मी तुला वचन देतों!"

तुफान अजून थैमान घालीतच होतं. फक्त पाऊस अचानक बंद झाला होता. ज्योत खूप दूर होती. जहाजावर पुनर्जन्माचा आनंद थयथयत होता. अंधार दाट होता. झोकांड्या खात जहाज चाललें होतें. विजेच्या उजेडांत लांबवर किनाऱ्याच्या खुणा चमकून जात होत्या. ज्योत जसजशी जवळ येत होती तसतशा जहाजावर आनंदाच्या आरोळ्या वाढत होत्या. आणि अखेर जहाज किनाऱ्याशीं वाळूंत येऊन आपोआप थबकलं. आनंदाच्या भरांत अनेक खलाशांनीं व गुलामांनीं पाण्यांत उड्या घेतल्या. खुद्द अझीजनेंहि उडी घेतली. भराभर पोहत तो तीरावर आला. खडकाळ उंचवट्यावर हातभर उंचीची ज्वाला वाऱ्यावर फुरफुरतांना दिसत होती. दोन्ही हात उंच करीत अझीज आनंदानें ओरडत त्या ज्वालेकडे धांवत गेला-पोहोचला-थांबला आणि-आणि....त्याचं हसणं-ओरडणं एकदम थांबलं! तो डोळे विस्फारून पाहत राहिला. त्याची छाती खालीं-वर होत होती. तो निरखून खालीं पाहत होता. अन् अन् त्याची खात्रीच पटली. त्यानें धाडकन् आपली मूठ कपाळावर मारून घेतली!

"या खुदा, यह मैंने क्या किया!"

विलक्षण दुःखानें त्याचें मस्तक गदागदा हलूं लागलें. मागून धांवत आलेले खलाशी, गुलाम चमकून थबकलेच. जो तो चिडीचिप्प झाला. ज्वाला फुरफुरत होती. तिच्या उजेडांत जवळच उघड्यावर महादेवाची एक पिंडी सुगंधी फुलांच्या अन् बिल्वपत्रांच्या संभारांत चमकत होती. ती त्रिपुरी पौर्णिमेची रात्र होती. कुणीतरी त्या शिवलिंगाची यथासांग पूजा करून मोठा थोरला त्रिपूर पेटविला होता. जवळपास इतर देवतांच्याहि मूर्ति पूजिलेल्या दिसत होत्या. दगडांच्या मूर्ति आणि त्यांची ती पूजा पाहून अझीजचं मन क्षुण्ण झालं. मूर्तिपूजा! इस्लामला मंजूर नाहीं! आणि आपण हें काय बोललों! 'ह्या दिव्याच्या स्थळीं जें कांहीं असेल त्याचा उत्कर्ष करीन! तें सायसंगीन उत्तुंग बांधून काढीन!' मूर्तीसाठीं बांधकाम? गुन्हा आहे, इस्लामचा हा द्रोह आहे! पाप! आपण काय बोलून गेलों हें?

अझीज अगदी शून्य व सुन्न नजरेनें पाहत उभा राहिला. त्याची मुद्रा कमालीची गंभीर झाली. तो पश्चात्तापानें करपळत होता. यापेक्षां जहाज बुडालं असतं तर किती उत्तम झालं असतं असं त्याला वाटलं. आतां काय करणार? मूर्तीसाठीं मंदिर बांधणार! कीं शब्द मोडून निघून जाणार? ह्यातलं कांहींहि करणं सच्चा मुसलमानाला शोभत नाहीं. तो सुन्न होऊन दगडाच्या मूर्तीसारखा निश्चल उभा होता. विजा कडाडत होत्या. वारा रोंरावत होता. अन् सड् सड् सड् सड् पावसाला सुरुवात झाली. धों धों पाउस! त्रिपूर विझून गेला. तें शिवलिंग आणि अझीज न्हाऊन निघत होते. तो तसा उभा होता. खलाशी आणि गुलाम कुडकुडत एका झाडाखालीं निमूट उभे होते. तास—दोन तास—सकाळपर्यंत! तसेच! पाऊस केव्हांच थांबला होता.

अझीजच्या डोक्यांत युद्ध चाललं होतं. "मूर्तीसाठीं मंदिर बांधणार? इस्लामशीं द्रोह?" एक मन विचारीत होतं. दुसरं मन म्हणत होतं, "कुराण शरीफ हृदयाशीं धरून खुदाला वचन दिलंस, मोडणार तें?" अवघी रात्र ह्या घनघोर युद्धांत गेली होती. निकाल लागलाच नव्हता!

आणि सकाळीं त्यानें आपल्या दुभाष्याला हांक मारली—जवळच नारळीच्या झाडींत गांव वसलेलं दिसत होतं. दुभाष्याला घेऊन तो गंभीरपणें संथ पावलें टाकीत त्या गांवांत गेला. कुतूहलानं सारं गांव त्याच्या भोंवतीं गोळा झालं. अझीजनें आपल्या दुभाष्यामार्फत गांवकऱ्यांना आपला संकल्प सांगितला.

"किनाऱ्यावरच्या तुमच्या दगडाच्या देवासाठीं इमारत बांधण्याची माझी इच्छा

आहे ! लागेल तो पैसा मी खर्च करतों ! तुम्ही मला बाकीची मदत कराल का ? ''

गांवकरी तर आनंदित झाले. आपल्या गांवच्या उघड्या पडलेल्या महादेवाचं देऊळ बांधून द्यायला आपण होऊन हा माणूस आला देवदूतच ! गांवांत उत्साह फुलला. अझीजचा दुभाषा मात्र थक्क झाला. आपला मालिक हें काय करतोय ?

अझीज अत्यंत गंभीर व अबोल झाला होता. किनाऱ्यावरच त्यानं आपला तंबू ठोकला. आणि फक्त एका गुलामासह तो त्यांत राहूं लागला. लागेल तेवढा पैसा ओतूं लागला. गांवानें बांधकामगार आणले. बांधकामाच्या सामानाचे ढीग पडले. बांधकाम चढत चाललें. खुलत चाललें. समोर मंदिर आकार धरीत होतें. अझीज रोज तंबूत बसून गंभीरपणें कुराण वाचीत होता. त्याच्या खिदमतीस फक्त तो एक गुलाम होता. बाकीचे सर्व जहाजावर होते.

एके दिवशीं मंदिर बांधून पूर्ण झालें. दहा गांव गोळा झाले. ब्राह्मण आले. घंटा घणघणूं लागल्या. नंदादीप उजळले. वेदघोषांत श्रीची महापूजा झाली. लोक आनंदले, अझीजला भरल्या हृदयानें ते धन्यवाद देऊं लागले. अझीज गंभीरच होता. मंदिरावर कळस चढला. अझीजचा संकल्प पुरा झाला !

आणि दिवस मावळला. यात्रा ओसरली. रात्र झाली. जहाजावरचीं माणसं झोपीं गेलीं. आतां एक दोन दिवसांतच तें जहाज स्वदेशास परतणार हें ठरल्यासारखंच होतं.

मध्यरात्र झाली. वारं फक्त जागं होतं. बाकी सारं सामसूम ! एक व्यक्ति डोळे झांकून बिछान्यावर पडली होती. पण ती जागी होती. कोण ? अझीज ! मध्यरात्र उलटली आणि अझीज अगदी अलगद आपल्या बिछान्यावरून उठला. त्यानें कुराणाची संदूक हळूंच घेतली. तो तंबूच्या बाहेर आला. चांदण्यांत तें उत्तुंग शिवमंदिर सौंदर्यानं विलसत होतं. तो झपझप पावलें टाकीत मंदिराकडे निघाला. सगळीकडे अगदी सामसूम होती. तो मंदिरापाशी आला. त्यानें दुपेट्यांत ती संदूक घालून आपल्या कमरेला बांधली. आणि नक्षीच्या खाचींचा आधार घेत घेत तो मंदिराच्या भिंतीवर चढूं लागला. वर जात जात तो शिखरावर चढूं लागला. तो कळसाकडे चालला होता.

एवढ्यांत त्या भयाण शांततेंत एकदम आरोळी फुटली. '' मा ली ऽऽऽऽ क ! माली ऽ क, थांबा ऽ थांबा ऽऽ ! वर चढूं नका ! माली ऽ क ''

त्या शब्दांचा प्रतिध्वनि उमटला. अझीजचा गुलाम जागा होऊन तंबूतून देवळाकडे पिसाटासारखा ओरडत, दौडत येत होता. मालीक, मालीक— !

अझीज वर वर चालला होता. त्याला जणुं कांहीहि ऐकूंच येत नव्हतं. तो निःशंकपणें वर वर चढत होता. गुलाम ओरडत दौडत होता. प्रतिध्वनि उमटत होते. अझीज अगदी वर जाऊन पोहोचला. त्यानें आपल्या दुपेट्यांतून पवित्र कुराणाची ती संदूक काढली, हातांत घेतली, आणि तो गंभीर आवाजांत म्हणाला,

'' हे परवरदिगार खुदा, मला माफ कर ! मी तुला भयंकर तुफानांत वचन दिलं होतं कीं, प्रकाशाच्या स्थळाचा उद्धार करीन ! माझ्या कमनशिबानं इथं काफरांची मूर्ति होती ! मी हें मंदिर बांधलं ! मी तुला दिलेलं वचन पाळलं. मी सच्चा मुसलमान आहे ! दिलेलं वचन मोडणं हें इस्लामला मंजूर नाहीं ! पण मंदिर बांधणं हेंहि इस्लामला मंजूर नाहीं ! मीं इस्लामचा गुन्हा केला आहे ! भयंकर गुन्हा ! त्या गुन्ह्याबद्दल माझी मीच शिक्षा भोगतों आहे. शिक्षा भोगल्यानंतर मला जवळ घे ! मृत्यूची शिक्षा ! सजा-ए-मौत ! ''

अझीज लगेच पुढे झुकला !

'' नकोऽ नकोऽ ! मालीऽऽ क, थांबाऽऽ मालीऽऽक! इस्लामची कसम आहे तुम्हांला ! '' गुलाम कळवळून हात पसरीत वर पाहत ओरडत होता. अझीज त्याच्याकडे पाहतहि नव्हता.

'' रहिमानुर्रहीम बिस्मिल्ला ऽ ऽ ! इस्लाऽऽऽम झिंदाबाद ! '' आणि अझीजनें धाडकन् खाली उडी टोकली ! पापणी लवली अन् मस्तकाच्या ठिकऱ्या उडाल्या ! मंदिराच्या भिंतीवर रक्ताचे थेंब उडाले !

'' माली ऽऽ क, माली ऽऽ क ! ''

रक्ताच्या थारोळ्यांत अझीज निश्चेष्ट पडला. सजा-ए-मौत ! त्याचे प्राण उडून गेले होते. रडून टाहो फोडीत गुलामानें अझीजला उचललें. त्याचा देह रक्तांत भिजला होता. पवित्र कुराणाची ती चंदनी संदूक अझीजनें अजूनहि हृदयाशीं घट्ट धरून ठेवली होती.




अद्ययावत् घड्याळांचें
दुरुस्ती व विक्रीचें
★ विश्वसनीय केंन्द्र ★
देओरा–वॉच–सर्व्हिसेस्
विजय टॉकीजजवळ, लक्ष्मीपथ, पुणें २.

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥
पुण्यांतील लोकप्रिय रेकॉर्ड लायब्ररी
"फ्रेन्डस् म्युझिक सेंटर"
१५२६ सदाशिव, पेरूगेट रस्ता, पुणें २.
★ रेकॉर्डस् ऐकण्याचें आणि भाड्यानें घरीं देण्याचें एक प्रमुख ठिकाण
★ लाऊडस्पीकर व इलेक्ट्रिकल सर्व्हिस्

# लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयोग

लेखक : निरीक्षक

**महाराष्ट्र सरकारनें लोकशाही विकेंद्रीकरणाचा अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. पण लोकशाही राज्यकारभाराविषयीं कांहीं नवें मूलगामी संशोधन सुरू झालें तरच या अहवालाचें सार्थक झालें असें होईल. तें न झालें तर हा प्रयोग एक एकांगी प्रयत्न ठरण्याचा धोका आहे. राज्यकर्त्यांनीं हा धोका ओळखला आहे काय?**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्वसामान्य जनतेंत 'आपल्या हातीं कांहींच नाहीं' अशी भावना वाढीस लागल्यानें शासकांना आणि सुधारकांना चिंता वाटूं लागली आणि या चिंतेच्या पोटीं जें अनेक प्रकारचें विचारमंथन देशभर सुरू झालें त्यांत लोकशाही विकेन्द्रीकरणाचा विचार प्रमुख होय. प्रथमत: हा विचार विकेन्द्रित शासनव्यवस्थेचें स्वरूप घेऊन पुढें आला; पण त्यांतील अपुरेपणा लक्षांत आल्यानें आतां विकेन्द्रित लोकशाहीचें रूप या विचाराला आलें आहे. महाराष्ट्र सरकारनें नियुक्त केलेल्या 'लोकशाही विकेन्द्रीकरण समिती'नें याच विचाराचा पाठपुरावा करून त्याचें सर्वांगीण स्वरूप लोकांपुढें ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. महाराष्ट्र राज्यांत विकेन्द्रित लोकशाहीचा जो प्रयोग व्हावयाचा आहे तो मुख्यत: याच समितीच्या शिफारशींवर आधारलेला असेल. म्हणून या समितीच्या अहवालाची जेवढी चर्चा विविध पातळींवर होईल तेवढी हवीच आहे. अशा प्रकारच्या चर्चेला पहिलें व्यासपीठ महाराष्ट्र विधिमंडळ हेंच लाभल्यानें या चर्चेला प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. मात्र त्यानंतर यासंबंधांत कोठेंच कांहीं हालचाल दिसत नाही, हें अनिष्ट होय.

### शासनयंत्रणेला जाब विचारण्याची शक्यता

लोकशाही विकेन्द्रीकरण समितीचा अहवाल अभ्यासतांना पहिली महत्त्वाची गोष्ट लक्षांत येते ती ही कीं, जिल्हा हा प्रादेशिक घटक मानून सर्व स्थानिक कारभाराचें एकसूत्रीकरण आणि एकमुखीकरण या समितीला अभिप्रेत आहे. सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीनें याचे फायदे दोन. एक म्हणजे, जिल्हा पातळीवरील सर्व कारभाराची माहिती एकत्र मिळण्याची सोय होईल आणि दुसरा म्हणजे, स्थानिक कामकाजासंबंधांत शासन यंत्रणेकडून होणाऱ्या दिरंगाईचा, दुर्लक्षाचा किंवा दुरुपयोगाचा जाब तत्काळ विचारण्याची शक्यता वाढेल. या दोन फायद्यांमुळें सर्वसामान्य जनतेचे लहानमोठे पुढारी—मग ते कॉंग्रेसचे असोत कीं विरोधी पक्षाचे असोत—या अहवालाचें सर्वसामान्यपणें स्वागतच करीत आहेत. किंबहुना, या अहवालाच्या पुरोगामीपणाविषयीं खात्री पटल्यामुळें विरोधी पक्षांतील खटनट पुढाऱ्यांच्या तोंडूनहि स्तुतींचा वर्षाव सरकार पक्षावर झाला.

त्यामुळेंच कीं काय, महाराष्ट्र विधानसभेंत या अहवालावर झालेल्या चर्चेला उत्तर देतांना मुख्यमंत्री श्री. चव्हाण यांना असें सांगावेंसें वाटलें कीं, "या अहवालावर अनेक प्रकारची टीका झाली.... पण लोकशाही विकेन्द्रीकरणाच्या या योजनेंतील दोषस्थळें कोणतीं हें विरोधी पक्षांतील माणसांपेक्षां मी अधिक चांगल्या रीतीनें सांगूं शकेन."

अर्थात् हे उद्गार काढतांना त्यांना असें म्हणावयाचें होतें कीं, 'या योजनेमुळें नोकरशाहीचेंच राज्य येणार आहे, असा आरोप करणें योग्य नाहीं. नोकरशाहीचें राज्य येणार

ही भीति मला नाहीं. पण इतर कांहीं दोष आहेत आणि ते विरोधी पक्षाला दिसलेले नाहीत.' कारण, विरोधी पक्षांतील आणि खुद्द काँग्रेस पक्षांतील कांहीं जाणकार मंडळींनीं चर्चेच्या ओघांत हाच मुद्दा ( नोकरशाहीचें राज्य येणार ) प्रामुख्यानें उपस्थित केला होता. सारांश हा कीं, या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी झाली तर नोकरशाहीचे हात बळकट होतील कीं लोकशाहीचा पाया स्थिर होईल, असा संभ्रम विचारवंतांत निर्माण झालेला आढळतो. खरें म्हणजे, शासनयंत्रणा ही खंबीरच हवी, आणि 'नोकरशाही' हें जुनें रूप आतां हळूहळू नाहींसें होतें आहे. किंबहुना, ही 'नोकरशाही' चौकट तोडण्याचाच प्रयत्न लोकशाही विकेन्द्रीकरण समितीनें आपल्या अहवालांत केलेला आहे. असें असतांनाहि उपरोक्त स्वरूपाचा संभ्रम निर्माण व्हावयास पुरेसें कारण आहे. **तें हें कीं, स्थानिक पातळीवर लोकशाहीचा व्यवहार सुरळीत चालण्यासाठींच खंबीर शासनाची आवश्यकता आहे, हें अद्याप आमच्या पुरेसें लक्षांत आलेलें नाहीं आणि स्थानिक पातळीवरील खंबीर शासनाचा एकमेव उद्देश लोकशाहीचा व्यवहार खालपासून विकसित करणें हाच असला पाहिजे हें आम्हाला कळलें असलें तरी, तें कृतींत उतरत नाहीं, असा आमचा अनुभव आहे.** कोणाला दोष देण्याच्या हेतूनें नव्हे, पण एकंदर परिस्थितीचा रास्त विचार व्हावा या हेतूनेंच हें विधान केलेलें आहे, हें वाचकांनीं विसरूं नये.

### नोकरशाहीच कायम राहणार ?

ज्या योगानें 'अखेरीस नोकरशाहीचेंच राज्य कायम राहील कीं काय' अशी शंका कोणाहि विचारी माणसांच्या मनांत येईल अशा कांहीं तरतुदी या अहवालांत नमूद आहेत. उदाहरणार्थ, जिल्ह्याच्या क्षेत्रांत कोठेंहि ५ लाख रुपयांच्या आंत भांडवल असलेली सहकारी सोसायटी नोंदण्याचा अधिकार जिल्हा कौन्सिलला दिला आहे. पण त्याचबरोबर पुढें असें म्हटलें आहे कीं, कोणत्याहि नवीन सहकारी संस्थेच्या बायलॉज्‌ना प्रथम रजिस्ट्रारकडून संमति मिळविली पाहिजे ! रजिस्ट्रारनें वाटल्यास 'स्टँडर्ड बायलॉज्' तयार करावे. मग ही पूर्वसंमतीची अट कशासाठीं ? दुसरें उदाहरण शिक्षणखात्याचें देतां येण्याजोगें आहे. माध्यमिक शाळांना द्यावयाचें अनुदान सरकारनें जिल्हा कौन्सिलमार्फत द्यावें, अशी तरतूद करण्यांत आली आहे. या तरतुदीचें स्वरूप असें आहे कीं, जिल्हा कौन्सिलनें कोणत्या शाळेला अनुदान द्यावें यासंबंधीं शिक्षणखात्याच्या संचालकाकडे शिफारस करावी आणि शिक्षणखात्यानें मंजुरी दिल्यावर अनुदानाचें वितरण करावें.

---

अ
जिं
क्य
मा
न
व

## रवीन्द्रनाथ टागोर

" मानवावरील मूळची श्रद्धा सोडून देण्याचें महापाप मी करणार नाहीं. आज ना उद्यां, तुटलेला मानवी वारसा पुन्हां मिळविण्याच्या मार्गातील सर्व अडचणी उल्लंघून अजिंक्य मानव पुन्हां विजयाचा मार्ग आक्रमूं लागेल. "

* * *

" जेथें तूं अत्यंत गरीब, हीन आणि पराभूत अशा व्यक्तींच्या रूपानें वावरत आहेस, तेथें अभिमान ही चीज असणें शक्य नाहीं.

* * *

" चिंतनाच्या समाधींतून बाहेर पड आणि फुलांचा ढीग आणि धुपाचें आवरण दूर सार ! तुझे कपडे मळले, फाटले म्हणून काय बिघडलें ? त्याची भेट घे आणि तो कष्ट करून घाम गाळीत असतांना त्याच्या पाठीशीं उभा रहा. "

---

मात्र ही तरतूद करतांना असें स्पष्टपणें म्हटलें आहे कीं, 'दुय्यम शिक्षण हेंहि स्थानिक संस्थांकडे सोंपविलें जावें.' इतकेंच नव्हे तर असें कां करावें याचें कारण देतांना समितीनें असें स्पष्टपणें लिहून ठेवलें आहे कीं, "शिक्षणखातें हेंच शिक्षणविषयक धोरणाची जबाबदारी वाहणार असल्यानें आणि अनुदान पद्धतीच्या द्वारें नियंत्रणहि ठेवणार असल्यानें आम्हांला असें वाटतें कीं, दुय्यम शिक्षणाचा विषयहि स्थानिक संस्थेकडे सोपविणें इष्ट ठरेल." धोरण आणि नियंत्रण हीं दोन्हीं कामें शिक्षणखात्याकडे राहिल्यानंतर 'स्थानिक संस्थेकडे दुय्यम शिक्षण सोंपविणें इष्ट ठरेल' असें म्हणण्यांत समितीला कोणता अर्थ अभिप्रेत आहे ? यासंबंधांत आणखी अशी एक शंका येते कीं, खात्याच्या प्रमुखांना समितीनें विकेन्द्रीकरणासंबंधांत आपापली योजना सादर करावयास सांगितली असावी आणि समितीनें आपल्या मनांतील हेतु स्पष्टपणें त्यांना कळविला असावा. याचा परिणाम असा झाला असेल कीं,

> तत्त्वतः समितीच्या हेतूंशीं जुळणारी पण व्यवहारतः खात्याची सत्ता कमी होणार नाहीं अशी व्यवस्था विकेन्द्रीकरणाच्या नांवाखालीं खातेप्रमुखांनीं समितीला

सुचविली असावी. या समितीला अधिक वेळ नव्हता म्हणून म्हणा, किंवा खातेप्रमुखांच्या सूचनेंतील वैगुण्य ध्यानांत न आल्यानें म्हणा, किंवा तें वैगुण्य ध्यानांत येऊनहि पर्यायी विचार पुढें मांडतां आला नाहीं म्हणून म्हणा, खातेप्रमुखांच्या सूचना जशाच्या तशा अहवालांत नमूद करण्यांत आल्या आहेत कीं काय ?

लोकशाही विकेन्द्रीकरणाबाबत अनेक खात्यांशीं निगडित अशा बाबी आहेत.त्यासंबंधांत त्या त्या खात्याशीं अधिक संबंध येणाऱ्या संस्थांनीं आणि व्यक्तींनीं या अहवालांत सुचविण्यांत आलेल्या खातेवार व्यवस्थेचा सर्वंकष विचार लोकांपुढें व सरकार-पुढें ठेवावयास हवा. सरकारनें आपण होऊन अशी विचारणा संबंधित संस्थांकडे केली तर तें अधिक उपयुक्त होईल.

मुख्यमंत्र्यांना कोणते दोष दिसले हें अद्याप बाहेर आलेलें नाहीं. कदाचित् विकेन्द्रीकरणाची जी अंतिम योजना तयार होईल तिच्या स्वरूपावरूनच त्याविषयीं अंदाज बांधावा लागेल. पण मुख्यमंत्र्यांच्या त्या उद्गारांनीं एवढा दिलासा जरूर मिळाला आहे कीं, उच्च सरकारी पातळीवर त्या अहवालाचा त्रयस्थ बुद्धीनें विचार होईल. असा विचार कोणता असूं शकतो याची सर्वसामान्य दिशा दाखविण्याचा अल्पसा प्रयत्न करावा, अशी बुद्धीदेखील या दिलाशामुळेंच निर्माण झाली आहे.

ही दिशा खरें म्हणजे समितीच्या अहवालानेंच दाखवून दिली आहे. समितीनें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं,

> "गेलीं अनेक वर्षे स्थानिक संस्थांची वाढ कमी–अधिक प्रमाणांत आडवी-तिडवी होत होती. कारण, ज्यावेळीं एखादी समस्या उत्पन्न होई त्यावेळीं तिची सोडवणूक अलग रीतीनें तेवढ्यापुरतीच केली जाई........**स्थानिक कारभाराच्या क्षेत्रांत स्थानिक संस्था आपलें योग्य तें कार्य तेव्हांच शिरावर घेऊं शकतील कीं, जेव्हां स्थानिक शासनयंत्रणेला एकविचारी, एकसूत्री आणि एकमार्गी आकार दिला जाईल.**"

प्रश्न आहे : असा आकार केव्हां देतां येईल ? त्याचें उत्तर आहे : जेव्हां स्थानिक शासनाचा विचार राज्य-शासनाच्या संदर्भांत होईल तेव्हां. समितीनें स्थानिक पातळीवरील योजना सुचवितांना स्थानिक शासनाचा अलग विचार केला आहे. या विचाराला पूर्णता येण्यासाठीं हा अलग विचार संपूर्ण राज्ययंत्रणेच्या सुधारणेच्या दृष्टीनें कोठें बसतो, हें पाहणें आवश्यक आहे. या दृष्टीनें राज्य सरकारला एक सूचना आहे. ती ही कीं, लोकशाही विकेन्द्रीकरणाच्या योजनेला अंतिम स्वरूप देण्यापूर्वी लोकशाही राज्यकारभाराचें स्वरूप काय असावें, याचा मूलभूत विचार करील अशी समिति नेमण्यांत यावी. किंवा खुद्द मुख्यमंत्र्यांनीं स्वतःच तसा विचार करावा. कदाचित् मुख्यमंत्री श्री. चव्हाण यांनीं तसा विचार केला असावा म्हणूनच त्यांना या अहवालांत कांहीं दोषस्थळें दिसलीं असावीत. पण लोकशाही विकेन्द्रीकरणासंबंधांत झाला तसा लोकशाही राज्यकारभाराबाबतहि सामूहिक विचार व्हावयास हवा. तो व्हावा यासाठीं 'समिती'ची सूचना.

### नाहींतर प्रयोग एकाकी व एकांगी ठरेल !

असा विचार केला तर काय दिसून येईल ? कलेक्टर व डी. एस्. पी यांचे संबंध काय असावेत ? डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट या नात्यानें कलेक्टरला असणारे शांततारक्षणाचे व सुव्यवस्थेचे अधिकार जिल्हा पोलिसप्रमुखाकडे यावेत कीं काय ? कलेक्टरऐवजीं 'डेप्युटी कमिशनर' हा अधिक अधिकार असणारा अधिकारी ठेवला तर काय होईल ? तशी आवश्यकता नाहीं काय ? एकाच 'रँक'चे दोन अधिकारी असण्यापेक्षां ही योजना इष्ट ठरत नाहीं काय ? विकासकार्याचा भाग यापुढें अधिक महत्त्वाचा असल्यानें जिल्हा पातळीवरील अधिकारी 'रेव्हेन्यू खात्या'चा न मानतां 'डेव्हलपमेंट खात्या'चा कां मानूं नये ? आणि असें परिवर्तन विचारांत घडलें तर शासनाच्या दृष्टीनें कोणत्या सुधारणा क्रमप्राप्त ठरतात ? **सारांश, जे प्रश्न आम्हीं गेल्या १२ वर्षांत विचारले नाहींत ते प्रश्न सोडविले पाहिजेत, अशी धारणा निर्माण होईल. लोकशाही विकेन्द्रीकरण समितीच्या अहवालाच्या परिशीलनांतून लोकशाही राज्यकारभाराविषयीं कांहीं नवें मूलगामी संशोधन सुरू झालें, तरच त्या अहवालाचें सार्थक झालें असें म्हणतां येईल.** अशा संशोधनाअभावीं लोकशाही विकेन्द्रीकरणाचा प्रयोग हा एकाकी आणि एकांगी प्रयत्न ठरण्याचा धोका आहे. हा धोका राज्यकर्त्यांनीं ओळखला आहे काय ?

● ● ●

शाळांसाठीं लागणाऱ्या उत्तम बनावटीच्या सर्व प्रकारच्या वह्या स्वस्त दरांत मिळतील.

**मे. व्ही. के. डिस्ट्रिब्यूटर्स**

४३१।५७ पुरंदरे कॉलनी, पुणें २

शाळांसाठीं वह्यांची संपूर्ण ऑर्डर देणारांस **शाळेचें नांव विनामूल्य छापून मिळेल.**

सर्व प्रकारची ऑफिस स्टेशनरी, पेपर्स व शालेय साहित्य योग्य भावांत पुरविलें जाईल.




• • • के. ल. जोग • • •

# ऑलेम्पिक आणि भारत

रोम येथील आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धा संपून आता नऊ महिने झाले. इतर देश या सामन्यांतील यशापयशाची योग्य ती मीमांसा करून चार वर्षांनी भरणाऱ्या पुढील स्पर्धांच्या तयारीस आजपासूनच लागलेले दिसतात. आणि आपण ? गेल्या सहा ऑलेंपिक सामन्यांतून भारताच्या वांट्यास येणारें हॉकीचें एकमेव अजिंक्यपद यावेळीं पाकिस्तानने आपल्यापासून हिरावून नेलें तरी स्थितप्रज्ञ ! निदान नवमहाराष्ट्राने तरी ही निष्क्रिय स्थितप्रज्ञता झटकून टाकून आंतरराष्ट्रीय क्रीडाक्षेत्रांत भारताचा झालेला हा पराभव धुवून काढण्याची ईर्ष्या बाळगली पाहिजे; त्या दृष्टीने आजपासूनच प्रयत्नांना आरंभ केला पाहिजे. अशा प्रयत्नांना योग्य ती पार्श्वभूमि लाभावी म्हणून श्री. के. ल. जोग यांचा 'ऑलेंपिक व भारत' हा लेख येथें आम्ही मुद्दाम प्रसिद्ध करीत आहोत. त्यांत प्रारंभी ऑलेंपिक सामन्यांत भारताने आजवर केलेल्या कार्याचा पूर्ण तपशील दिलेला आहे. आणि अखेरीस आज आपल्या प्रयत्नांच्या दिशेंत कोणते मूलभूत बदल करणें अवश्य आहेत, यासंबंधींचें थोडें दिग्दर्शन यांत आलेलें आहे. खेळाडू जगताला या ऐतिहासिक आढाव्याचा उपयोग होईल असा विश्वास वाटतो.

### पारतंत्र्यकाळांतहि अभिमानास्पद प्रगति

ऑलेंपिक मैदानी व मर्दानी सामने पुरातन काळांत प्रथम ग्रीस-देशांत सुरू झाले असले तरी या स्पर्धांना खरी चालना १८९६ या वर्षी मिळाली व तदनंतर मात्र मधल्या दोन महायुद्धांचा काळ वगळून आजतागायत ते दर चार वर्षांनी पार पडत आलेले आहेत. वृत्तपत्रांच्या अमाप प्रसिद्धीमुळें व प्रत्येक राष्ट्राने हा स्वतःच्या प्रतिष्ठेचा प्रश्न मानल्यामुळे, प्रत्येक वेळीं सदर सामने मोठ्या अटीतटीनें खेळले जात आहेत. भारताने प्रथम सर दोराब टाटा यांच्या नेतृत्वाखालीं १९२० च्या अँटवर्पच्या सामन्यासाठी दोन खेळाडू पाठविले होते. त्यावेळीं हे खेळाडू गेले कधीं तें जनतेस समजलें देखील नाहीं. त्यानंतर भारतांत १९२५ सालीं हॉकीची संस्था स्थापन झाली. आमच्या देशाने १९२८ सालीं प्रथमच ७ खेळाडू व १५ हॉकीपटूंचा संघ ॲमस्टरडॅम येथे पाठविला. हॉकीच्या संघाचें नेतृत्व श्री. जयपालसिंह यांच्याकडे सोपविलें. या जयपालसिंहांनीं ऑस्ट्रिया ६–०, बेल्जीयम ९–०, डेन्मार्क ५–०, स्वित्झर्लंड ६–० व हॉलंड ३–० याप्रमाणें एकूण ५ सामन्यांत २९ गोल प्रतिस्पर्ध्यांवर लावून भारतास विजय मिळवून दिला. विशेष म्हणजे भारतावर कोणाचाच गोल होऊं शकला नाहीं. ॲमस्टरडॅमच्या विजयामुळे भारतास जणू विजयाची एक सुवर्णखाणच सांपडल्यासारखें झालें. भारताने विशेषतः एका विदेशी खेळांत दणदणीत विजय मिळविल्याने भारतीय हॉकीपटूंचा दरबारी थाटांत व रुबाबांत सर्वत्र सत्कार झाला. क्रीडाक्षेत्रांत एक विलक्षण चैतन्य निर्माण झालें. त्यामुळे १९२७ सालीं पतियाळाचे महाराज श्री. यादवेंद्रसिंह यांच्या पुढारीपणाने सुरू झालेल्या इंडियन ऑलेंपिक असोसिएशनला आपलें कार्यक्षेत्र वाढवावें असें वाटूं लागलें. भारताने नंतरच्या लॉस एंजिलीस येथे १९३२ सालीं भरलेल्या आंतरराष्ट्रीय चतुर्वार्षिक क्रीडास्पर्धांसाठीं ४ ॲथलेट, १ जलतरणपटू व हॉकीचे १५ खेळाडू श्री. लालशहा बोखारी यांचे नेतृत्वाखालीं पाठविले होते. त्यावेळीं भारतास फक्त दोनच राष्ट्रांशीं हॉकीच्या अजिंक्यपदासाठी झुंज द्यावी लागली व आमच्या खेळाडूंनीं जपानचा ११–१ व अमेरिकेचा २४–१ ने पराभव करून गोऱ्या राष्ट्रांना आश्चर्याचा एक विलक्षण धक्का दिला. कित्येक गौरकाय क्रीडाशौकिनांनी भारताने प्रतिस्पर्ध्यांवर असे डझनांनी लावलेले गोल पाहून भारतीय खेळाडूंची मुक्त कंठाने स्तुति केली.

### हॉकींतील 'जादूगार' ध्यानचंद

त्यानंतर १९३५ सालीं बरद्वानचे महाराज श्री. उदयचंद्र मेहताब यांनी वेट लिफ्टिंग फेडरेशन स्थापन केलें व १९३६ सालीं राजा भालिंद्रसिंह यांच्या मार्गदर्शनाखालीं जलतरणस्पर्धा नियमीत घेण्यासाठीं स्विमिंग फेडरेशन स्थापन झालें. तसेंच याचवर्षी पंकज गुप्ता यांनी फुटबॉल फेडरेशन स्थापन केलें. नंतर बर्लीनचे सुप्रसिद्ध सामने होते. त्यासाठीं हिंदुस्थानने ४ ॲथलेट, ३ पैलवान, १ वेटलिफ्टर व आजहि ज्यांचें नांव हॉकीच्या जगतांत वारंवार घेतलें जातें, त्या मेजर ध्यानचंदांच्या नेतृत्वाखालीं १९ हॉकीपटू पाठविले. श्री. ध्यानचंदांच्या हॉकी स्टिकची खरी करामत यावेळीं जर्मनांना पाहावयास मिळाली. विद्युल्लतेप्रमाणें मैदानांत चौफेर

फिरणारी ध्यानचंदांची हॉकी स्टिक चेंडूला असा कांही फटकारा देई कीं, गोलकीपरला आलेला चेंडू दिसण्यापूर्वीच गोलचा धाडकन् आवाज प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करी. गोऱ्या प्रेक्षकांनी ध्यानचंदांना हॉकीचा 'जादूगार' ठरविलें व प्रथमपासूनच इतर हॉकी संघ भारतीय हॉकी संघापुढें बिचकत बिचकत मुकाबल्यास येऊं लागले. भारतीय खेळाडूंनी स्वतःचा असा 'शॉर्ट पासिंग' खेळ आंखलेला असल्याने गोऱ्यांचा 'लॉंग पासिंग गेम' भारतीय खेळाडूंपुढें सर्वस्वी निष्प्रभ ठरे. हिंदुस्थानने हंगेरी ४–०, अमेरिका ७–०, जपान ९–०, फ्रान्स १०–० व जर्मनी ८–१ असे गोल लावून स्वतःची श्रेष्ठता पुन्हा तिसऱ्यांदा एकदा सिद्ध केली. १९४० व ४४ सालीं महायुद्धामुळे सामने भरले नाहीत. मध्यंतरी १९४६ सालीं राजा भालिंद्रसिंह यांनी अॅमेच्युअर अॅथलेटिक फेडरेशन उभें केलें. तसेंच पाश्चात्य पद्धतीचे मल्लयुद्धाचे सामने भरविण्याशाठीं १९४८ यावर्षी रेस्लींग फेडरेशन पुढे आलें.

## पसारा वाढत चालला....

१९४८ सालीं लंडन ऑलिंपिकची हाक येतांच भारताने खालील-प्रमाणे अगदी भरगच्च टीम पाठविली. ८ अॅथलेट, १५ जलतरणपटू, वॉटर पोलोसाठीं सबंध टीम, ६ पैलवान, २ वेट लिफ्टर्स, ७ मुष्टीयुद्धाचे योद्धे, १० सायकलपटू, १८ खेळाडूंची फूटबॉल टीम व २१ जणांची हॉकी टीम कप्तान श्री. किशनलाल यांनी नेली होती. या वेळीं नाही म्हणावयास आमच्या खाशाबा जाधवांनी मेक्सिकोच्या फक्त एका पैलवानावर विजय मिळविला. पण भारतीय हॉकीपटूंनी मात्र परत चौथ्यांदा अन्य खेळाडूंच्या संघांना चांगला 'हात' दाखवून ऑस्ट्रिया ८–०, अर्जेन्टिना ९–१, स्पेन २–०, हॉलंड २–१ व ब्रिटन ४–० असे गोल लावून या सामन्यांत अगदी निर्वेध विजय मिळविला.

यानंतर १९५१ सालीं कै. गोविंद वल्लभपंत यांनी नॅशनल रायफल असोसिएशन, श्री. पी. एन्. माथूर यांनी जिम्नॅस्टिक संस्था आणि नवल एच्. टाटा यांनी व्हॉली बॉल संस्था स्थापन केली. याच वर्षी कबड्डी फेडरेशनहि एस्. के. बसू यांनी सुरू केलें. म्हणजे जवळ-जवळ सर्व क्रीडाप्रकारांसाठीं आपल्याकडे संस्था निर्माण झाल्या. हेलसिंकी येथे १५ व्या ऑलिंपिकसाठी या निरनिराळ्या क्रीडासंस्थां-तर्फे बरेच खेळाडू पाठविण्यांत आले. तेथे मल्लयुद्धांतील बॅंटमवेटचे मल्ल श्री. खाशाबा जाधव यांनी लागोपाठ तीन कुस्त्या मारून भारतास पहिलें ब्रॉंझ मेडल मिळवून दिलें. हॉकींतील विजयाबद्दल तर कोणास शंका नव्हतीच. हिंदी टीमने के. डी. सिंह यांच्या नेतृत्वाखालीं तीन सामने खेळून ऑस्ट्रिया ४–०, ब्रिटन ३–१ व हॉलंड ५–१ असे गोल लावून भारतीय क्रीडाशौकिनांचें नेहमीं-प्रमाणे समाधान केलें. याच सुमारास भारतीय लष्करांत व पोलीस विभागांत निरनिराळे क्रीडाप्रकार सुरू झाले होते. १९५६ सालीं मेलबोर्नला क्रीडाज्योत पेटली तेव्हा भारतातर्फे १३ अॅथलेटस, ४ जिम्नॅस्टिक खेळाडू, २ नेमबाजी स्पर्धक, २ जलतरणपटू, ८ पैलवान, ३ वेटलिफ्टर्स, १७ फुटबॉल खेळाडूंची टीम व २१ हॉकी पटू, तीन प्रमुख क्रीडाधिकाऱ्यांसह मैदानावर हजर होते.

## कस कमी होत चालला....

या ऑलिंपिकमध्यें एकंदर क्रीडाजगताची घोडदौड बरीच पुढें गेली होती. त्या मानाने भारतीय खेळाडूंची तयारी नसल्यामुळे ते क्वॉर्टर फायनलपर्यंत देखील पोचूं शकले नाहींत. भारतीय पद्धती-प्रमाणे हॉकी खेळणारे मुसलमान खेळाडू पाकिस्तानला निघून गेले होते. पाकला हेलसिंकीला ब्रॉंझ मेडलदेखील न मिळाल्याने या वेळीं त्यांनी, विशेषतः भारताबरोबर टक्कर देण्यासाठी हा बलवान् हॉकी संघ मेलबोर्नला उतरविला होता. पण भारताने मोठ्या जवामर्दीने सर्व सामने खेळून ते जिंकले. संघनायक बलवीरसिंह यांच्या टीमने अफगाणिस्थान १४–०, अमेरिका १६–०, सिंगापूर ६–०, जर्मनी १–० व पाकिस्तान १–० असे एकूण ३८ गोल लावून विजयश्री सहाव्यांदा जिंकून आणली. पण अन्य देशांचे हॉकी संघ झपाट्याने प्रगति करीत आहेत याचा जणू इशाराच मेलबोर्नला मिळाला होता यांत शंका नाही.

टोकियोच्या तिसऱ्या आशियाई सामन्यांत आमच्या टीमवर पाकचा जरी प्रत्यक्ष गोल लागला नव्हता तरी विजेतेपद सरासरी गोलांच्या गणितानें पाकिस्तानच्याच पदरांत टाकलें गेलें होतें. गेल्या वर्षी रोम येथे १८ जणांची फुटबॉल टीम, ४ जलतरणपटू, ६ निशाणबाजीचे खेळाडू, ५ पैलवान, ११ अॅथलेट, १ वेट-लिफ्टर व २१ जणांची हॉकी टीम, लेस्ली क्लॉडियस यांच्या आधि-पत्याखाली गेली होती. इतर खेळांतील पातळी नेहमीच्या भारतीय स्पर्धांच्यापेक्षा बरी असली तरी विजेतेपदाचा मान मिळविण्याच्या दृष्टीने ती अगदीच तोटकी भासली. नाही म्हणावयास आमच्या आशियाई व कॉमनवेल्थ चॅंपियन असलेल्या जमादार मिल्खासिंहानें रोमला प्रतिस्पर्ध्यांशीं तीव्र सामना केला. मिल्खाचें ४५·६ सेकंदांचें ४०० मिटरचें टायमिंग नवीन ऑलिंपिक रेकॉर्ड होण्याच्या योग्यतेचें होतें, तरी इतर तिघेजण त्याच्याहि पुढच्या पातळींत गेलेले दिसले व मिल्खास ब्रॉंझ मेडलचा मानहि मिळूं शकला नाहीं. आमच्या खेळाडूंनी हॉकीची सुरवात तर ठीक केली होती. त्यांनी डेन्मार्क १०–०, हॉलंड ४–१, न्यूझीलंड १–०, ग्रेट ब्रिटन १–० याप्रमाणे गेलीं २८ वर्षे भारतीयांच्या हातीं असलेला विजयाचा जरीपटका पुढे रेटला. पण अखेर पाकच्या नासरने एक गोल लावून भारताचा सुवर्णपदकाचा मान हिरावून नेला. जिवाचें रान करून नभोवाणी ऐकणाऱ्यांना जबरदस्त धक्का बसला. 'आमचा सेंटर फॉरवर्ड चांगला नव्हता म्हणून हें असें झालें!' असा गिला मागाहून करून काय उपयोग!

## कुठे जग! कुठे भारत!

१८९६ सालीं पहिले ऑलिंपिक सामने सुरू झाले तेव्हां १०० मिटरचें अंतर १२ सेकंदांत धावून अमेरिकेचा बर्क त्यावेळी विनायासे सुवर्णपदक मिळवूं शकत होता. पण आज वरील टायमिंग म्हणजे जगांत एक पोरखेळ झालेला आहे. रोमला फोटो फिनीश पद्धतीप्रमाणे १०·२ सेकंदांत जेव्हां पश्चिम जर्मनीच्या आर्मीन हॅरीने सुवर्णपदक जिंकलें, तेव्हा त्याच्यावर स्तुतिसुमनांचा प्रचंड वर्षाव झाला. अशा द्रुतगतीने जगांत आज प्रत्येक क्रीडाप्रकाराची पातळी उंचावत आहे. प्रत्येक आठवड्यांत जुने उच्चांक रद्दबादल होऊन नवे

जगासमोर येत आहेत. या सर्व नेत्रदीपक यशाच्या मागे प्रत्येक राष्ट्राचें दूरदृष्टीचें प्रयत्न, आधुनिक पद्धतीची कार्यपद्धति, लायक खेळाडूंना पुढें ओढण्याची धडपड—इतक्या गोष्टी असतात. म्हणून त्यांचे खेळाडू १—१ च नव्हे तर ३—३, ४—४ अशीं विजय—पदकें क्रमशःहि जिंकून विजयाच्या चबुतऱ्यावर मोठ्या दिमाखाने उभे राहूं शकतात. त्यांच्या देशाचें क्रीडाक्षेत्रांतील श्रेष्ठत्व जगाला निर्विवादपणें मान्य करावें लागतें.

आमच्या देशांत मात्र सर्वस्वी याच्या उलट प्रकार नजरेस येत असतो. आधींच आमच्या देशांत चांगल्या खेळाडूंची वाण; पद्धतशीर प्रयत्नांचा अभाव; त्यामुळे मग ऑलेंपिक सामने वर्ष-सहा महिन्यांवर आले कीं, धावपळ सुरू होते. मागील स्पर्धांतून भाग घ्यावयास कोण कोण गेले होते याची चौकशी सुरू होते. तात्पुरत्या स्वरूपाचे कॅम्पस् भरविण्याचा फार्स केला जातो. वृत्तपत्रांतून भरमसाठ जाहिरात-बाजी केली जाते. कित्येक क्रीडासंस्थांचे पदाधिकारी स्वतःस अशा सामन्यांतून मिरवितां यावें म्हणून एकाद-दुसरा खेळाडू हातीं ठेवण्यासाठीं धडपड करतात. जनतेकडून ऑलेंपिक-फंड जमा केला जातो. वृत्तपत्रांतून खेळाडूंसह स्वतःचे फोटो झळकाविले जातात. एवढें सर्व झाल्यावरदेखील शेवटीं वशिल्याचीं घ्यादीं पुढे लोटलीं जातात तीं जातातच. अशा स्थितींत क्रीडापटूंची पातळी योग्य नसल्याने आमचे बहुतेक खेळाडू पहिल्या १-२ फेऱ्यांतच बाद झाले तर त्यांत आश्चर्य कसलें! सामने संपले कीं, बिचाऱ्यांना थोडीबहुत वाटखर्ची देऊन मार्गीं लावलें जातें. परत त्यांच्या आर्थिक परिस्थितीची चौकशी करून त्यांच्या पुढील ट्रेनिंगची व्यवस्था करण्याचें कोणाच्या गांवीं येईल तर शपथ!

ऑलेंपिक सामने म्हणजे दर चार वर्षांनी भरविले जाणारे 'उरूस' नव्हेत, की त्यांत भाग घेण्यासाठीं सदिच्छामंडळाप्रमाणे नाममात्र योग्यतेचे खेळाडू पाठविले जावेत! परदेशांत हा राष्ट्राच्या प्रतिष्ठेचा प्रश्न मानण्यांत येतो. पहिले सामने संपले, कीं लगेच नव्यासाठी नव्या उमेदीने तयारी सुरू केली जाते. जगांत चौफेर नजर ठेवून बारमाही पद्धतीनें सातत्याने प्रयत्न केले जातात. नागरिकांच्या सर्व क्षेत्रांतून व थरांतून योग्य व चिकाटीचा खेळाडू दिसला, की त्यास लगेच उचलण्यांत येतें. मग तेथे जाती, प्रांत व भाषा-भेद अथवा गरीब—श्रीमंत, काळा—गोरा, सुशिक्षित—अशिक्षित, असले अडथळे जुमानले जात नाहीत. अतीव राष्ट्राभिमानामुळे व अशा अचूक कार्यपद्धतीमुळे द्वितीय महायुद्धांत सर्वस्वी उध्वस्त झालेले जर्मनी, जपान, सोव्हिएट रशियासारखे देश आज क्रीडा-क्षेत्रांत भारतापेक्षा फार फार पुढे गेलेले आहेत.

भारताचा व आपल्या महाराष्ट्राचाहि विचार करतां या बाबतींत आपण आज काय करूं शकूं असा प्रश्न आहे. आज आमचा नव-महाराष्ट्र आज सर्वच आघाड्यांवर नव्या उमेदीने आगेकूच करीत आहे. मग या क्रीडाक्षेत्रांत तरी 'प्रिय आमुच्या महाराष्ट्र देशाने' काय म्हणून मागे रहावें?

## हें आमच्या पैलवानांना सहज जमेल!

सर्वस्वीं परदेशी असलेल्या हॉकी या खेळांत आजवर भारताने अग्रेसरत्व मिळविलें म्हणून आम्हांस जो एक प्रकारचा आनंद व अभिमान वाटतो त्याच्या दुप्पट दुःख भारतास आंतरराष्ट्रीय मल्लयुद्ध-स्पर्धांत आजवर एकहि सुवर्णपदक मिळूं शकलें नाहीं याचें होतें.

खरोखरीच मल्लयुद्ध हा खेळ महाराष्ट्राइतका अन्य कोठल्याहि प्रांतांत दिसून येत नाहीं. संख्येच्या दृष्टीने म्हणावे, तर महाराष्ट्राइतकें पैलवान खुद्द सोव्हिएट युनियनमध्येंहि नसतील. खेडोंपाडीं नवजवान पोरें उरसांतून अनेकदा ४-२ मिनिटांत अगदीं डोळ्याचें पारणें फेडणाऱ्या कुस्त्या करून दाखवितात. वास्तविक ऑलेंपिक कुस्ती म्हणजे इनमीन १२ मिनिटांचा मामला. पहिलीं सहा मिनिटें स्टँडिंग रेसलिंग व पुढें २—२ मिनिटांच्या २ ग्राऊंड रेसलिंगच्या पाळ्या व शेवटीं परत २ मिनिटांची खडी कुस्ती. त्यांतहि कुस्ती चीतपट झाली नाही तरी गुणाधिक्याप्रमाणे जिंकण्याची सोय. आमच्या भारतीय पद्धतीच्या मल्ल-युद्धाचे चार प्रकार आहेत. ते म्हणजे भीमसेनी, जांबुवंती, हनुमंती व जरासंधी हे होत. त्यांतील ताकतीने प्रतिस्पर्ध्यास चेपण्याची म्हणजे भीमसेनी कुस्ती १०-१२ आंतरराष्ट्रीय होल्डसह जर अशा खेडोपाडीं चमकणाऱ्या नवोदित पैलवानांना शिकविली व १-२ वर्षे जर या पद्धतीचा विशेष आस्थापूर्वक अभ्यास केला तर खरोखरीच बराच कार्यभाग होण्यासारखा आहे. पण अशा नवोदित पैलवानांची आर्थिक बाजू लंगडी असल्याने ते पहिल्यापासूनच 'लक्ष्मीधर' होण्याच्या मागे असतात. इतर उद्योगधंदे करून केवळ हौसेसाठीं कुस्तींतील कसब शिकावें अशी वृत्ति त्यांच्या ठिकाणीं निर्माणच होत नाही. नियमाप्रमाणे केवळ धंदेवाईक पैलवानांना ऑलेंपिक सामन्यांत प्रवेश मिळत नसल्यामुळे हा आमचा खेळाडू गुणी असूनहि जगासमोर चमकूं शकत नाहीं.


## या गुणी माणसांना दिशा दाखवा!

मल्लयुद्धाप्रमाणे इतरहि अनेक क्षेत्रांत कांहीसा असाच प्रकार नजरेस येतो. उदा०:—रेवस ते मुंबई अंतर पोहून दाखविणारे एक जलतरणपटू मुंबईत आज आहेत. तसेच 'रबर मॅन ऑफ इंडिया' ही पदवी भूषविणारे श्री. नारायणराव भोसले, अविरत दीडदीडशें तास सायकली चालविणारे श्री. आनंदराव हुल्याळकर व शांतिलाल चौहान, तसेच कोल्हापूर ते कऱ्हाड अंतर पळूं शकणारे कोल्हापूरचे श्री. चव्हाण ही मंडळी आजहि महाराष्ट्रांत दिसतात. वास्तविक वरील सर्व क्रीडाप्रकार थोड्याफार फरकाने ऑलेंपिक सामन्यांत असतातच. पण दुबळ्या आर्थिक परिस्थितीमुळे आमचे महाराष्ट्रीय तरुण आज वरील चमत्कार केवळ पोटासाठीं करीत असतांना दिसतात. इथिओपियाच्या राजाच्या शरीररक्षकाने परवा रोमला मॅरेथॉन शर्यतींत सुवर्णपदक जिंकून सर्वांना अगदीं आश्चर्यचकित केलें! सामान्य माणसांतून आढळणाऱ्या असल्या असामान्य गुणांचा परदेशांत कशा रीतीने उपयोग करून घेतला जातो याचें हें एक ठळक उदाहरण म्हणून दाखवितां येईल.

आमच्या लोकप्रिय महाराष्ट्र सरकारने व क्रीडाक्षेत्रांतील विचारवंत अधिकारी व्यक्तींनी परस्पर सहकार्याने जर योजनाबद्ध प्रयत्न भावी काळांत केले तर आमचे महाराष्ट्रीय खेळाडू भविष्यकाळांत भारतीय क्रीडाक्षेत्रांत सर्वप्रथम चमकतील यांत शंका नाहीं.

● ● ●

# यंत्रें यंत्रीं घरा



दि. बा. मोकाशी

मराठींतील एक आघाडीवरील कथालेखक म्हणून श्री. दि. बा. मोकाशी यांचा परिचय सर्वदूर पोहोचलेला आहे. पण मानवी मनाचें सूक्ष्म व तरल अवगाहन करणारे श्री. दि. बा. मोकाशी हे त्याच मानवी मनाला स्तिमित करणाऱ्या यंत्रज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रांतहि खोलवर डूब घेणारे आहेत, याची फारच थोड्या वाचकांना कल्पना असेल. त्यांनी स्वतः दोनचार नवीं यंत्रें वा उपकरणें बनविलीं असून त्याला वरिष्ठ पातळीवरून मान्यताहि प्राप्त होत आहे. अलिकडेच पुण्यांत भरलेल्या मेडिकल प्रदर्शनांत त्यांचें एक यंत्र सर्वतोमुखीं प्रशंसिलें गेलें आहे. आम्ही 'माणूस' साठीं त्यांच्या या प्रतिभेचा खास उपयोग करून घेत आहोंत. वाचकांना हा उपक्रम नावीन्य-पूर्ण व उपयुक्त वाटेल अशी खात्री वाटते.

आज मी आपणांस रेडिओसंबंधी कांही माहिती सांगणार आहें. ज्यांनी आधी रेडिओ विकत घेतला असेल किंवा जे घेणार असतील त्यांनाहि ती उपयोगी पडेल.

रेडिओ विकत घेतांना पुष्कळांना त्याला लागणाऱ्या एकूण खर्चाची कल्पना नसते. रेडिओ घरांत चालू ठेवण्यास किती खर्च येतो तें पाहा,—

रेडिओची किंमत साडेतीनशे रुपये धरली. रेडिओ साधारणतः सहा वर्षें टिकतो. कारण त्यानंतर दुरुस्तीचा खर्च फार वाढूं लागतो व रेडिओ बदलणें हेंच काटकसरीचें ठरतें. कांहीं रेडिओ दहा-पंधरा-वीस वर्षेंहि टिकलेले आहेत, पण ते अपवाद आहेत.

सहा वर्षांनंतर रेडिओ बदलावयाचा असें झालें तर साडे-तीनशें रुपयांच्या रेडिओची किंमत सहा वर्षांनंतर शंभर रुपये येईल असें धरूं. याचा अर्थ सहा वर्षांत अडीचशें रुपये खर्चीं पडले म्हणजे वर्षास बेचाळीस रुपये रेडिओच्या किंमतींत जातात.

## खर्चाचा अंदाज पाहा

रेडिओ चालवण्याचा वार्षिक खर्च मग खालीलप्रमाणे देतां येईल.

रेडिओसाठीं घरावर तार ( एरिअल ) बांधावी लागते. तिला पंधरा रुपये खर्च येतो. ही तार तीन वर्षें टिकते. म्हणजे वार्षिक पांच रुपये या तारेसाठी खर्च झाला.

रेडिओचा वार्षिक परवाना पंधरा रुपये.

महिना दोन रुपयेप्रमाणे विजेचा वार्षिक खर्च चोवीस रुपये.

दुरुस्तीसाठीं वर्षास पंचवीस रुपये खर्च होतो.

रेडिओचा एकूण वार्षिक खर्च.

| | |
|---|---|
| रेडिओ रु. | ४२=०० |
| एरिअल तार | ५=०० |
| रेडिओ परवाना | १५=०० |
| वीज-खर्च | २४=०० |
| दुरुस्तीचा खर्च | २५=०० |
| | रु. १११=०० |


रेडिओचा मासिक खर्च या हिशेबाने नऊ ते दहा रुपये येतो. कमी-जास्त किंमतीचा रेडिओ घेऊं, त्याप्रमाणे वजा किंवा भर पडेल.

एकदा रेडिओसाठीं लागणाऱ्या खर्चाचा अंदाज पाहून त्याप्रमाणे रेडिओ निवडावा. पुष्कळांची समजूत अशा असते क्री, मोठा रेडिओ जास्त टिकतो. पण चांगल्या कंपनीचा मोठा किंवा लहान दोन्ही रेडिओ सारखेच टिकतात, म्हणून परवडत नसतांहि मोठा रेडिओ घेतला तर नुकसान होते, कारण दुरुस्तीचा खर्च मोठ्या रेडिओस जास्त पडतो. मोठ्या रेडिओचे फायदे आहेतच. त्याची शक्ति अधिक असते, आवाज गोड असतो. रेडिओ निवडतांना नेहमीं नांव ठाऊक

आहे अशा कंपनीचाच घ्यावा. तसेंच प्रत्येकाची आवाजाची आवड निराळी असते, तेव्हा निरनिराळीं मॉडेल्स ऐकून आपणच निवड करावी.

ऐकण्याची सोय व्हावी आणि सर्व स्टेशनें नीट ऐकायला यावीत यासाठीं रेडिओंत एका स्वीचला खटके टाकलेले असतात. याळाच बँड म्हणतात.रेडिओचीं स्टेशनें वेगवेगळ्या लाट-लांबीच्या रेडिओ-लाटा फेकीत असतात. तेरा मिटर्सपासून पांचशेंपन्नास मिटर्सपर्यंत वेगवेगळ्या आंकड्यांत स्टेशनें आहेत. सोयीसाठीं रेडिओंत तेरा ते पांचशेंपन्नास या दरम्यानच्या आकड्यांचे तीन भाग पाडलेले असतात. याळाच बँड म्हणतात. म्हणजे १३ ते ४१ ही एक बँड. ४१ ते २०० ही दुसरी व २०० ते ५५० ही तिसरी. पैकीं पहिलीला शॉर्टवेव्ह, दुसरीला मिडियम व तिसरीला ब्रॉडकास्ट बँड म्हणतात. कांहीं रेडिओंत यांपैकीं दोनच बँडस् असतात. कांहींत तिन्ही असतात. कांहींत पहिली बँड फोडून तिच्या दोन, तीन अगर चार बँडस् करतात व उरलेल्या दोन तशाच ठेवतात. या तऱ्हेच्या रेडिओंना बँडस्प्रेड म्हणतात. याचा अर्थ असा कीं, तीन बँडच्या रेडिओंत व चार-पांच किंवा सात बँडच्या रेडिओंत तींच स्टेशनें येतात. अर्थात् जास्त बँडच्या म्हणजे बँडस्प्रेड रेडिओंत स्टेशनें लावतांना फार सोईचें होतें. आपल्याला जो कार्यक्रम ऐकावयाचा असेल त्याप्रमाणें रेडिओची निवड करावी. विलायतचीं स्टेशनें ऐकावयाचीं असतील, तर जरा जास्त मोठा रेडिओ घेणें चांगलें. तसेंच दोन बँडचा रेडिओ घेतांना त्यांतली एक बँड ब्रॉडकास्ट असते. ( पुणें-मुंबई-नागपूर येणारीं ) पण दुसरी बँड तेरा किंवा सोळा मिटर्सपासून एकेचाळीस मिटर्सपर्यंत आहे कीं नाहीं तें पाहाव.


रेडिओला सर्वसाधारणपणें खालील बटणें असतात:—




( १ ) स्टेशनें घेण्याचें-काढण्याचें ( ट्यूनिंग )
( २ ) हवी ती बँड घेण्याचें ( वेव्हबँड )
( ३ ) आवाज लहान-मोठा करण्याचें ( व्हॉल्यूम कंट्रोल )
( ४ ) आवाज स्पष्ट अगर मधुर करण्याचें ( टोन कंट्रोल )

हीं चारी बटणें पुढें असतात अगर दोन पुढे व दोन बाजूला किंवा तीन पुढे व एक मागें अशींहि असतात. यांपैकीं रेडिओ लावण्याचें किंवा विझवण्याचें स्वीच तीन किंवा चार नंबरच्या बटनांतच असतें.

रेडिओची मागील बाजू आपणाकडे केली कीं, तीन अंडाकृति भोकें दिसतात. यांपैकीं डावीकडील पहिल्यांत आकाशतार ( एरिअल ) व जमीनतार लावण्यासाठीं दोन जाड दाभणाएवढीं भोकें असतात व त्यावर A म्हणजे एरियल व E म्हणजे अर्थ अस लिहिलेलें असतें.




ग्रामोफोन रेडिओवर लावतां येतो. त्याची सोय मधील अंडाकृति भोकांतील दोन पिनांत असते. यावर Pick up असें लिहिलेलें असतें. तिसऱ्या अंडाकृति भोकांत L. S. असें लिहिलेलें दिसेल. येथें दुसऱ्या लांबच्या खोलींत लाऊडस्पीकर ठेवावयाचा असेल, तर तो जोडण्याची सोय केलेली असते.

### रेडिओला विश्रांति आवश्यक

रेडिओ घेतल्यावर तो टिकण्यासाठी एक महत्त्वाची काळजी म्हणजे रेडिओ सतत पांच-सहा तास न लावणें. साधारणपणें

> ### युरी गागारिन यांचा ' सर्वज्ञ ' पोषाख
>
> युरी गागारिन यांनी अंतराळ-प्रवासासाठी जो खास पोषाख परिधान केला होता, त्यांतच त्यांच्या अंतराळ-प्रवासांतील विविध जीवन-क्रियासंबंधीं सर्व माहिती आपोआप पृथ्वीवर कळविणारीं उपकरणें बसविलेलीं होतीं, असें सोविएत वैद्यकतज्ज्ञ वॅसिली पारिन यांनी मॉस्को टेलिव्हिजनवर सांगितलें.
>
> अंतराळांत प्रवास करून आलेल्या कुत्र्यांवर अद्याप कोणत्याहि प्रकारचा अनिष्ट परिणाम दिसून आलेला नाही, असेंहि ते म्हणाले. यापुढील अंतराळ-प्रवासासाठी प्रवासी प्राय: वैमानिकांमधून निवडले जातील व त्यांना युरी गागारिन हे ज्या कसोटयांना उतरले त्याच कसोटयांना उतरावें लागेल.
>
> सोविएत अंतराळ–यानांची रचना सोविएत यंत्रज्ञांनी अशी केली आहे कीं, गतिवर्धनाचा वा गतिरोधाचा जिवंत प्राण्यावर कोणताहि हानिकारक परिणाम होऊं नये.

प्रत्येक दोन तासांनंतर रेडिओला दहा-पंधरा मिनिटें विसावा द्यावा.

रेडिओ सतत महिना-पंधरा दिवस बंद ठेऊं नये. विशेषत: पावसाळ्यांत ही काळजी घ्यावी. रेडिओ अर्धातास तरी दिवसातून एकदा लावावा.

जास्त महिने रेडिओ बंद राहणार असेल, तर तो ऑईल पेपरमध्ये गुंडाळून ठेवावा.

जिथे पावसाची झड किंवा उन्ह येत असेल तिथे रेडिओ ठेवूं नये.

रेडिओचा आवाज अतिशय मोठा करूं नये.

पावसाळ्याच्या आरंभी रेडिओ आंतून स्वच्छ करून घ्यावा. अगर स्वत: करावा. उन्हाळ्यांत त्यांत जी धूळ साठते ती पावसाळी हवेंत सर्द, दमट होते व तीमुळें रेडिओंत गंज चढतो.

## रेडिओ कसा चालतो

रेडिओंत इतक्या लांबचें कसें ऐकूं येतें याचें सर्वांनाच नवल वाटतें, त्यासाठीं थोडक्यांत रेडिओ कसा चालतो हें पाहूं.

**आकृति नं. ३**

रेडिओ स्टेशनावरून बोलणाऱ्या माणसाच्या आवाजाचा छाप विजेच्या प्रवाहावर मारतात. हा छाप असलेला प्रवाह रेडिओ स्टेशनावरील एरिअलमधून वाहूं लागतांच त्यांतून रेडिओच्या लाटा निर्माण होऊन त्या अतिशय वेगाने पृथ्वीभोंवतीं फेऱ्या घालूं लागतात. त्यांची गति प्रकाशाइतकीच असते. या लाटा आपल्या घरावर बांधलेल्या एरिअलवरून गेल्या की, त्यामुळे आपल्या एरिअलमध्ये पुन्हा प्रवाह उत्पन्न होतो. हा प्रवाहच रेडिओंत वाढवतात. तो स्पीकरमधून वाहूं लागला कीं, त्याच्यावर बोलणाऱ्याच्या शब्दांचा छाप असल्यामुळे आपल्याला बोलणाऱ्याचे शब्द ऐकूं येतात.

आतां शेवटी नवीन असलेल्या खिशांतील ट्रॅन्झीस्टर रेडिओसंबंधीं थोडें सांगून संपवितों.

## ट्रॅन्झीस्टरसंबंधीं थोडें

ट्रॅन्झीस्टर रेडिओंत व्हॉल्वऐवजीं लांबट बोराच्या बीएवढे ट्रॅन्झीस्टर असतात. खिशांतले हे रेडिओ तीन, सहा किंवा नऊ व्होल्टच्या बॅटरी सेलवर चालतात. हा रेडिओ घेतांना आंतील सेल सर्वत्र सहज मिळतात त्याच आकारांचे आहेत की नाहीत हें पाहावें. नाहीतर सेल मिळत नाहीत किंवा फार किंमत पडते.


हे रेडिओ वापरतांना जपून वापरावे. हे सहज कुठेंहि खांद्याला लावून नेतां येतात, पण त्यामुळेंच त्यांची पडझड होण्याचा संभव फार. तसेंच हा रेडिओ उन्हांत तापेल असा ठेवूं नये व खालीं पाडूं नये.

हा रेडिओ टिकायला चांगला असतो. यांतील ट्रॅन्झीस्टरचं टिकणं व्हॉल्वच्या पांचपट मानतात. खेडेगांवांत हे रेडिओ अतिशय चांगले. कारण नेहमींच्या मोठ्या बॅटरीवर चालणाऱ्या रेडिओहून याला फार कमी खर्च येतो.

हे रेडिओ आज बाहेर मिळत आहेत. हे पॉकेट रेडिओ घेतांना त्याचा पोस्टाचा लायसन्स मिळेल किंवा नाही हें पाहूनच रेडिओ घ्यावा.

• • •

आकृति नं. ३



# आपलीं टेबला-कपाटांत अडकून राहिलेलीं टिपणें

## ' माणूस 'कडे पाठवा . . .

### ' यशाचें रहस्य '

पन्नास हजार वार्षिक प्राप्ति असलेले लोक गव्हर्नर थॉमस डयूई यांच्या मंत्रिमंडळांत बारा हजार डॉलर पगार घेऊन काम करतात. ' अशीं माणसें मिळविणें हेंच माझें काम, ' असें डयूई नेहमीं म्हणतात. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे इंजिनियर त्यांच्या पब्लिक वर्क्स खात्याचे मुख्य आहेत. अमेरिकेंतील सर्वांत मोठे अर्थवेत्ते त्यांचे अर्थमंत्री आहेत. अमेरिकेचे पूर्वींचे सर्जन जनरल त्यांचे आरोग्यमंत्री आहेत. इतर मंत्री अशाच थोर श्रेणींतले आहेत....हे सर्व थोर कर्ते पुरुष गव्हर्नर डयूई यांच्या मंत्रिमंडळांत कां आले ? लाखों रुपयांचें आर्थिक नुकसान त्यांनी कां सोसलें ? कांहीं लोभानें ? इतक्या वर्षांत एका पैचाहि लोभ त्यांनी केला नाहीं. ते डयूईचे मित्र होते काय ? नाहीं. कांहीं जणांनीं डयूईना पाहिलेंहि नव्हतें. मग ?

' कल्याणकारी राज्या ' विषयींची डयूई यांची तळमळ ही ' सांसर्गिक ' आहे. त्यांच्या कक्षेंत माणूस आला कीं त्याला ही ' बाधा ' होतेच. त्या सर्वांनी एकदा जाहीरपणें सांगितलें कीं, ' आतां आम्ही जितकें काम करतों आणि ज्या उत्साहानें व निष्ठेनें करतों तसें पूर्वीं कधींच केलें नव्हतें. ' डयूईवर सर्वांची अनन्यभक्ति आहे. पूर्ण निष्ठा आहे.

मग त्यामुळें हे ' होयबा ' झाले आहेत काय ? डयूईच्या मंत्रिमंडळांत होयबांना जागाच नाहीं. आपापल्या खात्यांत डयूईनी प्रत्येकाला पूर्ण स्वातंत्र्य दिलेलें आहे. मंत्रिमंडळांत चर्चा होते, विचार-विनिमय होतो. पण डयूईनी स्वतःच एकदा सांगितलें कीं, ' माझ्या मंत्रिमंडळांत माझ्याविरुद्ध जितके निर्णय होतात तितके दुसऱ्या कोणत्याहि गव्हर्नराच्या विरुद्ध होत नसतील. ' पण तरीहि तेथे कधी गट पडले नाहीत ! याचें कारण काय ? तेथ सर्वांना ' लोककल्याण ' साधावयाचें आहे !

— डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे

प्रिय वाचक,

शेजारीच डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचें एक माहितीपूर्ण टिपण आम्हीं आपल्यासमोर ठेवलें आहे. यापुढेहि डॉक्टरांचीं अशींच भरीव टिपणें ' माणूस ' मधून आपल्याला वाचावयास मिळतील.

परंतु आपल्यापैकीं जे चांगले वाचक आहेत, त्यांचेजवळहि अशींच छोटीछोटीं टिपणें केलेलीं असणार. या टिपणांची जुळणी करून एखादा लेख तयार करायला फुरसत मिळत नाही, किंवा तशी हातोटी जवळ नाही, अशी आहे आपली खरी अडचण.

परंतु मोठ्या लेखरूपाने नाही तरी छोट्या स्फुट विचारांच्या रूपाने आपलीं टांचणें लोकांसमोर यावींत असें आपल्याला वाटत नाही काय ? कदाचित् त्यांत सर्वांनाच उपयुक्त होईल अशी एखादी माहिती असेल; बहुजनांना मार्गदर्शक ठरेल असा एखादा विचारकण असेल.

असे ठायीं ठायीं विखुरलेले व आपल्या टेबला-कपाटांत अडकून पडलेले स्फुट विचार व उपयुक्त माहिती ' माणूस ' कडे पाठवून द्या. ती सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय विषयांवरील चालेल; यंत्रतंत्रांसंबंधी चालेल; कलाकौशल्या-विषयीं चालेल.

आपले श्रम ' माणूस ' विनामूल्य घेऊं इच्छीत नाही. श्रमपरिहारापुरतें द्रव्य देण्याचा मानस आहे. कळावें.

— संपादक

# मोसंबी

प्रभाकर इनामदार

**आजारी माणूस घरांत असलें तरच आपण मोसंब्याच्या चौकशीसाठीं बाजारांत जातों. वास्तविक एरव्ही मोसंब खाणेंहि फार चांगलें आहे. गरीब माणसालाहि आठवड्यांतून एक मोसंब सहज परवडूं शकेल. आपण मोसंब घेण्याचें ठरवीत असाल, तर श्री. प्रभाकर इनामदार यांनी संग्रहित करून पाठविलेली ही माहिती आपल्याला उपयुक्त वाटेल.**

"मोसंबीं घ्या, मोसंबीं" दारावरून फळवाली ओरडत चालली होती. "मोसंबीं घेऊं या!" मी म्हणालों.

"घरांत कोणी आजारी का आहे?" धर्मपत्नी म्हणाली.

किती खुळी कल्पना! घरांत कोणी आजारी असल्यासच मोसंबीं घ्यावींत, हा गैरसमज सर्वत्र पसरला आहे. अर्थात् याला कारण पैसाच आहे. आज १॥–२ रु. डझन मोसंबीं घेणें सामान्य माणसाला परवडत नाहीं. पण मोसंबीं विकत घेतांना लागणारा पैसा आपण डॉक्टरच्या खिशांतून काढत आहोंत हें किती लोकांच्या लक्षांत येतें! आठवड्यांतून एक तरी मोसंब खाणें सामान्य माणसास परवडेल असें मला वाटतें. खालील माहिती वाचून वाचकांची पण खात्री होईल असा विश्वास आहे.

मोसंब हें नांव, मोझांबिक ह्या आफ्रिकेंतील देशाच्या नांवावरून आलें आहे. कारण, सर्वप्रथम ह्या देशांत मोसंबाची लागवड झाली.

मोसंब पिकण्यास सहा महिने लागतात. सामान्यतः दिवाळीच्या सुमारास मोसंबीं बाजारांत दिसूं लागतात. थोडक्यांत, थंडींत मोसंबीं येतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण वनस्पति-शास्त्रज्ञांनी आता प्रयोगाने अशीं मोसंबीचीं झाडें निर्माण केलीं आहेत कीं, जीं कोणत्याहि मोसमांत मोसंबीं देतात.

### रंगपालट

आपण बाजारांत गेल्यावर पिवळ्या रंगाचीं मोसंबीं निवडतों. कारण, आपली अशी कल्पना आहे कीं, हिरव्या रंगाचीं मोसंबीं म्हणजे न पिकलेलीं मोसंबीं. वास्तविक हिरवा रंग हा Chlorophyll किंवा हरित-द्रव्यामुळे आलेला असतो. मोसंबीं हिरवीं राहतात ह्याला कारण, तीं पिकत असतांना असलेली उष्ण हवा. अशीं मोसंबीं मग "Colouring-room" म्हणजे 'रंग-दालनांत' पाठविलीं जातात. तेथे तीं २४ ते ७२ तास म्हणजे १ ते ३ दिवस ठेवतात. ह्या दालनाचें तपमान ८५° फॅ. असतें. ह्या दालनांत 'इथिलीन गॅस' पण सोडतात. त्यामुळे हिरव्या रंगाचें विरंजन होतें व तीं पिवळीं दिसूं लागतात.

"आमचीं मोसंबीं झाडावरच पिकलीं आहेत" असें फळवाली आपणांस विश्वासाने सांगते. मोसंबीं पिकवावयाचीं असल्यास तीं झाडावरच पिकवावीं लागतात. केळीं, टमाटे किंवा इतर फळांप्रमाणे मोसंबीं तोडल्यावर घरांत पिकत नाहींत.

तुम्हांला मोसंबीं विकत घ्यावयाचीं आहेत काय? मग, नुसत्या रंगावर जाऊं नका हं! तें हातांत घ्या, वजन अजमावा. वजनदार मोसंब्यांत जास्त रस असतो. त्याची साल पातळ आहे का जाड आहे, तें पहा. जाड सालीच्या मोसंब्यांत कमी रस असतो. पण ज्या मोसंब्याच्या वरच्या बाजूस मध्यभागीं वलय असेल, तें जाड सालीचें मोसंब पण उत्कृष्ट समजावें. आकार आणि स्वादिष्टपणा किंवा रसाळपणा यांत समप्रमाणता आहे असें मानूं नका.


### व्हिटॅमिन–पुरवठा

मोसंबीं नुसतीं रंगानेच सोन्याप्रमाणे आहेत असें नाही, तर गुणांनी पण. त्यांत २३ अन्नघटक आहेत. त्यांत "सी" व्हिटामिन (ॲसकॉर्बिक ॲसिड), फळशर्करा, फॉस्फरस, लोखंड, बी व्हिटामिन, बी २ व्हिटामिन आणि नियासीन असतें. मोसंब्यांच्या आहारानें वजन कमी होतें. त्याचप्रमाणे आंतड्यांच्या अल्सर्समुळें आजारी असलेल्यांना पण त्यांचा उपयोग होतो.

मोसंब्याचा रस हाताने काढतां येतो. त्याप्रमाणे यंत्राने पण. यंत्राने काढलेल्या रसांत सालीचें तेल जास्त असतें. कांहीं लोकांना या तेलाच्या अंशाचा तिटकारा असतो. तेलकट अंश उतरूं नये म्हणून हलक्या हाताने रस काढणें योग्य. सामान्यतः ताजा रस सर्वांना पसंत असतो.

रस काढतांना जो चोथा उरतो, तो पण महत्त्वाचा आहे. त्यामध्यें कांहीं क्षार व व्हिटामिन असतात. रस बर्फांत किंवा शीत यंत्रांत (Refrigerator) ठेवल्यास दीर्घ काळ टिकतो.

चिनी लोकांना मोसंबीं सर्वप्रथम माहीत असावींत. इ. स. १७७४ च्या सुमारास त्याच्या २७ जाती असल्याचा उल्लेख आढळतो. मोसंबीं कोलंबसने अमेरिकेंत नेलीं. फ्लोरिडा, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, भूमध्यसमुद्राच्या आसपासचे देश, ब्राझील, जपान, हिंदुस्थान, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलँड, चीन वगैरे देशांत मोसंब्यांचे मळे आढळतात. मोसंबाच्या बियांपासून तेल वा रंग तयार करतात. सालींपासून रंग, कॅरॉटीन तयार करतात. चोथ्यापासून पेक्टिन नांवाचा पदार्थ तयार करतात. यावरून मोसंब्यांच्या सर्व भागांचा कसा उपयोग होतो हें लक्षांत येईल.



# जिल्हा लिहूं लागला! जिल्हा वाचूं लागला!

**श्री. ग. माजगांवकर**
एम्. ए.

## प्रास्ताविक

*सातारा जिल्ह्यांतील गांवशिक्षण मोहिमेच्या फलश्रुतीचा अंदाज घेऊन महाराष्ट्र सरकारनें साऱ्या राज्यांत ही मोहीम हातीं घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. ठिकठिकाणांहून गांव साक्षर करण्याच्या प्रतिज्ञा घेतल्या जात असल्याच्या वार्ता वृत्तपत्रांतून झळकत आहेत. नासिक येथें भरलेल्या महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या अधिवेशनांत या जूनपासून पुढील एक वर्षांत दहा लाख निरक्षरांना साक्षर करण्याचा ठराव नुकताच संमत झालेला आहे. साक्षरता चळवळीचा हा फैलाव याप्रमाणे चालू असतां सातारा जिल्ह्यांतील मूळ कार्याचा, वस्तुस्थिति पाहून घेतलेला हा आढावा सर्वांना उपयुक्त वाटेल असा विश्वास आहे. — संपादक*

साऱ्या महाराष्ट्रांत परवाची शिवजयंती मोठ्या उत्साहांत साजरी झाली हें खरें; पण प्रतापगडावर १७ एप्रीलला उत्सवाचा जो समारंभ साजरा झाला, तो अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण असाच म्हणावा लागेल. या समारंभांत शिवरायांचीं पोकळ स्तुतिस्तोत्रें गाऊन वेळ भागवून नेण्याची दृष्टि नव्हती; तसेंच उत्सवापुरत्या जाग्या होणाऱ्या पुढारी मंडळींचा हा कांहीं एक उरूस नव्हता. सारा सातारा जिल्हा साक्षर करण्याच्या पवित्र उद्देशानें जे कार्यकर्ते गेले २–४ महिने अहोरात्र परिश्रम घेत होते, त्यांनी आपल्या कामाची प्रत्यक्ष वानगी येथे थोडीबहुत दाखविली, हें या समारंभाचें विशेष महत्त्व होतें. झालेलें काम अपेक्षेच्या मानानें फार अपुरें आहे, याची जाणीव ठेवून नव्या उद्दिष्टांच्या प्रतिज्ञाहि महाराष्ट्राच्या या तीर्थक्षेत्रावर अनेकांनी घेतल्या, यामुळेहि या समारंभाच्या वैशिष्ट्यांत अधिक भर पडली. थोडक्यांत म्हणजे हा प्रामाणिक कार्यकर्त्यांचा व कर्तव्यदक्ष सरकारी अधिकाऱ्यांचा एक मेळावा होता. शिवरायांच्या क्रियाशील जीवनापासून नव्या काळाला अनुरूप असा बोध घेणाऱ्या शिवभक्तांची ही एक कामकाजाची बैठक होती.

सकाळपासूनच गडावर उत्सवासाठीं मंडळी जमूं लागली होती. आसपासच्या सुमारें पन्नास पाऊणशे गांवांतून तरी लोकांची रीघ लागलेली होती. सकाळींच सनईवादन, भवानी देवीची पूजा, शिवप्रतिमेचें पूजन इत्यादि कार्यक्रम मोठ्या उत्साहांत पार पडले होते. दुपारी चारच्या सुमारास राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांचें आगमन झालें व एकेका वैशिष्टयपूर्ण कार्यक्रमांनीं सभेच्या कामास सुरुवात झाली. सर्वच सभा नवसाक्षरांनी गाजवली. टेकवली येथील नवसाक्षर भगिनी बानीबाई कोळगणे यांनी अध्यक्षीय सूचना मांडली, तर जावळीचे नवसाक्षर प्रौढ श्री. मोरे यांनी तिला अनुमोदन दिलें. स्वागतपर भाषण, अहवालवाचन हे कार्यक्रमहि नवसाक्षर मंडळींनीच पार पाडले. महाबळेश्वर कलापथकाचें 'जिल्हा लिहूं लागला; जिल्हा वाचूं लागला' हें अभिनयगीत तर राज्यपालांनाहि फार आवडलें. पुढे शेती, अस्पृश्यता, बालसंगोपन, कुटुंब-नियोजन इत्यादि विषयांवर नवसाक्षर भगिनींचीं भाषणें ठेवण्यांत आलीं होतीं, तीहि ठीक वठलीं. यानंतर समूहगीतांचा कार्यक्रम. दोन-तीन गीतांपैकीं एका गीतानें तर सर्वांचेंच लक्ष वेधून घेतलें. पहा त्यांतील कांहीं ओळी; अक्षर-ओळख नसल्यानें किती अडचणी उभ्या राहतात याचें वर्णन करतांना एक बाई म्हणते—

'पत्र आलं बंधवाचं वाचायला येईना ।
नेऊं कुठं वाचायला वाचणार भेटंना ।
गांवाला मी जातें कुण्या मोटारीच समजंना
पाटी हाय तिच्यावर वाचायला येईना ।
साताऱ्या ग शहरामंदि पेट मला घावना !
खोलीचा ग नंबरय वाचायला येईना ।
रात्रिच्या ग शाळा सुरू झाल्या आतां गांवाला ।....

समूहगीतांच्या या कार्यक्रमानंतर राज्यपालांच्या शुभहस्तें साक्षरतेची ज्ञानज्योत प्रज्वलित करण्यांत आली व शिक्षणाची ही ज्योत जिल्ह्यांतील सर्व भागांत पोहोंचविण्यासाठीं उपस्थित अधिकारीवर्गानेहि आपापल्या ज्योति ह्यावर प्रदीप्त करून घेतल्या. थेट गांवापर्यंत या ज्योतीचा प्रकाश पोहोंचावा यासाठीं, खेड्यापाड्यांतून आलेल्या असंख्य नवसाक्षर बंधु-भगिनींनी आपापल्या ज्योति प्रज्वलित करून हातीं घेतल्या. आणि भवानीचें नामस्मरण करून सर्वच उपस्थितांनी 'शिक्षणाची ही पवित्र ज्योत आम्ही अशीच अखंड तेवत ठेवूं' अशा अर्थाच्या प्रतिज्ञा घेऊन समारंभाला एक आगळेंच गांभीर्य प्राप्त करून दिलें. शिक्षणाधिकाऱ्यांनीं घेतलेला कामाचा आढावा, राज्यपालांचें समयोचित भाषण, नवसाक्षर प्रौढानें केलेला समारोप, वंदेमातरम् वगैरे नेहमीचे कार्यक्रम यापुढे थोडक्यांत आटोपल्याने सभेच्या अखेरपर्यंत या गंभीर वातावरणाचा परिणाम कमी झाला नाही. प्रतापगडाच्या पराक्रमी परंपरेला साजेसाच हा नवमहाराष्ट्रांतील विधायक कार्यकर्त्यांचा समारंभ होता, एवढें यासंबंधी सांगितलें म्हणजे पुरें आहे.

## पूर्वीची लादलेली साक्षरता

तसें पाहिलें तर साक्षरतेची चळवळ सातारा जिल्ह्यांत नवीन नाही. गेलीं बरींच वर्षे साक्षरतेचे वर्ग तुरळकपणे खेड्यांपाड्यांतून चालू होते. पण या वर्गांचे अनुभव फारच निराशाजनक होते. वर्ग भरविण्याची जबाबदारी एकट्या प्राथमिक शिक्षकावर पडलेली होती. बिचारा प्राथमिक शिक्षक 'वर्गास या' म्हणून सर्वांना विनंत्या करकरून थकून जात असे. मोठ्या कष्टाने जमवलेल्या कांही मंडळींना पदरचें रॉकेल तेल जाळून 'ग, म, भ, न' शिकवीत असे. ग्रामस्थांना माणसें जमविणें हें मास्तराचें कामच आहे असें वाटे, तर जमलेले प्रौढ आपण शिकतों म्हणजे मास्तरावर मोठे उपकारच करतों या भावनेने वर्गांतील वागणूक ठेवीत असत. या वर्गांना सामूहिक असें कुठलेंच स्वरूप नव्हतें. शिक्षणखात्यामार्फत वर्ग चालविण्याबद्दल प्रत्येक नवसाक्षरामागे शिक्षकाला चार रुपये वेतन मिळत असे म्हणून तो काम करीत असे; तर 'मास्तर मागे लागला आहे; अधूनमधून जाऊं या झालं! बिचाऱ्याचे चार रुपये आपण कशाला बुडवा!' अशा पोक्त विचाराने गांवकरीहि कधीकधी एकत्र जमत असत. शिक्षकाच्या उत्पन्नवाढीचा एक खाजगी मार्ग, एवढेंच या चळवळीचें अखेरचें रूप शिल्लक राहिलें होतें. म्हणून सर्वत्र निराशा होती; अनास्था होती; चालढकल होती; खोट्या नोंदी होत्या; चळवळ बंदच करून टाकावी अशी मनःस्थिति होती.

## साक्षरता चळवळींत बदल

वैचारिकदृष्ट्या या अपयशाचें मूळ साक्षरतेच्या कल्पनेंत आहे, हें कांहीं विचारवंतांनीं दाखवून दिल्यानंतर चळवळीच्या स्वरूपांत पुढे हळूहळू बदल करण्यांत आला. खेड्यांतला प्रौढ केवळ अक्षरओळख करून घेण्यास फारसा उत्सुक नसतो; परंतु त्याला शेती, आरोग्य, नियोजन इत्यादि उपयुक्त विषयांवर जर चौफेर ज्ञान देण्याची व्यवस्था केली, तर तो आजची अनास्था टाकून आपणहून शिक्षण घेण्यास पुढे येईल, अशा कल्पनेने साक्षरताप्रसार-चळवळीला प्रथम 'लोक-शिक्षण' व नंतर 'समाजशिक्षण'—चळवळीचें स्वरूप देण्यांत आलें. साक्षरतेमध्यें अक्षर-ओळख व लिहिणें-वाचणें एवढ्याचाच समावेश होतो. लोकशिक्षणामध्यें अधिक व्यापकता आहे. लिहिणें, वाचणें व त्याचबरोबर इतर सामान्यज्ञान लोकशिक्षणांत दिलें जातें. परंतु लोकशिक्षणामध्यें एकात्मतेचीं व सामूहिक ध्येयवादाचीं बीजें नसल्यानें हाहि पर्याय अपयशी ठरला व त्यांतूनच समाजशिक्षणाचा ध्येयवाद उत्क्रांत झाला. समाजशिक्षणामध्यें व्यक्तिविकासापेक्षा समाजविकासाचें ध्येय पुढे ठेवलेलें असतें. सामाजिक ध्येयवादाच्या आकर्षणामुळे सारा गांव जागा होईल, 'शिक्षण द्या' म्हणून सुशिक्षितांच्या मागे लागेल व त्यामुळे गांवच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाचीं चक्रेंहि वेगाने फिरूं लागतील, अशा अपेक्षेने समाजशिक्षणाचें काम हातीं घेण्यांत आलें.

परंतु चळवळीच्या वैचारिक कक्षा विस्तृत झाल्या होत्या, तरी प्रत्यक्ष संघटनेंत कसलाहि मूलगामी बदल त्याबरोबर घडून न आल्यानें साक्षरता प्रसाराचे वर्ग एवढेंच तिचें स्वरूप परवापर्यंत कायम राहिलें होतें. गांवाला ध्येयवादाची मिठी पडत नव्हती व शिक्षणकार्याला अपेक्षित असें नवीन वळण कांहीं लागत नव्हतें.

## अवचित घडलेला चमत्कार

अशा रडतखडत अवस्थेंत साक्षरतेचे वर्ग तुरळक ठिकाणीं चालू असतां मध्येच एक लहानसा चमत्कार झाला. हा चमत्कार कोणा एका व्यक्तीने जाणूनबुजून योजनापूर्वक केला असें म्हणवत नाही; तसेंच तो करण्यामागील हेतु शुद्ध सामाजिक ध्येयवादाचाच होता असेंहि निश्चितपणें सांगतां येत नाही. कोणत्याहि हेतूने का असेना, पण गोष्ट अशी घडली की, कोरेगांव तालुक्यांतील ल्हासुर्णे

या गांवच्या प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनीं ' सर्व गांव साक्षर होणार असेल, तर शिक्षकांना या कामासाठी मिळणारी सर्व रक्कम शिक्षक आपणहून गांवच्या विकासासाठी देण्यास तयार आहेत' अशी एक घोषणा एका सभेच्या प्रसंगी करून टाकली. जवळजवळ १६०० रुपयांचा हा प्रश्न होता. गांवकऱ्यांनी हें कार्य मनावर घ्यायचें ठरविलें आणि शुक्रवार ता. १० जून १९६० या दिवशीं नवलाईदेवीच्या चौकांत जी सभा झाली, त्यांत सारा गांव साक्षर करून दाखविण्याच्या प्रतिज्ञाहि घेण्यांत आल्या. नारळ फुटला; दुसऱ्याच दिवसापासून लगेच कामाला सुरुवातहि झाली.

## आदर्श ल्हासुर्णें गांव

ल्हासुर्ण्याच्या गांवकऱ्यांनी कामाची पद्धत मात्र फारच व्यवस्थितपणे बसविली होती. प्रथम गांवांतील झाडून साऱ्या निरक्षरांची संख्या घेण्यांत आली. सुमारे ४०० निरक्षर गांवांत निघाले. या निरक्षरांसाठी सोयीस्कर ठिकाणीं एकूण चौदा वर्ग उघडण्यांत आले. स्त्री–पुरुषांचे वर्ग अर्थातच वेगवेगळे होते. वर्ग चालविण्याची जबाबदारी शाळा–शिक्षक व कांहीं सुशिक्षित ग्रामस्थ यांचेवर पडली. प्रत्येक वर्गाचा हजेरीपट ठेवण्यांत आला व त्यांतील सर्व प्रौढांना हजर ठेवण्यासाठी प्रत्येकी चार–चार ग्रामस्थांची एक, याप्रमाणे एकूण चौदा तुकडया करण्यांत आल्या. या तुकडयांचे सभासद घरोघर जाऊन माणसें वर्गांत हजर करीत व वर्ग चालू असेपर्यंत कोणी निघून जाऊं नये, कोणीं गांवगुंडाने वर्गाला त्रास देऊं नये म्हणून दक्षता ठेवीत असत. या चौदा तुकडयांवर व एकूण सर्वच वर्गांवर निरीक्षण ठेवण्याचें काम दहा जणांची एक गांवसमिति करीत असे. कोणी स्त्री-पुरुष वर्गाला गैरहजर राहत असतील, तर त्यांना भेटून त्यांचें शंकानिरसन करणें, आल्यागेलेल्यांना वर्ग हिंडून दाखविणें व एकूण सर्वसाधारण व्यवस्थेची जबाबदारी घेणें इत्यादि कामें या ग्रामसमितीकडे होतीं. ही सारी व्यवस्था गांवकऱ्यांनीं आपल्याच अकलहुशारीने आखली होती, कोणताहि पुढारी किंवा सरकारी अधिकारी मार्गदर्शनासाठी त्यांनी आणला नव्हता, ही यांतील सर्वांत महत्त्वाची गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे.

## कलेक्टरांना झालेलें दर्शन

व्यवस्था आंखून झाल्यावर कामासहि तेवढ्याच तडफेनें सुरुवात झाली. ल्हासुर्णे हें गांव कोरेगांव स्टेशनपासून दोन मैल अंतरावर येतें. शाळेंतील कांहीं शिक्षक कोरेगांवहून ल्हासुर्ण्यास रोज येत असतात. वर्ग सुरू झाल्यावर त्यांना रोज दोन वेळां यावें-जावें लागत असें व त्यामुळे चार महिने त्यांना असह्य ताण सहन करावा लागला ही वस्तुस्थिति आहे. गांवांतच राहणाऱ्या शिक्षकांना तर चोवीस तासहि अपुरे पडत. कंटाळा हा शब्दच गांवकरी त्यांना उच्चारूं देत नसत. रात्रीं दोन दोन वाजेपर्यंत वर्ग चालू राहत होते. वर्गा-वर्गामध्ये स्पर्धा लागून राहिल्या होत्या. भिंतीभिंतीवर म्हणी व बोधवचनें लिहिलीं गेलीं होतीं. अधिकाऱ्यांच्या खेपा चालू झाल्या, तेव्हा त्यांना सारा गांव गाण्यांनी, कवितांनी व अभंगांनी अक्षरशः घुमत असल्याचें विलक्षण दृश्य पाहावयास मिळालें. प्रत्यक्ष कलेक्टरमजकूर दोन तीन वेळां न सांगतां एकदम रात्रीच्या वेळी गांवांत हजर झाले होते म्हणे! वर्गा-वर्गांतून ते हिंडले. कुठे त्यांना गाणीं ऐकायला मिळालीं, कुठें एखादी नवसाक्षर महिला धार काढण्यावर भाषण देतांना पाहायला सांपडली, तर एका ठिकाणी कलेक्टरांनाच ' आपली ओळख करून द्या ' म्हणून सांगणारी खेडवळ पण शिक्षणाचें वारें प्यालेली एक बाई आढळून आली. चार महिने शिक्षणाचा एक समुद्र गांवांत उसळत होता. त्याच्या गंभीर निनादानें येणारे-जाणारे लहानमोठे पाहुणे स्तिमित होत होते. त्याच्या उसळणाऱ्या लाटा आसपासच्या पांच-दहा गांवांतून तर वाहूं लागल्याच; पण सारा सातारा जिल्हाच या लाटेवर स्वार होणार कीं काय, अशीं चिन्हेंहि दिसूं लागलीं.

## ल्हासुर्ण्यानें अज्ञानासुर मारला

१० सप्टेंबर या दिवशीं या समाजशिक्षण मोहिमेची सांगता झाली. एक हृदयस्पर्शी समारंभ यानिमित्त गांवांत घडून आला. गांवांतील घरांच्या भिंती नव्यानें रंगविण्यांत आल्या होत्या. रस्ते झाडून स्वच्छ ठेवण्यांत आले होते. सडासंमार्जनें व रांगोळ्या यामुळे गांवाला प्रसन्न शोभेची एक नवीनच कळा चढली होती. नवलाई देवीसमोर सभा भरली. शिक्षणाधिकारी श्री. पवार व कमिशनर श्री. मोहिते यांच्यासारखी बडी मंडळी पुण्याहून या समारंभासाठीं मुद्दाम आली होती. पाहुण्यांना मिरवणुकीने सभास्थानीं आणण्यांत आले. सर्व सभा नवसाक्षर महिलांनीच चालविली. एकीने अध्यक्षांची सूचना मांडली; दुसरीने तिला अनुमोदन दिलें. तिसरीनें गांवशिक्षणाची माहिती दिली. ग्रामपंचायतीच्या कारभाराबद्दल चौथी बोलली. गांवाने श्रमदानाने केलेल्या कामाचें निवेदन पांचवीनें केलें. स्वयंपाकघर कसें असावें हें सहावीनें सांगितलें. शिक्षणाधिकाऱ्यांनीं कांहींच्या परीक्षा घेतल्या. तोहि कार्यक्रम

## ऋणनिर्देश

१९५९ मधील मे महिन्यांत राजहंस प्रकाशनातर्फे पुण्याजवळील खेडशिवापूर या गांवांत एक प्रायोगिक वाचनालय कांहीं काळ चालविण्यांत आलें होतें. ग्रामीण जनतेच्या वाचनविषयक गरजांची पाहणी करणें हा या प्रयोगामागील हेतु होता.

या वाचनालयासाठीं पुण्यांतील दहा प्रकाशन-संस्थांनीं आपलीं कांहीं पुस्तकें विनामूल्य भेट म्हणून दिलीं होतीं. या सहकार्याबद्दल आम्ही ' माणूस ' च्या पहिल्याच अंकांत या सर्वांचे प्रकट आभार मानीत आहोंत. कारण, ' माणूस'च्या निर्मितीमध्यें या प्रयोगाचाहि थोडासा वांटा आहे.

खालील प्रकाशन-संस्थांनीं आम्हांस त्यावेळीं सहकार्य दिलें होतें :—

बोरा आणि कंपनी
चित्रशाळा प्रकाशन
इनामदार बंधु
आनंद कार्यालय
साधना प्रकाशन
यशवंत प्रकाशन
भालदार प्रकाशन
अनाथ विद्यार्थि गृह
राजहंस प्रकाशन
किर्लोस्कर प्रेस

या सर्वांचे आम्ही ऋणी आहोंत.

—संपादक


यथास्थित पार पडला. पुढे ज्ञानदीप प्रज्वलित करून सर्वांनी साक्षरता टिकविण्याबद्दल शपथा घेतल्या आणि पवार-मोहिते यांच्या भाषणांनी सभा संपली. '**कृष्णाने नरकासुर मारला तसा ल्हासुर्ण्यांच्या जनताजनार्दनाने अज्ञानासुर मारला ! धन्य धन्य ल्हासुर्णे !**' हे पत्रारांचे उद्‌गार आजहि गांवकरी येणाऱ्या-जाणाऱ्याला मोठ्या अभिमानाने सांगत असतात, एवढा हा समारंभ संस्मरणीय होता; नेत्रांचें पारणें फेडणारा होता.

## नव्या मोहिमेचीं दोन वैशिष्ट्यें

ल्हासुर्ण्याच्या यशामुळे आसपासचीं कुमठें, शिरढोण, चिमणगांव, पडवळें, सासपडें—इत्यादि दहा–पांच गांवें भारून गेलीं व तेथेहि समाजशिक्षणाची लाट उसळली हें तर खरेंच; पण या यशाचा मुख्य परिणाम अधिकारी-वर्गावर झाला हें विशेष आहे. ल्हासुर्ण्याच्या आदर्शाप्रमाणे साऱ्या जिल्ह्यांतच कार्याचा डोंब उसळवून टाकण्याचें स्वप्न अधिकाऱ्यांच्या मनःश्चक्षूंसमोर तरळू लागलें आणि त्याप्रमाणें त्यांनी हालचालींना आरंभहि केला. समाज-शिक्षणाच्या या नव्या पर्वाचीं दोन मुख्य लक्षणें होतीं. यापूर्वी हें कार्य प्रामुख्याने शाळा–खात्यामार्फतच जें चालू होतें, त्या-ऐवजी आता सरकारचीं इतरहि खातीं आपापला हातभार लावण्यास पुढे सरसावलीं. शेतकी, पोलिस इत्यादि खात्यांचें सहकार्य जरी अपेक्षित असले तरी वस्तुतः महसूल खात्यानेच शिक्षकांच्या खालोखाल जबाबदारीचा वांटा उचलला हें या पर्वाचें एक वैशिष्ट्य. तुरळक ठिकाणीं समाजशिक्षणाचे वर्ग चालवून जमतील तेवढे निरक्षर साक्षर करण्याचा पूर्वीचा कार्यक्रम बदलून शंभर टक्के साक्षरतेचें, दोन महिन्यांत संपूर्ण गांवांतून निरक्षरतेचें उच्चाटन करण्याचें निश्चित उद्दिष्ट यापुढे डोळ्यांसमोर ठेवण्यांत आलें, हें या मोहिमेचें दुसरें एक वैशिष्ट्य होतें ! या उठावाच्या उद्दिष्टामागील प्रेरणा कोणत्या होत्या त्या निश्चित कांहीच सांगता येत नाहीत. कदाचित् १९६१ च्या जनगणनेच्या वेळीं सातारा जिल्हा शिक्षणाच्या दृष्टीने भारतांतील सर्व जिल्ह्यांत आघाडीवर नोंदला गेला पाहिजे, ही सार्थ प्रादेशिक अभिमानाची प्रेरणा यामागे असेल; किंवा एखाददुसऱ्या अधिकाऱ्याच्या वैयक्तिक उन्नतीच्या मर्यादित भावनाहि त्याच्या बुडाशीं असतील. उद्देश भिन्नभिन्न स्वभावधर्माप्रमाणे भिन्नभिन्न पातळीचे राहणारच. परंतु एक चांगलें उद्दिष्ट ठरलें व त्याप्रमाणे कामाला आरंभहि झाला ही वस्तुस्थिति मात्र स्वच्छ आहे.


## गांवशिक्षण मोहिमेचा श्रीगणेश

कवठें या गांवीं नामदार श्री. मोरारजी देसाई यांच्या हस्तें दि. १ नोव्हेंबर १९६० रोजीं गांवशिक्षण मोहिमेचा नारळ फुटला. प्रचारसभा हा मोहिमेचा पहिला टप्पा. जवळ जवळ सातारा जिल्ह्यांतील प्रत्येक गांवांत सरकारी अधिकारी म्हणा, शिक्षण खात्यांतील सेवक म्हणा, एखादा सामाजिक कार्यकर्ता म्हणा, यांपैकी कुणीतरी एखादी तरी प्रचार-सभा या कालावधींत घेतलेली आढळून येते. सभा घेणाऱ्याच्या प्रभावी प्रचारतंत्रावर बऱ्याचशा गोष्टी अवलंबून राहत. शिक्षणाचें सर्वसाधारण महत्त्व, देशाची गरज, इंग्लंड, फ्रान्स-जर्मनीचीं उदाहरणें या प्रकारच्या मोघम वक्तृत्वाचा कांहीहि उपयोग होत नसे. पण कोणीं जुन्या धार्मिक, ऐतिहासिक स्मृतींचा धागा जोडला, व्यावहारिक दाखले भरपूर दिले, तर असल्या आवाहनांचा चटकन् प्रभाव पडे. दोन यशस्वी सभांचीं उदाहरणेंच पाहा ना ! स्त्रियांच्या एका सभेंत प्रचारक सांगतो— 'गोकुळाष्टमीचा उत्सव साजरा करतां; कृष्णाचा पाळणा सजवतां; पाळण्यांत नसलेल्या कृष्णासाठी गाणीं म्हणतां; पण घरांतल्या तुमच्या बाळकृष्णाला शिव्याशाप देतां, त्याला हिडीसफिडीस करतां. शिक्षण घेतलें तर खरा बाळकृष्ण घरांत आहे, पाळण्यांत नाहीं हें तुम्हांला समजेल व त्याची वाढ कशी करावी हें आपोआप तुमच्या ध्यानांत येईल. म्हणून रात्रीच्या शाळेला हजर राहा.' प्रौढ शेतकऱ्यांच्या सभेंत हाच प्रचारक म्हणतो, 'वरच्या पांढरपेशा समाजांतील मुलें चटकन् वरच्या वर्गांत जातात. त्यांना चांगले गुण मिळतात. तुमचा बाब्या मात्र रखडत राहतो. का ? बाब्याजवळ बुद्धि कमी आहे म्हणून नाही; तर शाळा संपल्यावर



● **समाज शिक्षण वर्ग, ल्हासुर्णे**

**स्त्रियांचे वर्ग अर्थात्‌च भरगच होते.**



● **श्री. रा. द. कदम, ल्हासुर्णे**

**" शिक्षकांसाठीं राष्ट्रीय पुरस्कार " स्वीकारतांना**

बाप्याच्या अवतीभवती, घरींदारीं शिक्षणाचें वातावरण नाहीं. त्याला चांगले संस्कार इतर वेळीं मिळत नाहींत. पांढरपेशा, सुशिक्षित समाजांतील मुलांना या वातावरणाचा फायदा मिळतो. म्हणून तीं चटकन् पुढें जातात. आपलीं मुलें मागे राहतात. आपल्या मुलांनी पुढे यावें असें वाटत असेल, तर आईबापांनी प्रथम शिकलें पाहिजे; घरांतील वातावरण सुशिक्षितपणाचें ठेवलें पाहिजे. म्हणून शिक्षणाच्या वर्गांत सर्वांनी दाखल व्हा. स्वतःसाठीं नाही; आपल्या मुलाबाळांसाठीं.'

## गांव-समित्या आणि गृह-वर्ग

प्रचार सभेमुळे वातावरण निर्माण झालें की, प्रत्यक्ष कार्याच्या अंमलबजावणीसाठीं बहुतेक ठिकाणी ल्हासुर्ण्याच्या वळणावर एखादी गांवसमिति नेमण्यांत येई. गांवची लोकसंख्या, निरक्षरांची संख्या इत्यादि माहिती जमा झाली कीं, सोयीस्कर पडतील अशा पोटसमित्या स्थापन करण्यांत येत. पोटसमित्या व मुख्य समिति यांनी वर्गासाठीं जागा निवडणें, दिवाबत्ती, फळे, शिक्षण-साहित्य इत्यादि अवश्य बाबींचा पुरवठा करणें, प्रौढांना वर्गासाठी एकत्र करणें, इत्यादि कामें करावींत अशी अपेक्षा होती. वर्ग चालविण्याची जबाबदारी मात्र मुख्यतः शिक्षकांवरच पडलेली होती. ज्या ठिकाणी शिक्षक कमी, निरक्षर जास्त, तेथे वरच्या वर्गांतील मुलांनीहि शिक्षणाचें काम केलें; शाळेंतील मुलांनीं घरच्या घरींच वर्ग भरवून घरांतील निरक्षरांना शिक्षण देण्यासाठी 'गृहवर्ग' चालविण्याचा प्रयोगहि कांहीं ठिकाणी करण्यांत आला. साठ दिवसांची हजेरी, जोडाक्षरविरहित अक्षरज्ञान, अंकलिपि एवढी तयारी झाली की, प्रौढ पहिल्या कसोटीला लायक ठरत. परीक्षा घेण्याबद्दल शिक्षकांकडून भाग शिक्षणाधिकाऱ्यांकडे सूचना केली जाई व त्याप्रमाणें अधिकारी गांवांत जाऊन प्रौढांच्या परीक्षा घेत असत. ज्या ठिकाणी गांवांतील सर्व स्त्री-पुरुष निरक्षर पहिल्या कसोटींत उत्तीर्ण होत असत, तेथे एखादा 'ग्राम गौरव' समारंभ साजरा केला जाऊन त्यांत साक्षरता टिकविण्याबद्दल गांवकऱ्यांकडून प्रतिज्ञा घेतल्या जात. हा कार्यक्रम म्हणजे गांवशिक्षण मोहिमेचा जणू शेवटचा टप्पाच होय.

## ग्रामगौरवांचे कांही आकडे

ग्रामगौरव पदवीस पोहोचलेल्या गांवांची संख्या जिल्ह्यांत एकूण २००।२५० च्या घरांत असावी. सातारा जिल्ह्यांत सुमारे १४००।१५०० गांवें येतात. याचा अर्थ शेकडा १० ते १५ या प्रमाणांत संपूर्ण गांव साक्षर करण्याची मोहीम सध्या यशस्वी झाली आहे असा होतो. कऱ्हाड, पाटण, कोरेगांव इत्यादि पुढारलेल्या तालुक्यांतून शेकडा २५ ते ३० टक्के यश पदरांत पडलेलें आहे, तर जावळी, परळी या भागांत तुरळक ठिकाणींच ग्रामगौरव अद्यापपर्यंत साजरे होऊं शकलेले आहेत. पण केवळ ग्रामगौरवांचे आकडे फारसे मार्गदर्शक ठरणार नाहींत. जेथें संपूर्ण गांव साक्षर झालेला आहे अशा कांहीं ठिकाणी तरी ग्रामगौरव समारंभ व्यावहारिक अडचणीमुळे साजरे होऊं शकलेले नाहीत, हें एक कारण; गांव साक्षर झालेलें आहे, परंतु परीक्षा घेण्याची सोय होऊं न शकल्याने त्यांची नोंद मात्र 'साक्षर' म्हणून झाली नाहीं, हें आणखी एक कारण. दुसऱ्या बाजूला घाईघाईने परीक्षेचें नाटक उरकून ग्रामगौरव पदरांत पाडून घेतल्याचे प्रकारहि झालेले आहेत; तर एका ठिकाणी गांवच्या एकूण लोकसंख्येपेक्षा साक्षर मंडळींची संख्याच अधिक दाखविण्याचा विक्रमहि करून दाखविण्यांत आलेला आहे !!


## कांहीं स्फूर्तिदायक दृश्यें

ग्रामगौरव समारंभाच्या आकड्यांवरून या मोहिमेचें यशापयश मोजणें म्हणूनच घातुक आहे. जिल्ह्यांत २००।२५० गांवें साक्षर झालेलींहि असतील. पण या देखाव्याला फारसा अर्थ नाहीं. अर्थ आहे तो याला कीं, मोहिमेच्या काळांत जिल्ह्यांतील बहुतेक ठिकाणीं निदान दोन महिने तरी समाज-शिक्षणाचे वर्ग उघडण्यांत आले व असंख्य ग्रामस्थांनीं त्यांत भाग घेतला. शिक्षणाचें एक तुफान दोन महिने या जिल्ह्यांत उफाळत होतें हें एक सत्य आहे. जावळी-सारख्या डोंगराळ व मागासलेल्या तालुक्यांत, जेथे गांव गाठायचा म्हणजे सात-सात, आठ-आठ मैल पायपीट करावी लागते अशा दुर्गम भागांत, एकाकी शिक्षक रात्रीच्या वेळी, दिव्याच्या मिणमिणत्या उजेडांत, प्रौढांना अक्षराची ओळख घडवतो यांत कांही तरी विशेष आहे. पाट्या नाहीत, पेन्सिली नाहीत, फळ नाहीत; अशा वेळीं गांवकऱ्यांनी गुळाच्या काहिलींचा फळ्यासारखा उपयोग करणें व खडूची उणीव कोळशाने भरून काढून आपला शिक्षणाचा वर्ग चालू ठेवणें, यांत कांहीतरी नवीन आहे. स्त्रियांनीं भाकरीच्या तव्यांचा पाट्यासारखा उपयोग करणें, रानांत जाणाऱ्या प्रौढ गुराख्यांनी म्हशींच्या पाठीवर अक्षरें लिहून अभ्यास चालू ठेवणें, लहान मुलांनी आपल्या आईवडिलांजवळ, काका-मामाजवळ 'शिक्षण घ्या, लिहावाचायला शिका' म्हणून हट्ट धरून बसणें या दृश्यांत चैतन्य नाहीं असें कोण म्हणेल ?

## अचानक घडलेला साक्षात्कार !

सायंकाळची वेळ होती. सायकलवरून एका ग्रामगौरव साजरा झालेल्या गांवाकडे निघालों होतों. वाटेंतच सोसाट्याच्या वाऱ्यानें व त्यामागोमाग आलेल्या वळीवाच्या पावसाने झोडपण्यास प्रारंभ केला. पुढे जाणें अगदी अशक्य झालें, म्हणून वाटेंतल्या एका लहानशा वाडीकडे वळलों व देवळांत आसरा घेतला. दिवसभर कांहीच काम झालें नव्हतें; नवीन कांहीच पाहायला मिळालें नव्हतें; आणि ठरलेल्या कार्यक्रमांत पावसाने हा व्यत्यय आणला ! मन जरा नाराजच झालें. मग विचार आला, हीच वाडी कां पाहूं नये ! ठरलेलें गांव नाही तर नाही, वाटेवर सहज भेटलेल्या गांवांत जें दिसेल तेंच खरें. म्हणून चौकशीला सुरुवात केली. गांवांतील सगळी कर्ती मंडळी लग्नासाठी बाहेरगांवीं गेली होती असें समजलें. मग होतीं—नव्हतीं तीं जुनीं म्हातारीं माणसें देवळांत बोलावून घेतलीं. वर्ग या गांवांत दोन महिने चालू होता. पुढे बंद पडला, पण पुन्हा चालू व्हावा असें गांवकऱ्यांना वाटतें. कंदिलाची अडचण पडली असें कोणी म्हणाले. 'कंदिल-रॉकेलसाठी पंचवीस रुपयांपर्यंत खर्च करा; सरकार ती रक्कम देईल, असा कलेक्टरांचा ग्रामपंचायतींना हुकूम असतांना ही अडचण कां भासावी ?' असा मीं प्रश्न केला. पंचायत उदासीन, शिक्षकाला ही सोय माहीत नाही, गांवकरी अज्ञानांत, अशी परिस्थिति. तरीहि वडाच्या वाडीला दोन महिने वर्ग चालू होता, हीच घटना मला खरी अर्थपूर्ण वाटली. तेथे जमलेल्या प्रौढांपैकीं एकासमोर सहज मी एक कागदाचा तुकडा टाकला. माझी पेन

[पान २५ वर चालू




**प्रतापगड ● ●**

दि. १७ एप्रिल १९६१.
शिवजयंतीच्या सुमुहूर्तावर महाराष्ट्र राज्यांत गांवशिक्षण मोहिमेचा शुभारंभ झाला.
राज्यपाल श्रीप्रकाश ज्ञानदीप प्रज्वलीत करीत आहेत.
शेजारी सातारा जिल्हाधिकारी श्री. देशमुख

**दोन ग्राम गौरव समारंभ**




● फुलेनगर ( वाई )



● सासपडें ( कोरेगांव )

● नवसाक्षरांची अक्षरसाधना






त्याला दिली. लाजत लाजत, आढेवेढे घेत त्याने आपलें नांव माझ्यासमोर कागदावर लिहिलें. बाकी सारं तो विसरला होता. पण नांव, गांव पत्ता तरी लिहूं शकला. जें पाहायचें होतें तें पावसामुळे हुकलें, तरी जें पाहायला मिळालें तें कांही कमी चांगलें नव्हतें. शिक्षणाचा मंत्र येथेहि घुमला होता. येथेहि ज्ञानदीपाचा प्रकाश कांही काळ उजळला होता. मोहिमेच्या फलश्रुतीचा खरा आंकडा हाच. तो या वाडीने मला दाखविला, म्हणून मी संतुष्ट होतों. पावसाचे आभार मानीत होतों.

वळीवाच्या सरीने शेती पिकली नाही, तरी सृष्टीचा रखरखीतपणा कमी होतो. गांवशिक्षणाच्या वळीवाने एवढें कार्य सातान्यांतील माण, फलटण इत्यादि भागांतील अगदी उजाड माळरानावरदेखील करून दाखविलें आहे, यांतच मला आनंद वाटत होता.

• • •

## महत्त्वाचा घटक कमकुवत

या मोहिमेंत काम करणारे घटक तीन. प्राथमिक शिक्षक, महसूलखात्याचा सेवकवर्ग आणि गांवसमिति. यांपैकी प्राथमिक शिक्षकाचें आजचें गांवातील स्थान, त्याची नोकरपेशा वृत्ति आणि आर्थिक पातळी या सर्वांचा विचार करतां त्याच्याकडून फारच मोठ्या कार्याची अपेक्षा या मोहिमेंत बाळगली गेली ही वस्तुस्थिति प्रथम ध्यानांत घेतली पाहिजे. वास्तविक हें कार्य स्वतंत्र व समृद्ध व्यक्तिमत्त्व असणान्या एखाद्या समाजसेवकाचें. केवळ आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावानें गांवची लोकशक्ति जागी करून, तिला विवेकाचें व सुसंस्काराचें इष्ट तें वळण लावावयाचें, म्हणजे त्यासाठी 'उत्तम गुणीं शृंगारला। ज्ञानवैराग्यें शोभला।' या कोटींतील एखादा 'श्रीमंत योगीच' हवा. त्यामानानें आमचा गांवांतील प्राथमिक शिक्षक आज कोठे आहे? आवड म्हणून समाजशिक्षणाचें हें कार्य करणारे दहा शिक्षक कांही मला या दौन्यांत पहायला मिळाले नाहींत. पूर्वी चार रुपये दर नवसाक्षर प्रौढामागे मिळत होते, तेहि आता मिळत नाहींत हीच बहुतेकांची तक्रार! पोटासाठी नोकरी पत्करलेला, अधिकारी दडपूं म्हणेल तर दडपला जाणारा, पुढान्यांच्या किंवा गांवदादांच्या लहरीप्रमाणे मागेपुढे करणारा, गांवांतील दुहींच्या रस्सीखेचींत सर्व बाजूंनी ओढला जाणारा, कुणाशींच वैर नको म्हणून डळमळीत व त्रयस्थ वृत्तीनेच गांवाशी संबंध ठेवणारा आमचा हा प्राथमिक शिक्षक! त्याची इच्छा असली, तरी त्याचा परावलंबी नोकरपेशा आणि गांवांतील त्याचें स्थान त्याला फारसें प्रभावी कार्य करूं देणार नाही हें अगदीं उघड आहे. भरीस भर म्हणून या मोहिमेच्या कालावधींत जनगणनेचें कामहि त्याच्याच अंगावर पडलें. समाजशिक्षण, जनगणना किंवा इतर नैमित्तिक स्वरूपाचीं कामें अंगावर पडलीं, तर शाळा शिकविण्याची किंवा चालविण्याची नित्याची जबाबदारीहि हा शिक्षक व्यवस्थितपणें पार पाडूं शकत नाही, अशी वस्तुस्थिति आहे. मोहीम आखतांना, तिचें उद्दिष्ट व कालावधि निश्चित करतांना, मुख्य घटकाची ही कमकुवत तब्येत आम्हीं ध्यानांत घेतली होती काय?

## तलाठी, शिक्षक सारखेच!

केवळ शिक्षक आपल्या जोरावर आजच्या परिस्थितींत हें कार्य करण्यास असमर्थ आहे हें ध्यानांत आल्यामुळेच की काय, या मोहिमेंत महसूलखात्याने आपला नोकरवर्ग गुंतविण्याचा संकल्प केला. मी पाहिलेल्या चार तालुक्यांत केवळ एका तालुक्यांतील महसूल अधिकान्यांच्या कामाविषयीं शिक्षकांनी समाधानाचे उद्गार काढले. मामलेदार, विकास योजनाधिकारी वगैरे मंडळी या ठिकाणी गांवांत जात असत. सभा, बैठका घेत असत. गांवकन्यांना वर्गाला हजर राहण्याविषयीं सत्तेनें सांगत असत. कर्जमंजुरी, तगाई वगैरे प्रकरणीं साक्षरतेचा विचार केला जाईल असा व्यावहारिक लाभालाभाचा चिमटाहि काढीत असत. जेथे महसूलखात्याने एवढेंच क्षेत्र आपल्यासाठी आखून घेतलें, तेथे शिक्षकांचें कामहि पुष्कळच सोपें झालें व एकूण यशाचें मापहि चढतें राहिलें. पण बहुतेक ठिकाणीं कामाची विभागणी नीट झाली नाही. मामलेदारसाहेबांनी मोहिमेचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घ्यावींत, तलाठ्याप्रमाणेच शिक्षकाला दावणीला जुंपण्याचा प्रयत्न करावा, मग खात्यांच्या अधिकारक्षेत्राविषयीं वाद निर्माण व्हावा, त्यांतून संघर्ष व शेवटी कामाचा खोळंबा हे प्रकार अनेक ठिकाणी ऐकावयास मिळाले. कुठे रस्त्याच्या कडेला असणान्या गांवांना जीपमधून 'व्हिजीट' देऊन काम केल्याचा देखावा उभा केल्याची परिस्थितीहि पाहावयास सांपडली. दोन शेजारीशेजारी असणान्या गांवांपैकीं एका गांवांत महसूल अधिकारी वरचेवर येऊन शिक्षणाच्या कामाला चालना देतात आणि दुसऱ्या गांवांत संपूर्ण मोहिमेच्या कालावधीत महसूलखात्याचा एकहि अधिकारी डोकावत नाही हाहि प्रकार नवीनच दिसला. शिक्षणखातें व महसूलखातें यांनी प्रथमच विचारविनिमयानें सहकार्याची एकादी योजना निश्चित केली असती, तर असल्या विसंगति व संघर्षाचे प्रसंग सहज टाळतां येऊन कामाला अधिक उठाव देतां आला असता. 'सहकार' हा बोलायला सर्वांत सोपा व आचरण्यास सर्वांत अवघड असा विषय आहे याची जाणीव यापुढे आम्हीं बाळगणें यासाठीच फार अवश्य आहे.

## दिखाऊ गांवसमित्या

मोहिमेंतील तिसरा घटक म्हणजे गांवसमित्या. गांव करील तें राव करूं शकणार नाही ही अगदी वस्तुस्थिति आहे. शिक्षक कितीहि तळमळीचा असला, महसूलखात्याच्या सेवकवर्गानें सत्तेचें कितीहि दडपण गांवावर आणलें, तरी जोंपर्यंत गांवांतील जनशक्ति जागी होत नाहीं तोंपर्यंत कोणतेंच काम गांवांत उभें राहणार नाहीं आणि राहिलेंच तरी तें फार काळ टिकणारहि नाही. विकासयोजनां जवळ नाही का आज पैसा मुबलक आहे, हातीं सत्ता आहे? पण गांवोगांव इमारती उठविण्यापेक्षा अधिक कोणतेंहि मौलिक परिवर्तन या योजना करूं शकत नाहीत हें दिसतच आहे. तोच नमुना या समाजशिक्षण मोहिमेचा होऊं नये, म्हणून गांवसमित्या स्थापन करण्याची कल्पना निघाली. कल्पना अगदी स्तुत्य. कारण ल्हासुर्ण्यांत सर्व कार्य अशा गांवसमित्यांनीच घडवून आणलें होतें. पण गांवांत शिक्षणाची लाट उसळल्यानंतर तिला योग्य वळण लावण्यासाठी गांवाने आपणहून समित्या स्थापन करणें वेगळें आणि तलाठी-मामलेदार यांनी घाईघाईने गांवाला भेट देऊन सरपंच-पुढारी-पाटील यांची एक नाममात्र समिति स्थापन करून त्यांच्यावर समाजशिक्षणकार्याची जबाबदारी टाकणें वेगळें. ल्हासुर्ण्याचा सांगाडा उचलला; त्यांतलें चैतन्य मात्र सांडून गेलें.

[ पान ३० वर चालू

कायद्याची तोंडओळख :

सर्वसामान्य माणसाला नित्यनव्यानें अंमलांत येणाऱ्या कायद्यांची माहिती फारशी असत नाही. पण आजच्या काळांत ती तशी असणें अत्यावश्यक आहे. या सदरांत तसा उपक्रम हातीं घेण्यांत येत असून त्याचा हा प्रारंभ—

# हुंडा प्रतिबंधक कायदा

— मा. दि. कुलकर्णी, सातारा

गेल्या सप्ताहांतच लोकसभेच्या अधिवेशनांत हुंडा प्रतिबंधक बिलाचें वाचन पूर्ण झालें. दोन्ही सभागृहाची संयुक्त बैठक होऊन एखादें बिल पसार होणारा हा कपिलाषष्ठीचा योग या बिलामुळे जुळून आला. अनेक लहान-मोठया वक्त्यांचीं बिलाच्या बाजूनें ओजस्वी भाषणें झालीं. त्यांत विशेष टीकात्मक भाषण आचार्य कृपलानी यांचें झालें. सर्वसाधारणरीत्या बिलांतील मूलभूत तत्त्वास कोणाचाच विरोध नाही असें दिसून आलें.

अशाच तऱ्हेचें एक बिल महाराष्ट्र सरकारने दि. २७ एप्रिलच्या सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केलें आहे. दोन्हींची मूलभूत कल्पना व कायद्याच्या तरतुदी सामान्यतः एकाच पद्धतीच्या आहेत. वास्तविक पाहतां दिल्लीला एक भारतीय कायदा संमत झाला असतांना व त्याचा अंमल याहि प्रान्तांत होणार असतांना याच धर्तीचें वेगळें बिल आणण्यांत काय वैशिष्टय आहे, याचें आकलन होत नाहीं.

असो. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्याची सुधारणा किती झपाट्याने होत आहे, हें लोकसभा व राज्यविधिमंडळें यांनी संमत केलेल्या भरमसाठ कायद्यांवरूनच समजेल. खरें पाहतां उत्तम राज्यव्यवस्था ती कीं, जींत किमान नियंत्रणें आहेत. परंतु आमच्याकडे कायद्याचें पेवच फुटलें आहे. बहुमताच्या जोरावर इतके कायदे पास होत आहेत व ते इतके घाईने होत आहेत, कीं त्यांची साधकबाधक चर्चा करून त्याबाबतचें आपले विचार प्रकट करणें हें सुद्धा सर्वसामान्य माणसांस अशक्यप्राय झालें आहे.

हुंडा देणें किंवा घेणें ही कांहीं अनैतिक बाब होऊं शकत नाही. हल्लीच्या प्रचलित समाजव्यवस्थेंत वरपक्षाकडून व वधूपक्षाकडून दुसऱ्या पक्षांना, त्यांच्या त्यांच्या समाजपद्धतीप्रमाणें अगर रूढीप्रमाणें, हुंडा दिला जातो. यांत असा भाग नाहीं कीं, पुरुषाची जातच हुंडा-पद्धतीनें स्त्रीला नाडते. या बिलावर मुख्य प्रधानांपासून तो साध्या सभासदापर्यंत झालेल्या भाषणाचा नूर पाहिला तर प्रत्येकाचें हें ध्रुपद आहे की, ' हा कायदा म्हणजे आजपर्यंतच्या सामाजिक कायद्याचा कळस होय.' खरोखर विचार करायला गेलें, तर यांत कळसासारखें मुळींच नाही. किंबहुना, जी रूढि आजच्या बदलत्या समाजांत खिळखिळी होऊन मोडून पडत आहे, तिला या कायद्यानें अकारण अवास्तव महत्त्व दिलें गेलें आहे. मनुष्यस्वभाव आहे कीं, कोणीं हात लावूं नये म्हणून बोर्ड लिहिला कीं, ' रंग ओला आहे ', तर तुम्हांला असें आढळून येईल की, असें लिहिलें नसतांनाच तो भाग जितका सुरक्षित व व्यवस्थित राहिला असता, तितकाच तो जवळजवळ प्रत्येकाने बोट लावून असुरक्षित केला आहे. हल्लीच्या सहशिक्षणाच्या जगांत स्त्री-पुरुष इतके जवळ येत आहेत कीं, आजपर्यंत या दोघांत घातलेले कृत्रिम बांध झपाट्याने नाहीसे होत आहेत. समानता ही नकळत अमलांत येत आहे. त्याला ढोलकें बडवून जाहीर करण्याची जरुरी उरली नाही. त्याला खरोखर जर कोणत्या गोष्टीने अडथळे येत असतील, तर ते त्या त्या समाजाकरिता वेगळे अस्तित्व दाखविणारे कायदे करणें अगर खोट्या सुधारणेच्या नांवाखालीं त्यांच्या वेगळ्या शिक्षणसंस्था ठेवणें, त्यांच्याकरितां शैक्षणिक व नोकरींत वेगळीं वसतिगृहें ठेवणें, अगर त्यांच्या शिक्षणपात्रतेपेक्षां त्यांना फाजील सवलती देणें. अशा गोष्टींनीं त्यांची सुधारणा अगर उन्नीत तर होत नाहीच, पण आपण इतरांपेक्षा वेगळे आहोंत याची बोचणी मात्र सतत तेवत ठेवली जाते.

हुंडा प्रतिबंधक कायदा म्हणजे स्त्रियांवरील आपत्ति दूर करणारें, एक फार मोठी समाज-क्रांति घडवून आणणारें विधेयक आहे, असा सर्व पुढाऱ्यांचा व वक्त्यांचा सूर आहे. हें मुळांतच चूक आहे. केवळ वधूकडुनच हुंडा घेतला जातो व मुलाचे आईबाप मुलीच्या आईबापांचा केवळ सूड घेतात, ही कल्पना चुकीची आहे. अनेक ठिकाणी तुम्हांस असें आढळून येईल की, मुलीला हुंडा द्यावा लागतो. मग त्यावेळी कोणास दोष देणार व कोणाची आपत्ती दूर करणार? कोणती पद्धत अगर प्रथा इष्ट का अनिष्ट, अगर दोन्ही वाईट, हा प्रश्न नसून वस्तुस्थिति अशी आहे का, वेगवेगळ्या समाजांत वेगवेगळ्या पद्धति रूढ आहेत. सबब एकाच जमातीला अगर पक्षाला बदनाम करण्याचा हा प्रयत्न सर्वस्वी अनिष्ट होय. या बिलाबाबत विशेष चर्चा पुढील अंकी देऊं.


# सामाजिक कार्यकर्त्यांच्या कामांत सखोलता हवी !

प्रिय श्री. भोइटे

स. न. वि. वि. आपण वाईहून सातारमार्गे फलटणला बैठकीसाठी येण्याचें ठरविलें व मी वाईहून परस्परच फलटणला आलों. मला गाडी मिळाल्याने मी वेळेवर फलटण गाठलें. पण लग्नसराईमुळे आपल्याला एस्. टी. कांही मिळाली नाही. बैठकीला तर दुपारी ३ वाजतां हजर राहणें जरूरच होतें. आपण सायकल घेतलीत आणि रणरणत्या उन्हांतून २० मैल सायकलपीट करून बैठकीला हजर राहिलांत. मी थक्कच झालों आपले कष्ट पाहून ! चार-पांच दिवस आपल्यासबधी जें जें ऐकत होतों तें खरेंच असलें पाहिजे असा चटकन् प्रत्यय आला. आपण दोन–दोन दिवस अन्नपाण्यावांचून काढतां; कामाच्या ओढीमुळे दोन दोन महिने घराच्या बाहेर असतां; कधी झोप आहे तर कधी आलोचन जाग्रणें अशी स्थिति ! आपली कष्ट करण्याची ताकद खरोखरच अफाट आहे.

कष्टाबरोबरच धडाडी हा गुणहि आपल्याजवळ भरपूर प्रमाणांत आहे. आपल्या जीवनयात्रेची सुरवात एक प्राथमिक शिक्षक म्हणून झाली. आज आपण ' विशेष भागशिक्षणाधिकारी' हें पद भूषवीत आहांत. धडाडीने अनेक कामें अंगावर घेऊन तीं पुरीं करायचीं ही आपली जिद्दच आपल्या आजवरच्या प्रगतीला कारणीभूत झालेली आहे. वास्तविक ' लग्नांतला हुंडा ' व ' आपण ' यांचा परस्पर संबंध काय ? पण पांचगणीला हेडमास्तर असतांना आपण तरुण कार्यकर्त्यांचें एक मंडळ स्थापन करून त्या भागांत हुंडा-प्रतिबंधक चळवळ चालू केलीत असें मीं एका ठिकाणी वाचलें. काम दिसलें की, उडी ठोकायची हा आपला देहस्वभावच होऊन बसला आहे.

उत्तर सातारा प्राथमिक शिक्षक बँकेचा कारभार तिच्या अत्यंत आणी-



श्री. विठ्ठलराव भोइटे

बाणीच्या काळांत आपण १९५० सालीं हातीं घेतलात आणि पांच वर्षांत आपल्या चोख धोरणाने व तळमळीच्या कार्याने ती बँक पूर्ण सुस्थिर पायावर उभी करून दाखवलीत. सारे शिक्षक या कार्याबद्दल आपल्याला मनापासून दुवा देत आहेत. लांकुडकाम किंवा सुतकताई यापेक्षा शेती हा मूलोद्योग प्राथमिक शाळेसाठी अधिक उपयुक्त आहे हें मत आतां शिक्षणक्षेत्रांत सर्वमान्य होत आहे. पण शाळेसाठी एवढ्या जमिनी आणायच्या कोठून, हा प्रश्न प्रत्यक्ष सरकारलाहि मोठा अवघड भासत आहे. परंतु आपण ' शाळेसाठी भूदान ' ही चळवळ हातीं घेतल्यामुळे आज साताऱ्यांतील ६०० शाळांना सुमारें १०००।१२०० एकर जमिनी मिळून त्या शेतीबेसिक होण्याच्या मार्गावर आहेत. यांतील दोन-तृतीयांश कार्य केवळ आपलें एकट्याचें आहे हा आपल्या कर्तृत्वशक्तीचा केवढा रोकडा पुरावा आहे ? साक्षरताप्रसार चळवळ तर सातारा जिल्ह्यांत प्रथम आपणच उचलून धरलीत. चालू गांवशिक्षण-मोहिमेंतील आपले श्रम व कार्य केवळ अमाप आहे. वाईट इतकेंच वाटतें कीं, दरखेपेस आपण केवळ श्रमाचे धनी होतां ; यशाचे वांटेकरी होण्याचें भाग्य आपल्याला क्वचितच् पाहायला मिळतें.

कदाचित् या कटु वस्तुस्थितीची खंत आपल्याला वाटत असेल वा नसेलहि. पण माझ्यासारख्या आपल्या दूरच्या मित्राला ती जरूर वाटते. माझ्या मतें याचें कारण एकच आहे; तें म्हणजे आपण अनेक व्याप मागे लावून घेतां हेंच. शिक्षक बँक, बालवीर चळवळ, साक्षरता प्रसार, शाळेसाठी भूदान, मध्येच कांग्रेसचें राजकारण, भाग–शिक्षणाधिकाऱ्याची नोकरी, शिवाय किरकोळ कामें एवढ्या गोष्टी एकाच माणसाने हाताळणें चूकच आहे. यामुळे सगळीकडे आहे आणि कुठेच नाही अशी आपली अवस्था होऊन बसते. प्राथमिक कष्टांचें कामच आपल्या वांट्यास येतें तें याचमुळे. यापेक्षा एखादें क्षेत्र निश्चित करून आपण आपल्या बहुमोल शक्ति या एका क्षेत्रांतच वेचल्या असत्या तर केवढें भरीव कार्य आपल्यामागे उभें राहिलें असतें ? कर्मवीर भाऊराव, महर्षी कर्वे यांचे आदर्श आपल्या-सारख्या हाडाच्या सामाजिक कार्य-कर्त्याने नजरेसमोर ठेवायचे याचा अर्थ नेमका हाच आहे. राजकारणी माणूस उथळ कामांत रस घेणारा असतो. सामाजिक कार्यकर्त्याने ' सखोल कार्य ' हेंच आपल्या सर्व हालचालींचें मुख्य सूत्र ठेवलें पाहिजे. आज सामाजिक कार्य-कर्त्यांना समाजांत स्थान नाही, राज-कारण्यांच्या हातांतील खेळणीं म्हणून बहुतेक ठिकाणी त्यांचा वापर होतो याचें कारण काय ? मला वाटतें आपण सखोल कार्याचे आपले आदर्श विसरलों म्हणून ही पाळी आपल्यावर आली. आपलें समाजांतील नेमकें स्थान आपण सोडलें म्हणून मानहि गमावून बसलों. पहा पटतो का हा विचार आपल्याला !

पत्र फारच लांबलें. जरा मोकळे-पणाने लिहिलें म्हणून राग नाही ना आला आमचा ? कळावें

आपला : श्री. ग. मा.

# नवें नेतृत्व हवें ना? पहा एक नमुना!

प्राथमिक शाळेच्या इमारतींत माझी व एकनाथ भोसले यांची मुलाखत चालू होती. सुविद्य घरंदाजाला लाजवील इतक्या सभ्य शालीनतेने एकनाथराव मीं विचारलेल्या प्रश्नांचीं नेमकीं उत्तरें हळू आवाजांत देत होते. मिशीला ताव देऊन बोलावें असें केवढें प्रचंड कार्य या अबोल माणसाने नागझरी गांवांत करून ठेवलें आहे? परंतु आत्मप्रौढीचा लवलेश नाही. मुलाखत संपायच्या वेळी मीं विचारलें—"एकनाथराव! आपला फोटो हवा आहे. तो मासिकांत मला छापायचा आहे." गोड शब्दांत एकनाथराव उत्तरले, "द्यायला हरकत नाही; पण माझा एकट्याचा फोटो छापून आला, तर गांवाला काय वाटेल? मीं एकटाच मोठेपणा घेतला असें होईल. वास्तविक सगळ्या गांवानेच कामें केलेलीं आहेत." मी अवाक् झालों. एकनाथरावांचें म्हणणें अगदी अचूक होतें! सामुदायिक नेतृत्वाची कला या माणसाजवळ आहे याची साक्षच पटली. दिल्लींतल्या थोर थोर नेत्यांना जें जमत नाही तें या नागझरींतल्या एकनाथाला सहज जमून गेलं आहे.


नागझरी कोरेगांव तालुक्यांत येतें. भोसले घराण्यांतील मंडळींचा भरणाच गांवांत विशेष. लोकसंख्या आहे दीड हजार. दहा वर्षांपूर्वी गांवांत बैलगाडी कांही सरळ येऊं शकत नव्हती इतकें गांव आडवळणाचें व डोंगराळ मुलुखांतलें. पण ज्यांची पैशांत किंमत एक लाख रुपयांपर्यंत जाईल इतकीं श्रमदानें गांवकऱ्यांनीं एकनाथरावांच्या मार्गदर्शनाखाली अद्यापपर्यंत पार पाडलेलीं आहेत. पहा हा या श्रमदान-कार्याचा तपशील :

| श्रमदानाची किंमत रु. | कार्य |
|---|---|
| २९,००० | शाळा |
| ७,५०० | तालीम |
| ९,००० | समाज-मंदिर |
| १७,५०० | दोन पूल |
| २२,००० | आर्वी-पुसेसावळी ६ मैल रस्ता |
| ९,५०० | रस्ते |
| ९,००० | रोड डॅम्स. |
| १०३,५०० | |

हीं कामें वर्गण्या जमवून केलेलीं नाहींत. खुद्द एकनाथराव ८८ तास गांवकऱ्यांबरोबर कुदळ-खोरें घेऊन प्रत्यक्ष कामाला लागले होते. रस्त्या-साठी गांवकऱ्यांनी जमिनी दिल्या, त्याहि स्वखुषीने देणग्या म्हणून. त्यांचा सरकारी साराहि अद्याप मालकच भरतात. गांवशिक्षण मोहीमेंत सर्व गांव साक्षर झाला. निर्मलाराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामगौरव समारंभहि साजरा झाला. गांवांत वाचनालय आहे. दुसऱ्या कसोटीला बसण्याची गांव-कऱ्यांची तयारी आहे.

एकनाथरावांनीं आतां एक नवीन जबाबदारी शिरावर घेतली आहे. गांवांत सहकारी शेती यशस्वी करून दाखविण्याचा त्यांचा मानस आहे. २६ गांवकऱ्यांची १२० एकर जमीन एकत्र करून एक जॉइंट फार्मिंग सोसायटी त्यांनी नुकतीच रजिस्टर केलेली आहे. जमिनी सामान्य दर्जाच्याच आहेत. सर्व शेतकरी २।४ एकरवालेच आहेत. एकनाथरावांनी आपल्या ११ एकर जमिनीपैकी ३।४ एकर जमीन यांत गुंतवली आहे. मला खात्री आहे की, हा प्रयोगहि नाथ भोसले यशस्वी करणार. कारण याबाबत ते कांहींच बोलले नाहीत.

अंतराने जवळ, पण गुणाने फार फार दूर असणारें शेजारचें आर्वी गांव पाहिलें म्हणजे एकनाथरावांची खरी योग्यता ध्यानांत येते. पानमळ्यासाठी साऱ्या महाराष्ट्रांत मशहूर असणारें आर्वी गांव. पैशाने समृद्ध. पण शिक्षण नाही; श्रमदान नाही; सहकार नाही. नागझरीसारखें कांहीहि नाही. आहेत फक्त भांडणें, व्यसनें आणि स्वार्थ. पार मागासलेलें. नागझरी सामाजिकदृष्ट्या फार पुढे गेलें; आणि पैशाने पुढारलेलें आर्वी अद्याप जुन्या वातावरणांतच खितपत आहे. एकनाथ-रावांचे आदर्श कोणी गांधी नेहरू नाहीत. ते आहेत त्यांच्याच कुलत घराण्यांतील एक दिवंगत दानशूर पूर्वज. नागझरींतले कै. धोंडीराम पाटलोजी भोसले. यांनी फार वर्षांपूर्वीं नागझरी सोडलें व मुंबईत फोर्टमध्यें खोक्याचा एक कारखाना काढला. सुदैवाने धंद्यांत बरकत आली. पण कै. धोंडीराम नागझरीला विसरले नाहीत. आपल्या गांवांतील अनेक माणसांना त्यांनी कारखान्यांत उद्योग तर दिलाच, पण हळू हळू त्यांचेमार्फत गांवच्या विकासाच्या एकेक गरजाहि पूर्ण करण्याचा क्रम ठेवला. रयत शिक्षण संस्थेस कै. धोंडीराम भोसले यांच्याकडून अनेक देणग्या मिळालेल्या आहेत. हा घराण्याचा वारसा घेऊन आमचे नाथ भोसले ५०-५१ पासून गांवाच्या विकासासाठी उभे राहिले आणि गेल्या दहा-बारा वर्षांत त्यांनी स्वार्थ आणि परार्थ यांचा योग्य मेळ घालून विकासाचा एक नवा आदर्श सर्वांसमोर ठेवला. श्री. ग. मा.


नागझरी श्री. ता. २-५-६१
श्री. ग. माजगावकर याना नागझरी
हुन सौ. द्रौपदाबाई जोती भोसले
याचा नमस्कार पत्रास कारण
आमचे गावांत प्रोढ शिक्षण
सुरु झाले त्यात मी शिकत होते
शिकल्या पासुन मला माझ्या
काय चुकत ते समजा व
याम लागले घरांत भांडी कशी
ठेवावीत घरांत घाण ठेवु नये पाणी
गाळुन घ्यावे घरातील च्या
टनी भीत कादा लसुन
डब्या तेठेवले त्याच
वर त्यांची नावे घातली
त्यामुळे त्या वस्तु मला
लवकर घाऊ लागल्या
असे अनेक फायदे झाले.
कळावे माझे नांव पता
सौ. द्रौपदाबाई जोती
भोसले नागझरी
कर याचा नमस्कार
पत्ता (नागझरी मु. पो.) ता. कोरेगाव जि. सा.

पोस्ट कार्ड
POST CARD
केवल पता
ADDRESS ONLY
INDIA

श्री. ग. माजगावकर
राजहंस प्रकाशन
१०१५ सदाशीव पेठ
पुणे नं. २

द्रौपदीबाई,

● श्री. नाथ भोसले यांनी स्वतःचा फोटो दिला असता तर आपलें पत्र मिळण्याचा कांही योग नव्हता. खरोखर पत्र छान लिहिलंत. धन्यवाद.

—संपादक

[ पान २५ वरून चालू ]

### स्त्री जागी झाली पाहिजे.

अशा प्रकारें स्थापन झालेल्या समित्या कोणतेंच कार्य करूं शकणार नाहीत हें उघड आहे. विशेषतः सरपंच, पाटील, पुढारी ही मिरासदार मंडळी समित्यांवर असली म्हणजे त्यांचा तोरा व जुना सरंजामशाही अभिमान कांही विचारूंच नका ! 'कुलवंतांच्या स्त्रियांनी चावडीवर येऊन मास्तरासमोर पाटी-पेन्सिल घेऊन बसायचें ! आमच्या घराण्याच्या परंपरेला हें शोभणारें नाही.' ही यांची आंतली वृत्ति; आणि 'गांव शंभर टक्के साक्षर झालाच पाहिजे; सर्वांनी वर्गाला हजर राहिलंच पाहिजे,' हा या मंडळींचा सभेतील पुकारा ! काय अर्थ आहे या विसंगतींत ! असल्या दिखाऊ आवाहनाचा गांवावर कांहीहि परिणाम होत नाही आणि समितीचें जनजागरणाचें कामहि केवळ कागदावरच राहतें असा सगळीकडचा अनुभव आहे. उलट ज्या ठिकाणी गांवांत नैतिक वजन असलेली एखादी म्हातारी बाई किंवा आजोबा यांच्याकडे हें कार्य सहजगत्या सोपविलें गेलें, तेथे कामाचा उठाव केवढा जबरदस्त झाला आहे याची कल्पनाच करवत नाही. विशेषतः एखादी म्हातारी बाईच सारा गांव हलवून सोडते असा अनुभव आहे. ती स्वतः वर्गाला येत नाही, पण प्रत्येक घरांतील स्त्री तिच्या धाकाने बाहेर पडते; घरांतील पुरुषमंडळींनाहि म्हातारीच्या सांगण्यावरून आपली माणसं पाठवायला कांही भय व संशय वाटत नाही. एखाद्या पाटील-तलाठ्याने बाईमाणसांना वर्गासाठी चला म्हणणें वेगळें आणि म्हातारीने स्वयंपाकघरांत उभें राहून, वेळ पडल्यास मुलाबाळांना संभाळण्याची जबाबदारी स्वतःच पत्करून घरांतील स्त्रीला वर्गासाठी बाहेर काढणें वेगळें. आणि एकदा स्त्री जागी झाली की, तेथे विचार रुजलाच म्हणून समजावें. कारण स्त्री कोणतीहि गोष्ट मनापासून, प्रामाणिकपणे करीत असते. दिखाऊपणा, मिरविण्याची हौस, मोठेपणाचा हव्यास हे पुरुषी गुणविशेष तिच्याजवळ नसतात. तिचें करणें सहज असतें; नैसर्गिक असतें; म्हणूनच तें समाजाच्या मुळाशी जाऊन भिडतें. गांवशिक्षण मोहिमेचा अनुभव हेंच सांगतो की, जेथे स्त्री शिकली तेथे लहान मुलें सुधारलीं, घर सुधारलें आणि शेवटी गांवांतहि हळूहळू बदल घडत गेला.

### सामाजिक परिस्थिति

यंत्रणेचा विचार याप्रमाणे थोडाफार केल्यावर 'सामाजिक परिस्थिति' हा यापुढचा विषय. येथे कोरेगांव तालुक्यांतील ल्हासुर्ण्याचेंच उदाहरण घेऊं. संपूर्ण कोरेगांव तालुक्यांतून रेल्वे लाईन गेली असल्यामुळे यांतील प्रत्येक गांवाचा बाहेरच्या जगाशी फार पूर्वीपासून घनिष्ठ संबंध आलेला आहे. अल्पबचत योजनेपासून तों बालवीर चळवळीपर्यंत सातारा जिल्ह्यांत हा तालुका आजवर नेहमीच आघाडीवर राहिलेला आहे. पोलिस व मिलिटरीखात्यांत या तालुक्यांतून भरती विशेष प्रमाणांत होत असल्याने एक प्रकारचें जोमदार वातावरण या तालुक्यांतील गांवांतून नेहमीच पाहावयास सांपडतें. प्रत्यक्ष ल्हासुर्ण्यांत आज दर घरटीं एक माणूस या खात्यांत होता किंवा आहे असें म्हटलें तर त्यांत फारशी अतिशयोक्ति होणार नाही. एका दिवसाच्या मुक्कामांत जमादार, हवालदार ही मंडळी मला कितीतरी भेटली. कोणी काश्मीरांत आपण रस्ते कसे बांधून काढले हें सांगतो, तर कोणी बडोद्याला गव्हर्नराच्या बंदोबस्तासाठी गेलों असतां संस्थानचा कारभार कसा होता याचीं वर्णनें करतो; इटली, फ्रान्स, उत्तर आफ्रिका, ब्रह्मदेश, मलाया येथपर्यंतचा मुलुख पायीं तुडवून आलेली ही मंडळी ! मिलिटरींतील शिस्त अंगी पक्की भिनलेली. गांव साक्षर करण्याचें एकदा ठरल्यावर मग आगेमागेची भाषाच नाही. सारें मिलिटरीच्या खाक्यांत अखेरपर्यंत व्यवस्थित पार पडलें. हीच परिस्थिति साताऱ्याजवळच्या अपशिंगे या गांवची. तेथील गांवशिक्षण मोहिमेच्या यशाचें बरेंचसें श्रेय या सैनिकी जोमदारपणाला दिलें पाहिजे. पण अशी परिस्थिति फार झालें तर अकरापैकी एखाद्या तालुक्यांत, पांच-पन्नास गांवांत ! या गांवांच्या जोरकस कामांचा अनुभव प्रमाण मानून जिल्ह्यांत इतर सर्व ठिकाणी असाच उठाव व्हावा ही अपेक्षा धरणें कितपत योग्य होतें ? जावळीसारख्या दऱ्याखोऱ्यांत किंवा झाडाझुडपांत दडलेला तालुका वेगळा; फलटणसारख्या संस्थानिक वातावरणांत वाढलेल्या तालुक्याची प्रकृति वेगळी; माणसारख्या धनगरांची फिरस्ती वस्ती (Floating population) असणाऱ्या तालुक्याचें स्वरूप वेगळें. ही सामाजिक व नैसर्गिक भिन्नता ध्यानांत न घेतां आखलेली ढोबळ मोहीम शेकडा १० ते १५ टक्के एवढ्या प्रमाणांतच यशस्वी होणार यांत नवल तें काय !

### फुलेनगर आणि बावधन

भिन्नभिन्न तालुकेच कशाला ! एकाच तालुक्यांतील दोन गांवांची भिन्नभिन्न परिस्थिति व त्यामुळे कामांत पडलेली विलक्षण तफावत पाहा. एकूण वाई तालुका मध्यम व सर्वसाधारण प्रगतीचा नमुना म्हणून समजण्यास हरकत नाही. वाईजवळच फुलेनगर ही एक वसति आहे. ही वसति या मोहिमेंत संपूर्ण साक्षर झाली. एकदिलानें गांवांतील सर्व स्त्रीपुरुषांनी नेटाने शिक्षणाचें काम पूर्ण केलें. लहान मुलांना स्वतः सांभाळून पुरुषांनी घरांतल्या स्त्रियांना वर्गांना पाठविलें, तर रात्रीं दोन-दोन वाजेपर्यंत वर्गांत शिक्षणाचे पाठ घेऊन स्त्रिया पहाटे पुरुषांबरोबर शेतांत काम करायला पुन्हा हजर राहिल्या. 'शिक्षणाची ओढ' म्हणून जी म्हणतात ती येथे मूर्तिमंत पाहावयास सांपडली. काय होतें या ओढीचें कारण ! गांव सर्व माळी समाजाचा आहे. महात्मा फुल्यांची प्रेरणा येथे जीवंत आहे. गांवांत कौटुंबिक एकात्मतेची भावना दृढ आहे. ही अनुकूल सामाजिक पार्श्वभूमि लाभली, म्हणून कार्यकर्त्यांच्या व शिक्षकांच्या प्रयत्नांना चटकन् यश लाभलें व गांव शिक्षणाच्या मोहिमेंत पुढे सरकलें. जरा चार मैल पलीकडे असणाऱ्या बावधनला चला. दोन नामवंत घराण्यांच्या वैरामुळे गांवची हवा आज कित्येक वर्षें बिघडून गेलेली आहे. येथे 'सब घोडे बारा टक्के' या न्यायानें समाजशिक्षणाचें कार्य चालू झालें. यश मुळीच नाही. गांवांत वर्ग सुरूच होऊं शकले नाहीत अशी परिस्थिति. ढोबळ कार्यपद्धतीऐवजी विखुरलेल्या गांवची एखादी बारीकशी गरज नेमकी हेरून तेवढी प्रथम भागविणें व हळूहळू लोकमत आपलेंसें करून समाजशिक्षणाचा विचार तेथे रुजविणें, हा धीमा मार्ग अशा ठिकाणी कदाचित् जास्त उपयोगी पडला असता. मी काय केलें असतें ! 'आज गांवांत चांगली शाळा आहे. पण विद्यार्थ्यांच्या संख्येच्या मानाने शिक्षक फार कमी आहेत. जे आहेत त्यांपैकी कांहींच्या बरचेवर बदल्या केल्या जातात. त्यामुळे शिक्षकांकडून शाळेचें काम नीट होत नाही. मुलांचा अभ्यास मागे पडतो'—ही आहे

गांवकऱ्यांची मुख्य तक्रार. 'आमच्या मुलांच्या अभ्यासाचा खेळखंडोबा करून आम्हाला सुशिक्षित करण्याचा उलटा धंदा करूं नका' असें गांवकऱ्यांनी सांगितलें, तर त्यांत त्यांची चूक काय आहे? ही परिस्थिति गांवाने शिक्षण-खात्याच्या अधिकाऱ्यांच्या कानावर अनेकदा घातली. पण उपयोग नाही. शिक्षणखात्याने गांवच्या अडचणीविषयी अशी बेफिकिरी दाखविली; गांवानेहि शिक्षणखात्याच्या समाज-शिक्षण-मोहिमेचा बोजवारा उडवून लावला. काय साधलें यांत समाजकल्याण? शाळेची गरज भागविण्याचा एक टाका मी वेळच्या वेळीं घातला असता, तर पुढे ही मोठी हानि सोसण्याचा प्रसंग माझ्यावर कां येतो?

## घोडा मागे, गाडी पुढे

असा आहे सारा तपशीलाचा विचार. अर्थात् जर राजकीय पक्ष किंवा रा. स्व. संघ, राष्ट्रसेवा दल, बालवीर संघटना इत्यादि सामाजिक संस्थांनी या कार्यांत लक्ष घातलें असतें, तर या तपशीलाच्या अडचणी स्थानिक पातळीवर तेथल्या तेथेच दूर होऊं शकल्या असत्या; पण नांव घ्यावें असें कोणत्याच प्रकारचें भरीव कार्य या मोहिमेंत राजकीय पक्षांनी किंवा सामाजिक संस्थांनी केलेलें नाही. मोहीम जी कांही थोडीबहुत यशस्वी झाली ती सरकारी नोकरशाहीच्या प्रयत्नामुळे. मुळांत नोकरशाही यंत्रणेच्या कांही मर्यादा असतात ही गोष्ट ध्यानांत घेतां केलेल्या कामाबद्दल सातारा जिल्ह्यांतील नोकरशाही धन्यवादास जरूर पात्र आहे. कारण हा एक नवा आदर्श तिने निर्माण केलेला आहे. परंतु कोणतीहि समाजविकासाची चळवळ यशस्वी होण्यास निरनिराळ्या सामाजिक शक्तींची एक विशिष्ट जोड जमून यावी लागते. राजकीय पक्षांनी मतभेद विसरून, कार्याचें पक्षातीत स्वरूप लक्षांत घेऊन प्रचाराची पहिली आघाडी प्रभावीपणे उघडावयास हवी. सामाजिक संस्थांनी ध्येयनिष्ठ व तळमळीच्या कार्यकर्त्यांचा योग्य तो पुरवठा करून मधली फळी मजबूतपणें सांभाळायला हवी. या पुरोगामी सामाजिक शक्तींनी पादाक्रांत केलेला मुलुख बंदोबस्तांत ठेवण्याचें, झालेल्या कामावर पाणी न फिरवतां त्यावर सरकारी सहीशिक्क्याचें मोर्तब चढविण्याचें अखेरचें कार्य नोकरशाही यंत्रणेने पार पाडावयास हवें. नोकरशाही नेहमीच पिछाडी सांभाळते,कारण ती समाजजीवनांतील सर्वांत जड व स्थिरप्रकृतीची संघटना असते. सातारा जिल्ह्यांत सामाजिक शक्तींची ही व्यवस्था उभी राहूं शकली नाही हें आहे गांवशिक्षणमोहीमेच्या अल्पयशाचें खरें तात्त्विक कारण. येथे आघाडीवरचे राजकीय तोफखाने निवडणुकीच्या लढाईला अद्याप एक वर्ष अवकाश आहे या स्वार्थी विचाराने मैदानांत उतरलेच नाहीत. सामाजिक व सांस्कृतिक संघटना या आपल्याकडे अर्धवट राजकीय व अर्धवट सामाजिक-सांस्कृतिक अशा वेगडी स्वभावाच्या असल्याने त्यांचें नेमकें कार्यक्षेत्र त्यांना केव्हाच सापडत नाही, त्यामुळे त्या येथेहि गैरहजरच; मग जडप्रकृति नोकरशाही हालचाल करून करून किती करणार! मुळांतच गाडीपुढे घोडा लागण्याऐवजी घोडा मागे गाडी पुढे अशी स्थिति. अशा वेळी जी काय दोन-चार पावलें वाटचाल होईल, तेवढ्यावरच संतोष मानून घेण्याखेरीज दुसरें काय करणार?

## महाराष्ट्राचें विकास-सूत्र

भारतीय विकासाची जवळजवळ अशीच तऱ्हा चालू आहे. त्यामुळे दोन पंचवार्षिक योजना उलटून गेल्या, तरी भारतीय जनता अद्याप जागी झालेली नाही. कारखाने, धरणें, इमारती उभ्या राहत आहेत. परंतु येथला 'माणूस' मात्र मान टाकूनच वावरत आहे. महाराष्ट्रांत नाही म्हणायला थोडी वेगळी परिस्थिति दिसते. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेमुळे येथे एक वेगळेंच चैतन्य जागें झालेलें आहे. नवा महाराष्ट्र घडवावा अशी ऊर्मि येथील लोकमानसांत उसळलेली दिसत आहे. सातारा जिल्ह्यांतील गांवशिक्षण-मोहीम हा या ऊर्मीचाच एक लहानसा पुरावा आहे. या ऊर्मीला नीट आकार देण्याचें कार्य मात्र समाजांतील जाणकार मंडळींनी यापुढे 'धर्म' म्हणून स्वीकारलें पाहिजे. 'लोकजागृतींतून समाजविकास' हें महाराष्ट्राच्या नव्या विकासाचें मुख्य सूत्र असलें पाहिजे. या सूत्राचा अवलंब करून आम्ही पुढे गेलों, तर महाराष्ट्राचीच काय,भारताची भाग्यरेखाहि ढळढळीतपणें उमटल्याखेरीज राहणार नाही. मागचा इतिहासच याला साक्षी आहे. इतिहासाची ही पुनरावृत्ति होण्याची अट मात्र एक. येथल्या लोकजागृतींत वर सांगितल्याप्रमाणे एक विशिष्ट संयम व व्यवस्था हवी. ही व्यवस्था जमली तर महाराष्ट्राच्या इतिहासाचीं पानें पुन्हा वेगाने फडफडूं लागतील यांत मुळीच शंका नाही.

---

## २०५० साल......

आणखी ९० वर्षांनीं जग कसें असेल याचें महाभयंकर चित्र प्रो. हेरमन बाईरी यांनीं रॉयल सोसायटी ऑफ हेल्थ काँग्रेससमोर बोलतांना स्पष्ट केलें. ते म्हणाले, "९० वर्षांनंतर जगाची लोकसंख्या एवढी अफाट वाढेल कीं, अन्न, पाणी व शुद्ध हवा यांचासुद्धा दुष्काळ निर्माण होईल.

२०५० सालीं जगाची लोकसंख्या सुमारें ९,०००,०००,००० होईल. यामुळे प्रत्येक प्राण्याला फक्त १ चौरस मिटर जागा उपलब्ध होऊं शकेल. वाढलेले लोक अन्य ग्रहांवर वसाहतीस पाठविण्याची सोयहि होऊं शकणार नाही.

कोळसा, तेल व नैसर्गिक गॅस यांचा मागमूसहि उरणार नाही. गेल्या ४० वर्षांत आपण एवढा कोळसा जाळला आहे कीं, या शतकाअखेर कोळसा मिळणारच नाही. निसर्गानें २५०,०००,००० वर्षांत जें निर्माण केलें, तें मानवानें २५० वर्षांत अगदीं फस्त करून टाकलें आहे.

युरेनिअम व थोरीअमनें कांहीं काळ मानवाला अणुशक्तीचा वापर करतां येईल, पण लवकरच ही शक्तीहि नष्ट होईल. या सर्वांला तोंड देणें फक्त सौरशक्तीचें द्वाराच शक्य होईल. पण त्या शक्तीचा उपयोग कसा करावा हें मानवाला अजून कळून आलेलें नाहीं.

# माणुसकी हाच माणसाचा धर्म !

## माणुसकी नष्ट झाली कीं,
## माणसाचा पशु होतो !




★

कथा :
गो. गं. पारखी

पट-कथा-संवाद :
व्यंकटेश माडगूळकर

गीतें :
ग. दि. माडगूळकर

संगीत :
वसन्त पवार

छाया :
ई. महंमद

ध्वनि :
शंकर दामले

कलाकार —


सुलोचना, जयश्री गडकर, हंसा वाडकर, चंद्रकांत, सूर्यकान्त, रत्नमाला, नीलम, आल्हाद, लीला गांधी, वसन्त शिंदे, गजरा, सुशीला, जयश्री, कुसुम, पुष्पा राणे, वसंतराव पहेलवान आणि दादा साळवी.

★

## विजयानन्द पुणें येथें १०६ वा आठवडा !

आत्तापर्यंतच्या सर्व चित्रांचे उच्चांक मोडणारा एकमेव चित्रपट !
महाराष्ट्रभर झंझावाताच्या वेगाने लोकमन आकर्षित आहे !

— केळकर फिल्म एक्स्चेंज्, पुणें ४, प्रकाशन —





# अथ भविष्यदर्शनम्


ज्योतिषाचार्य द. शं. केळकर,
सावंतवाडी.


**मेष**—आपण गेल्या दोन महिन्यांत सोसलेल्या त्रासाला उतरती कळा ह्या महिन्यांत लागणार आहे. आर्थिकदृष्ट्या चांगला महिना आहे. रवि, बुध, गुरु, शनि, शुक्र हे ग्रह अनुकूल आहेत. आपल्या व्यवसायांत आपली प्रगति होईल. नव्या ओळखी होतील. सट्ट्याचा व्यवहार करूं नका. मंगळ, राहु हे ग्रह संततीचें आरोग्य बिघडविणार आहेत. थोडीशी मानसिक व्यग्रता महिनाअखेर भासेल. स्थावराचा व्यवहार जपून करावा. भांडण होणार नाहीं म्हणून जपा. साध्या गोष्टींतून वरिष्ठांशीं मतभेद होतील. भागिदारी करूं नका. नवे करार फायदेशीर होतील. **चांगले दिवस—१, ३, ५, ११, १२, २१, २२, २८, ३०.**

**वृषभ**—समाजांत तुमचा मान वाढेल. फार दिवस अडून राहिलेलीं तुमचीं कामें सुरळींत होतील. नातेवाईकांचे सुख मिळेल. व्यवसायांत प्रगति. सर्वांगीणरीत्या अनुकूल वातावरणाकडे तुमचें जीवन जाणार आहे. आपला उद्योगधंदा चांगला चालणार आहे. रवि, गुरु, बुध हे आपणास चांगले असून स्थावर गोष्टीस व प्रकृतीस चांगला काळ आहे. खर्च मात्र उगाच होणार आहे. त्याबरोबर चतुर्थांतील राहु व तृतीयांतील मंगळ प्रापंचिक मतभेद निर्माण करील. मानसिक त्रास होणार आहे. राहु, मंगळासाठीं दानें करा. शक्यतो कलह टाळाच हं. **चांगले दिवस—३, ५, ७, १४, १५, २४, २५, ३०.**

**मिथुन**—आपण जो त्रास गेल्या महिन्यांत सोसला आहे, त्याची मला कल्पना आहे. त्यादृष्टीने हा महिना चांगला आहे. आर्थिक परिस्थिति सुधारणार आहे. मित्रांशीं व भावंडांशीं मतभेद होतील. वरिष्ठांशीं संघर्ष होणार नाही म्हणून जपावयास हवें. व्यवसायांत त्रास होणार आहेच. पत्नीपासून मात्र सौख्य मिळेल. स्त्रीसौख्यास चांगला महिना. बुध, मंगळ, राहू, शुक्र हे ग्रह प्रकृति चांगली ठेवण्यास व नोकरींत प्रगति व्हावी म्हणून झटणार आहेत. आपणांस गुरु, शनी मात्र चांगले नाहीत. त्यामुळें प्रवास जपून करावेत. गुरुचरित्राचीं पारायणें किंवा गुरुचा व शनीचा जप करावा. **चांगले दिवस—३, ५, ७, १६, १७, २६, २७.**

**कर्क**—आपणांस ह्या महिन्यांत ग्रह अनुकूल नाहीत. बुध, राहु, रवि, मंगळ, शनि हे सारे ग्रह प्रतिकूल आहेत. उष्णतेचे विकार, डोळ्यांना त्रास होईल. जमीन जुमल्याचे व्यवहार त्रासदायक ठरतील. परंतु गुरु, शुक्र हे ग्रह चांगले असल्यामुळे पैशाची टंचाई आपणांस भासणार नाही. खर्च मात्र जास्त होणार आहे. घरच्या माणसांशीं जुळतें घ्या. आपण जाग्रणें मात्र करूं नका. वरिष्ठांशीं मतभेद होणार नाही म्हणून जपा. पैशाचा खर्च जपून करा हं. संततीचें आरोग्य चांगलें राहील. **चांगले दिवस—१, ७, ९, ११, १२, १४, १५, २४, २५.**

**सिंह**—आपण ह्या महिन्यांत प्रकृतीकडे लक्ष द्यायला हवें. पत्नीची प्रकृतीहि चांगली राहणार नाही. प्रेयसीची तब्येत कुरकुर करील. मतभेद वाढतील. आपणांस मंगळ, राहु, गुरु हे ग्रह प्रतिकूल आहेत. मंगळ, गुरूंसाठीं गूळ, मसुरा, तीळ व तेल हीं दानें द्यावीत. अडून राहिलेलीं आपलीं कामें मात्र सुरळीत सुरू होतील. मित्र व आप्त यांचेकडून साह्य होईल. महत्त्वाचे करार यशस्वी ठरतील. उष्णताजन्य व पित्तजन्य विकार होतील. **चांगले दिवस—३, ९, ११, १२, २१, २२, ३०.**

**कन्या**—शारीरिक व मानसिक दगदग जास्त प्रमाणांत जाणवणार आहे. नोकरी व धंद्यांत पाऊल पुढें पडणार आहे. अधिकाऱ्यांचें प्रेम राहील. प्रेमांत सुख मिळेल. कांहीं जणांच्या जीवनांत स्त्रीचें आगमन होईल. अविवाहित स्त्री प्रणयाच्या मोहिमेंत गुंतेल. कोर्टाची कामें मनासारखी होतील. शुक्र आठवा असल्यामुळे कौटुंबिक विरोध; जादा त्रास करावा लागणार आहे. राहु, शनी, मंगळ हे ग्रह शारीरिक, मानसिक क्लेश देणारे आहेत. मंगळ, राहूचा जप किंवा दानें करा म्हणजे त्रास कमी होईल. उष्णतेचा किंवा डोळ्यांना जास्त होणार आहे. **चांगले दिवस—५, ६, ११, १२, २०, २१, २४, २५.**

**तुळ**—गेले दोन महिने आपणास जरा बरे गेले नाहींत. पण ह्या महिन्यांत समाधानाचा श्वास टाकतां येईल. धंद्यांत व व्यवसायांत पाऊल पुढें पडणार आहे. स्त्रीपासून सुख मिळेल. व्यवसाय चांगला चालेल. नशीब भाग्याच्या मार्गाकडे तुम्हांस नेणार आहे. पैसाहि मिळेल. गुरु, शनि व केतु हे ग्रह प्रतिकूल आहेत. परंतु मंगळ, राहू बुध, शुक्र हे ग्रह अनुकूल असून तुम्ही सुखी असावें, तुमच्या व्यवसायांत तुम्हाला यश यावें म्हणून मदत करणार आहेत. जास्त पैसा हातांत खेळेल. मधून मधून प्रवासाचा योग येईल. जून ७, ८, १४, १६, १७, १९, २६, २७ हे चांगले व अनुकूल दिवस आहेत.

**वृश्चिक**—जीवन म्हणजे झगडा. मनासारखा शत्रू नाही. हें विधान आपणांस अनुभवावें लागणार आहे. शारीरिक व मानसिक त्रास होणार आहे. नसती दगदग करावी लागणार. वरिष्ठांशीं मतभेद होईल. प्रेमाचें सुख मिळेल. भागिदारींत अनुकूल असा फायदा मिळणार आहे कोर्ट व कचेरींतील कामें तडजोडीनें घडून येतील. खर्चीहि कमी होईल पैसा हातांत खेळेल. रवि, बुध व केतु हे ग्रह प्रतिकूल आहेत. त्यामुळे प्रकृतीस जपा. किरकोळ आजार येईल. मानाच्या गोष्टी घडतील. वरिष्ठ माणसें खूष राहतील. **चांगले दिवस** ९, १०, १६, १७, १९, २१, २२, २८.

**धनु**—गुरु, बुध, मंगळ, रवि, राहु, शुक्र हे सारे ग्रह तुम्हांला अनुकूल आहेत. त्यामुळें तुमचीं अनेक कामें मनासारखीं होणार आहेत. जमीन जुमल्याचे व्यवहार व इतर गोष्टी फायद्याच्या ठरतील कौटुंबिक मतभेद असूनहि वातावरण आनंदाचें राहणार आहे. भागिदारीचा व्यवहार फायद्याचा होणार आहे. गेल्या तीन महिन्यांपेक्षां हा महिना चांगला जाणार आहे. मन प्रसन्न राहणार आहे. प्रेमांत सुख मिळणार आहे. विद्याभ्यासांत चांगला काळ. प्रवास जपून करा. एकंदरींत हा महिना आपणांस चांगला संस्मरणीय वाटणार. ३, ११, १२, १९, २१, २२, २४, ३० हे **चांगले दिवस** आहेत.

**मकर**—आपणांस मंगळ, राहु, शुक्र हे ग्रह जरा विरुद्ध आहेत. त्यामुळें मतभेद होतील. प्रिय व्यक्तींचीं प्रकृति नादुरुस्त होईल. त्यामुळें मानसिक स्वास्थ्य बिघडणार आहे. घरांत मतभेदाची जाणीव होईल. भागिदारीचे व्यवहार जपून करा. मानसिक ताप होणार नाही म्हणून जपा हं. परंतु रवि, बुध हें चांगले असल्यामुळे प्रिय माणसांमुळे जीवन सुसह्य होईल. आपण प्रकृतीस मात्र जपावयास हवें. शत्रु त्रास देणार आहेत. वात, उष्णता ह्यांचा त्रास होणार आहे. कौटुंबिक कलह वाढणार नाही म्हणून जपा. ५, ६, १४, २१, २२, २४, २६ हे **चांगले दिवस** आहेत.

**कुंभ**—शनि, गुरु, मंगळ, राहु हे ग्रह आपणांस त्रास देणार आहेत. अपमान करण्याचा प्रसंग आणतील. शारीरिक त्रास घडवून आणतील. स्वतः होऊन पुढाकार घेऊं नका. परंतु रवि व बुध हे ग्रह अनुकूल असल्यामुळें पैसा हातांत खेळेल. उत्साहवर्धक गोष्टी घडतील. नव्या ओळखी होतील. कोर्टाचीं कामें पुढें ढकला. प्रिय माणसांचें सुख मिळेल. पण पत्नी किंवा प्रेयसी अगर प्रियकर ह्यांच्याशीं मतभेद घडेल. प्राप्तीच्या मानानें द्रव्याचा खर्च जास्त होणार आहे. **चांगले दिवस**—१, ७, ८, १६, १७, २४, २६, २८.

**मीन**—आर्थिक दृष्ट्या प्रगतीकडे नेणारा हा महिना आहे. कोर्टातील व ऑफिसांतील कामें तुमच्या मनासारखीं होतील. आवडत्या माणसांची मदत होईल. नोकरींत प्रगती व बढती होणार आहे. हें सारें आपणास गुरु, शनी, शुक्र, मंगळ व राहु ह्या ग्रहांमुळें मिळणार आहे. परंतु रवि व केतु आरोग्याची तक्रार व मानसिक काळजी देतो. शारीरिक दगदग राहिली तरी धंद्यांत प्रगति होणार आहे. नोकरांपासून सावध रहा. घरच्या माणसांशीं सलोख्यानें वागा. घरचें वातावरण चांगलें. राहील. १, ३, ९, १०, १९, २०, २६, २८, ३० हे दिवस चांगले जाणार आहेत.

### कधीं काय केल्यास फायदा होईल ?

**प्रवास**—दिनांक १, ३, ८, ९, १५, २१, २४, २६, २८.

**पेरणी**—दिनांक १, ३, ५, ९, १०, १५, १७, १८, १९, २२, २३, २४, २६, २८.

**नवें वस्त्र व अलंकार वापरण्यास**—दिनांक २, ३, ८, ९, १५, १६, २२, २३, २६.

**व्यापारास**—दिनांक २, ६, ७, ९, १५, १७, १९, २०, २३, २४, २६, २९.

**घर, दुकान, जागा बदलण्यास**—दिनांक ३, ५, ७, १५, २२, २३, २६.

**इत्यलम्**


सर्व प्रकारच्या फोटोग्राफीच्या कामासाठीं
**देशपाण्डे फोटो स्टुडिओ**
१९६।१ ब, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणें २

सुबक आणि वक्तशीर काम
**कला भुवन**
( प्रोसेस ब्लॉक मेकर्स )
हरप्रकारचें ब्लॉक मेकिंगचें काम केलें जातें
शिवाय
ब्लॉकस् सुरक्षित ठेवण्याच्या व्यवस्थेसंबंधी लिहावें
६६६ सदाशिव पेठ, पुणें २




प्रियदर्शी

दोन वर्षं उलटून गेलीं, पण पब्लिक लोटतच आहे ... अशा या आगळ्या चित्रपटाचें चाकोरीवेगळें रगदार व रंगदार परीक्षण ....

सकाळच्या एस्. टी. ने मी वेल्ह्याहून पुण्याला येत होतों. गाडी विंझरपाशी आली अन् थांबली. तीन-चार आया-बाया, दोन-तीन बापे अन् अर्ध्या तिकिटाचीं तितकींच पोरं लगबगा धावत येऊन एस्. टी. ला भिडलीं. गाडींत यंगायची घाई झाली होती त्यांना. रस्त्यावरच्या धुळीचा अन् त्या माणसांचा लोट एकदमच गाडींत घुसला. अन् मग नेहमीची गडबड, चिडचीड उठली. पायावर पाय पडला म्हणून आंतलीं शिटं ओरडायला लागलीं. गाडी कुणाच्या एकल्या बापाची हाय का न्हायी याचे सवाल-जबाब सुरू झाले. असल्या कटकटीची सदाची सवय झालेल्या कंडक्टरने, "लाईनशीर बसा, न्हायी तर खाली उतरवीन!" म्हणून दम देत तिकिटावर, टचा टचा उवा मारल्यागत बिळं पाडायला सुरुवात केली. बाया तरीहि भांडत होत्याच. मी खिडकीशी बसून गम्मत बघत होतों. अन् ह्या नव्या शिटांना पोहोचवयाला आलेला एक बाप्या माणूस गाडीबरोबर चार पावलं धावत धावत त्यांना ओरडून सांगत होता,

"गनपतीच्या गर्दीत प्वारं संभाळा! हरवत्याल! आन् रातच्याला 'सांगत्यें ऐका' बघूनशान् घ्या! इसरूं नगा!"

ह्या त्या गड्याचा संदेश ऐकून तर मी चमकलोंच. कंडक्टरलाहि हंसूं फुटलं. गाडींत खसखस पिकली अन् कुणीं तरी म्हटलं,

"याड लावलं ह्या पिक्चरन! उखाळ पांढरं झालं ह्या सांगत्यें ऐकावाल्याचं! वरीस उलटलं तरी बी पब्लिक लोटतंच हाय!"

### सुविद्याने दिलेलें शेलापागोटें

अगदी खरं होतं म्हणणं त्या बाबाचं. केवळ मराठीच नव्हे, तर अवघ्या हिंदी चित्र-सृष्टींतहि 'सांगत्ये ऐका' इतकं अमाप यश कोणत्याहि चित्राला लाभलेलं नाही. पुण्यांत एकाच पटगृहांत सतत दोन वर्षे उलटून गेलीं तरीहि सांगत्यें ऐकाचा मुक्काम हलायचीं लक्षणं दिसत नाहीत! ह्या चित्राला एवढें यश मिळेल असं त्याच्या जन्मदात्यांनाहि वाटलं नव्हतं. मऱ्हाठी मुलखांतल्या खेड्या-पाड्यापर्यंत 'सांगत्यें ऐकाची' ललकारी पोहोचली. अन् केवळ गांवकरी पब्लिकच नव्हे, तर शहरी रसिकवर्गहि तितक्याच ओढीने 'सांगत्यें ऐकाला' लोटला आणि अजून लोटतो आहे. एकापेक्षा अधिक वेळा 'सांगत्यें ऐका' पाहून आलेले किती तरी पदवीधर प्रेक्षक मला माहीत आहेत. सध्या नागपूर विद्यापीठांत प्राध्यापक असलेले माझे एक 'एम्. ए., पी. एच्. डी' मित्र 'सांगत्ये ऐका' तीनदा पाहून आले! ते तर नुकतेच युरोपांत जाऊन आले आहेत. करमणुकीचे अत्यंत नेत्रदीपक वा प्रगत प्रकार त्यांनी तेथे अनुभविले आहेत. अन् तरीहि त्यांना मना-पासून आवडलाय् 'सांगत्यें ऐका'! मीं त्यांना अत्यंत कुतुहलानं विचारलं,


"डॉक्टर, इतकं आवडण्याइतकं 'सांगत्यें ऐकांत' आहे तरी काय?"

"रगेल आणि रंगेल मराटमोळ्या मनाला रिझवील, फुलवील, रडवील आणि पुन्हा हसवील असं सारं कांहीं आहे त्यांत!"

एका सुविद्य मराठी रसिकाचं 'सांगत्यें ऐका'ला हें मानाचं शेला-पागोटं आहे.

आणि मग मीहि 'सांगत्ये ऐका'ला गेलों. थिएटराइतकंच माझंहि मन उत्सुकतेनं तुडुंबलं होतं. चित्रपट सुरू झाला. रंगत गेला. रंग

शिगेला गेला आणि चित्रपट संपला. एक गोष्ट मला अगदी खास जातीने प्रत्ययाला आली की, साडेतेराहजार फुटांच्या ह्या चित्रपटांत एक फूटभर तुकडाहि कंटाळवाणा नाही. कथेंत तसूभरहि ढिलेपणा नाही. चढत्या रंगतीची अन् वाढत्या उत्सुकतेची आटेबंद कथा आहे ही. तसं पाहिलं तर ह्या कथेंत अगदी नवीन असं कांहीच नाही. पण जें आहे तें अगदी आपली जागा अचूक पकडून फिट्ट बसलें आहे. नाट्यमय, पीळदार आणि पेचबंद कथानक हा 'सांगत्यें ऐका'च्या यशाचा केवळ कणा आहे. कथालेखक श्री. गो. गं. पारखी हे रसिकांच्या निर्विवाद कौतुकाचे धनी आहेत.



• महादेव पाटील....!

'सांगत्यें ऐकां'तील प्रत्येक पात्र जिवंत आहे, जातिवंत आहे. प्रत्येकाचे गुणदोष अगदी निर्दोष आहेत, सकस आहेत आणि अत्यंत वास्तवपूर्ण आहेत. थोर मनाची, पण अगतिक असलेली जानकी पाटलीण ( रत्नमाला ) आणि सरळमार्गी, पण दुर्जनाच्या अन् दुर्दैवाच्या दाढेंत सांपडलेली निष्पाप हौसा ( सुलोचना ) यासुद्धा प्रेक्षकांची सहानुभूति शंभर टक्के काबीज करतात. कारण त्यांचें दुबळेपण अतिशय वास्तवपूर्ण आहे पाटील ( साळवी ), चिमा ( हंसा ), सखाराम ( चंद्रकांत ) आणि इतर एकूण एक—म्हणजे अगदी तमाशांतील सोंगाड्या, पेटीवाला आणि नाचणाऱ्या बायासुद्धा—व्यक्तिरेखा अत्यंत हुबेहूब रेखाटल्या गेल्या. प्रत्येक पात्राची अगदी चटकन् ओळख पटते. पात्रदर्शनांतील वास्तवता अगदी बारीकसारीक हालचालींतूनहि व्यक्त झाली आहे.

आणि प्रत्येक नट-नटीने ती तद्रूप होऊन उत्कृष्टपणें वठवली आहे. सर्वांत उत्कृष्ट काम केलें आहे साळवींनी. त्यांची पाटलाची कामगिरी पाहून गांववाले प्रेक्षक त्यांना शिव्या देतात ! तीच खरी पुष्पवृष्टि आहे ! हंसा वाडकरांचें कामहि असेंच अप्रतिम आहे. खरं म्हणजे साळवी आणि हंसा हेच या चित्रपटाचे खरेखुरे नायक-नायिका आहेत. बाकी सर्वांच्या भूमिका उत्तमच आहेत. कोणींहि कसूर केलेली नाही. परंतु श्री. सूर्यकांत यांना एक सुचवावेंसें वाटतें की, ईश्वरदत्त देखणेपण म्हणजेच अभिनय नव्हे ! प्रगति करावयास त्यांना प्रचंड वाव आहे ! सूज्ञांस अधिक सांगणें नलगे ! असो !

—आणखी एक विशेष म्हणजे सबंध चित्रपटांत कुठेहि कृत्रिम, ढोंगी बोधवाद नाही. ओढूनताणून सत्पक्षाचा विजय दाखविण्याचा अट्टहास नाही. पात्रांचे बरेवाईट स्वभावधर्म ( किंवा खोडी ) दाखविण्याच्या बाबतींत कुठेहि अतिरंजितता नाही, किंवा नेभळा अंगचोरपणाहि नाही. 'सांगत्यें ऐकां'त 'बाई' आहे ( बाटली दाखवायची राहून गेलं आहे ! ) तमाशा आहे, बलात्कार आहे, शृंगार आहे आणि तरीहि प्रेक्षकांच्या वैषयिक भावना पान्हवण्याचा कुठेहि प्रयत्न नाही. तमाशाच्या तालावर रसरंग उधळीत उधळीत हें कथानक धावतें आहे. परंतु कुठेंहि अश्लीलतेच्या चिखलांत त्याचें पाऊल घसरत नाहीं आणि तरीहि 'खेळ' तमाशाहून रंगतो. कथालेखकाचें हें केवढें प्रचंड यश आहे ! गोंडस किंवा पवित्र नांवाखाली चित्रपट केलेला अश्लीलतेने सजवून बाजारांत बसविणाऱ्या हिंदी चित्रनिर्मात्यांनी व कथालेखकांनी 'सांगत्यें ऐका' एकवीस वेळा पाहावा असें आम्ही सुचवितों. बलात्काराचा प्रसंग पाहत असतांना पुरुष प्रेक्षकांच्याहि चित्तवृत्ति प्रक्षुब्ध होतात. कोणाच्याहि तशा होतील, ( बहुधा प्रा. ना. सी. फडके यांच्यासुद्धा ! ) अशाच अचूक आणि वास्तव सूचकतेने हा प्रसंग टिपला गेला आहे.

### ह्या गोष्टी मात्र खटकल्या

'सांगत्यें ऐका' च्या यशाचे दुसरे वाटेकरी म्हणजे दिग्दर्शक श्री. अनंतराव माने. चित्रपटांत ठायी ठायी व्यक्त होणाऱ्या वास्तवतेचें दर्शन श्री. माने यांनी घडविलें आहे. पात्रांच्या बोलण्याच्या लकबी, रीतरिवाज, तमाशांतील, हॉटेलांतील, शेतकऱ्यांच्या झोपडींतील, पाटलाच्या वाड्यांतील मांडणी व वातावरण आणि प्रत्येकाच्या स्वभावांतील बारीक बारीक खाचाखोचा श्री. माने यांनी अत्यंत अचूक आणि मार्मिकतेने टिपल्या आहेत. तमाशा, खेडेगांव, तेथलीं माणसें आणि वातावरण यांचा अतिशय सूक्ष्म अभ्यास ( आणि अनुभवहि ) श्री. माने यांनी केला आहे, यांत

• या दोन निष्पाप जीवांचा बळी कां घेतलात !



शंकाच नाही. फक्त तीन-चार गोष्टी खटकतात. पाटलीण ' माहेरी गेल्यावर विधवा हौसा पाटलासाठी विडा तयार करून ठेवते असें माने यांनी दाखवलंय. साफ चुकलं ! हौसा-सारखी सती हें असलें काम करणार नाहीं. कोणीहि भिनरंगीत परस्त्री परपुरुषासाठी विडा करणार नाही. मग ही चूक कोणाची ? श्री. पारखी यांची नक्कीच नव्हे ! मग श्री. माने यांची की पटकथालेखक श्री. व्यं. दि. माडगूळकरांची ? बहुधा दोघांचीहि ! दुसरी चूक म्हणजे बलात्कार करण्यासाठी आलेल्या पाटलावर हौसा तांब्या फेकते. तो लागतो टांग-लेल्या दिव्याला, दिवा फुटतो. अंधार होतो. अन् बलात्कार करूं पाहणाऱ्या पाटलाची आयतीच सोय होते. नको होतं हें दिवा फुटणं. तिसरी चूक मात्र नक्कीच व्यं. दि. मा. ची आहे. छोट्या कृष्णाला राजाराणीची गोष्ट सांगतांना खेडवळ हौसा एकदम इतकं शुद्ध आणि साहित्यिकी थाटाचं मराठी बोलूं लागते की, असं बोलणं सत्यसृष्टींत श्री. माने यांना-सुद्धा जमणार नाही ! ( क्षमा असावी ! ) परंतु हें एवढं सोडून बाकी सर्व अचूक आहे.

नृत्यांचें दिग्दर्शन लीला गांधी व श्री. गोखले यांचें आहे. ह्या चित्रपटांत नाचणं फार आहे. परंतु अत्यंत कौतुकाची गोष्ट ही आहे की, प्रत्येक नाच व त्यांतील अभिनय आणि थाट अगदी वेगवेगळे आहेत. प्रत्येक हालचालींत पाहिल्यापेक्षा कांहीतरी नवीन, आकर्षक व नखरेल अभिनय आहे. त्यामुळे तोचतोचपणा कुठेहि नाही. श्री. गोखले व गांधी यांनी मूर्तिमंत तमाशा पडद्यावर सादर केला आहे. जयश्री गडकर व हंसा वाडकर यांच्या साथीला ज्या नाचणाऱ्या बाया आहेत, त्या तर अगदी ' खास ' आहेत ! त्यांच्या अभिनयांतील मिस्किलपणा व खट्याळपणा वाखाणण्याइतका वास्तव व सुंदर आहे.

पटकथा व संवाद उत्तम आहेत. पद्यलेख-नाबद्दल श्री. ग. दि. मा. पुन्हा पुन्हा कौतुक करण्याच्या पलीकडे गेलेले आहेत. पण तरीहि इथे श्री. ग. दि. मा.ची एकदा जोराने पाठ थोपटलीच पाहिजे. विशेषतः साताऱ्याला जातांना सांडलेल्या त्यांच्या बुगडीबद्दल ! श्री.



● रामराम घ्या
दूर करा जी
भंवतीचा घोळका
दिलवरा
दिल माझें ओळखा

वसंतराव पवार यांनी दिलेल्या चाली सोप्या आणि गोड आहेत. छायालेखन वगैरे तांत्रिक गोष्टी यशस्वी झाल्या आहेत.

## सांघिक यश

सर्वांत महत्त्वाची गोष्ट लक्षांत येते ती ही की, हा चित्रपट केवळ कोणाच्याहि नांवामुळे चाललेला नाही. अमूक कथालेखक आहे म्हणून, अमूक नटनटी काम करीत आहेत म्हणून, अमूक एक दिग्दर्शक आहे म्हणून किंवा अमक्याचं संगीत आहे म्हणूनच हा चित्रपट लोकांना इतका आवडला व यशस्वी झाला असें अजिबात नाही. किंबहुना सर्व-सामान्य प्रेक्षकांचें लक्ष, हे दिग्दर्शक, लेखक, निर्माते, संगीत-दिग्दर्शक कोण आहेत इकडे जातहि नाहीं. त्याला आवडतो एकंदर सबंध ' सांगत्यें ऐका ' चित्रपटच. मथितार्थ असा की ' सांगत्यें ऐका ' चें यश हें केवळ कोणाहि एकट्या-दुकट्याचें नसून तें पडद्यावरील व पडद्यामागील एकूण एक कलावंतांचें आहे. प्रत्येकाने आपली कामगिरी चोख बजावली आहे. म्हणूनच आम्ही म्हणतों की, हें व्यक्ति-यश नसून संघयश आहे. ' सांगत्यें ऐका ' चें यश पाहून अनेकांनी ग्रामीण व तमाशांतील घटनांवर चित्रपट काढले. परंतु सर्वांची साफ दैना झाली ! ' पंचारती ' ' चाळ माझ्या पायांत ' ' सलामी ' ' वैजयंता ' इत्यादि सर्व चित्रपटांची केवढी दाणादाण उडाली हें आपण पाहिलेंच आहे. अपार किर्तीचे कलावंत व तंत्रज्ञ वापरूनहि दाणादाण उडाली. इतकेंच काय, पण ' सांगत्यें ऐका ' तील कलावंत—तंत्रज्ञांनी काढलेले इतर चित्रपटहि कोसळलेच ! कां ? काय कारण ? त्यांत भ्रष्ट नकला होत्या, केवळ गल्लाभरू मालमसाला होता, अवास्त-वतेचें बेगड होतें आणि सांघिक प्रयत्नांचा अभाव होता. याच्या नेमकी उलट गोष्ट ' सांगत्यें ऐका ' मध्यें होती, म्हणूनच जय आणि श्री तेथे माळ घेऊन धांवत गेली.

' सांगत्यें ऐका ' ने मराठी चित्रसृष्टीला मानाची शालू-पैठणी नेसविली यांत शंकाच नाही.

● ● ●

# अंधेर नगरी पुणे

कार्यकारण मीमांसा

खोपोली येथील टाटा कंपनीकडून पुणें शहरास विजेचा पुरवठा होतो. तो १००,००० व्होल्टस्चा असतो. गणेशखिंड येथील मुख्य रिसिव्हिंग स्टेशन येथें दोन Transformer च्या साहाय्यानें विजेचा दाब कमी करतात. (२२००० अगर ११००० व्होल्टस्पर्यंत.) तेथून तो रास्ता पेठ येथील सब-स्टेशनमध्यें आणतात व तेथून शहरांत निरनिराळ्या बारक्या सब-स्टेशनमध्यें आणून तेथें विजेचा दाब ४४० व्होल्टस्पर्यंत आणतात. रस्त्यावर दिसणाऱ्या विजेच्या तारांतून 3 Phase, ४४० व्होल्टस्चा पुरवठा असतो. परंतु घरच्या उपयोगाकरतां 1 Phase, २२० व्होल्टस्चा पुरवठा असतो.

नुकत्याच झालेल्या अपघाताची मीमांसा—

पुण्यांत कांहीं दिवसांपूर्वीं गणेशखिंड स्टेशनमध्यें झालेला अपघात तेथील स्विच्–गिअरमध्यें बिघाड झाल्यामुळें झाला. निरनिराळ्या ठिकाणीं विजेचा पुरवठा मुख्य केंद्रांतून स्विच्–गिअर मार्फत करतात. ह्या स्विच–गिअरमधील Insulating Tank फुटला असावा व त्यामुळें अपघात झाला असावा असा तज्ज्ञांचा कयास आहे. अर्थात् नक्की कारण अद्याप पूर्णतः उलगडलेलें नाहीं व त्याबाबत जारीनें चौकशी चालू आहे.

विजेचा पुरवठा करण्यासाठीं स्विच् हा मशिनरीच्या जवळ जाऊन ऑपरेटरला चालू करावा लागतो. त्यामुळें जर मशिनरीमध्यें बिघाड असेल तर तो चालू करणाऱ्या ऑपरेटरला अपघात होण्याची शक्यता असते. परवांचा आणि १९५५ सालीं झालेला अपघात ह्याच कारणामुळें झाला. हा अपघात होण्याचे दिवशीं सकाळीं एका निकामी झालेल्या स्विच्ची दुरुस्ती चालू होती. त्यावेळीं अर्थातच इतर कांहीं स्विचेस् बंद ठेवावे लागले. त्या स्विच्ची दुरुस्ती पूर्ण झाल्यावर पुरवठा पुन्हां सुरू करतांना एकदम भडका उडाला.

सामान्य माणसाच्या मनांत साहजिकच असा विचार येतो कीं, इतके दिवस दुरुस्तीस कां लागावेत? वास्तविक निकामी झालेला स्विच् बदलून बसविण्यास फारसा वेळ लागत नाहीं. परंतु भडका उडाला त्यावेळीं इतर कांहीं केबल्स जळाल्या व कांहीं आग विझवितांना पाणी मारल्यामुळें ओल्या होऊन निकामी झाल्या. त्या सर्व बदलण्यासाठीं साहजिकच बराच काल लागणें अगदीं अपरिहार्य आहे.

संरक्षक उपाय–योजना तांतडीची!

कोठल्याहि मशिनरीमध्यें बिघाड होऊन अपघात होण्याची शक्यता असते. परंतु अशावेळीं मनुष्यहानी कशी टाळता येईल हा मुख्य प्रश्न आहे. ह्याला उपाय म्हणजे Remote Control Switch ची व्यवस्था ठेवणें. म्हणजेच स्विचगिअर पासून सुरक्षित अंतरावर कंट्रोलर ठेवणें. ह्यामुळें अपघात झाल्यास फार तर मशिनरी व इमारत यांस धोका पोहोंचेल. परंतु कामगार सुरक्षित राहतील. वास्तविक १९५५ सालीं झालेल्या भीषण अपघातानंतरच अशा तऱ्हेची व्यवस्था तावडतोब करावयास हवी होती. आता तरी अशी योजना तांतडीनें करणें अगत्याचें आहे.

वेळोवेळीं वीज–पुरवठ्यांत व्यत्यय यावयाचा नसेल, तर मुंबई-शहराप्रमाणें Under Ground केबल्स टाकावयास हव्यात. केवळ जास्त खर्च येईल म्हणून हें काम लांबणीवर टाकणें श्रेयस्कर नाहीं.

भारताचा सर्वांगीण विकास चालू आहे व ह्या कार्यांत अद्ययावत् तंत्रयोजना ठिकठिकाणीं अमलांत आणल्यामुळेंच प्रगति होऊं शकेल. पंचवार्षिक योजनांमध्यें मोठमोठ्या विद्युत्–शक्ति पुरविणाऱ्या योजना हातीं घेतल्या गेल्या आहेत. परंतु विद्युत् शक्तीच्या सोयी जसजशा वाढत आहेत तसतसा एक नवा प्रश्न पुढे येत आहे. विजेच्या तारांतून अखंडपणें विजेचा प्रवाह कसा चालू ठेवावा आणि विद्युत्–प्रवाह बंद न करतां तारांची दुरुस्ती कशी करावी हा एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. 'Live Mains Repair' करण्याचें तंत्र हें या प्रश्नाचें एकमेव उत्तर आहे. तीव्र शक्तीचा विद्युत्–प्रवाह नेणाऱ्या मुख्य व दुय्यम मार्गांच्या तारांमध्यें (High Tension Lines) विजेचा प्रवाह चालू असतांनाच त्यांची डागडुजी व दुरुस्ती करण्याचें हें तंत्र आहे. त्यामुळें वीज—ग्राहकांना अखंडपणें वीज मिळूं शकते. अशा तऱ्हेची Equipment व Instruments पुणें इलेक्ट्रिक कंपनीजवळ सध्यां दिसत नाहींत. शक्य तो लवकर अशी उपाययोजना करणें आवश्यक आहे.

—प्रा. रा. ग. कुलकर्णी, एम्. ए.




मे. राम जी. देव ॲन्ड ब्रदर्स

५०६ शनीवार पेठ, मेहुणपुरा, पुणें शहर

शनिवार पेठेंतील ग्राहकांच्या विश्वासास पात्र ठरलेलें किराणा व भुसार-स्टेशनरी मालाचें

एकमेव दुकान

[कोरेगांवपार्क ते चतुःशृंगीपर्यंत कुठेंहि २५ रु. चे वर ऑर्डर असल्यास माल विनामूल्य घरपोंच केला जातो]

# यंत्रसामुग्रीची निगा नीट आहे का !

'माणूस' मध्यें देण्यांत यावयाच्या 'पत्ररूप परिसंवादा' विषयीची घोषणा अन्यत्र दिलेली आहेच. तथापि मध्यंतरी पुण्याच्या नागरिकजीवनांत वीजपुरवठ्याचा जो गोंधळ झाला, त्यांतून पहिल्या अंकांतील परिसंवादालाहि प्रस्तुत आकार आला. यामुळे नियोजित परिसंवादाची रूपरेषाहि वाचकांच्या दृष्टीसमोर राहील.

- वीज कंपनीच्या कारभाराची चौकशी झालीच पाहिजे
- उद्योगधंद्यांना कंपनीने भरपाई द्यावी.

रा. संपादक 'माणूस' यांसी
सा. न. वि. वि.

आपल्या नवोदित मासिकामध्यें पुढील पत्रास स्थान द्यावें ही विनंती आहे.

दि. १५ मे १९६१ पासून पुणें शहरांतील वीजपुरवठा अतिशय अनियमित झाल्यामुळें नागरिकांचें दैनंदिन जीवन विस्कळित झालें आहे. पुणें शहर हें शिक्षणाचें व सेवानिवृत्तीनंतरच्या काळांत वास्तव्य करणारांचें माहेरघर आहे असें समजलें जातें; तरीहि येथें अनेक उद्योगधंदे विजेच्या साहाय्यानें चाललेले आहेत हेंहि खरें आहे.

दि. १४ मे रोजीं पुण्यामध्यें वादळ झालें आणि पावसानेंहि पुण्याला खूप झोडपलें. या वादळामुळें वीज कंपनीची जी पुरवठा करणारी यंत्रणा आहे तिचेंहि पेकाट मोडलें गेलें; याचा प्रत्यय तद्नंतरच्या १५ दिवसांत नागरिकांना चांगलाच आला आहे. कारखान्यांचें उत्पादन बंद पडलें, मजुरांचें वेतन मात्र लागू झालें आणि ठरविलेली योजना १५ दिवसांनीं पुढें ढकलावी लागल्यानें कारखानदारांना तदनुषंगिक अशा अनेक आपत्ति सहन कराव्या लागल्या आहेत.

नागरिकांना अंधारांत बसावें लागलें हें जसें खरें तसें पाणीपुरवठा, सरकारी दुधपुरवठा, पिठाच्या गिरण्यांची सोय इत्यादि सुखसोयींना मुकावें लागलें.

नागरिकांना व कारखानदारांना काय काय नुकसान सोसावें लागलें याचें चर्वितचर्वण करण्यापेक्षां या एकंदर घटनेमुळें सुचलेले विचार पुढें मांडीत आहे.

( १ ) वीजपुरवठयाच्या यंत्रणेबद्दल व तिच्या कुवतीबद्दल सध्यां अनेक तर्कवितर्क चालू आहेत. वीजकंपनीचा सरकारशीं झालेला करार संपुष्टांत येणार असून नवीन करार होण्याची शक्यता कमी असल्याने यंत्र सामग्रीबद्दल कंपनी बेफिकीर आहे असा आरोप अनेक ठिकाणी केला गेला आहे. यावर कंपनीतर्फे खुलासा झाला असून याचा इन्कारहि केला गेला आहे. परंतु यावर माझा विश्वास बसत नाहीं. एका पावसानें व वादळानें यंत्रणा कोलमडावी व आठ दिवस दुरुस्ती होण्यास लागावेत याचा अर्थ यंत्रसामग्री कमकुवत झाली आहे हाच मी करतों. दम्यानें जराजर्जर झालेल्या माणसाला जसा पावसाचा एक शिडकावाहि अंथरूणांत लोळवितो, तसा एक वादळाचा तडाखा या विजेच्या सामग्रीला चारी मुंड्या चीत करतो. मला तांत्रिक अडचणींचें समजत नाहीं; पण एवढें कुणाहि सामान्य माणसाला समजेल कीं, मुळांत जीर्ण झालेल्या तारा, इन्सुलेटर्स, वगैरे साहित्य पावसाच्या तडाख्यानें कोलमडणार यांत शंका नाहीं. वेळच्यावेळीं जीर्ण साहित्यांत बदल करण्याचा आग्रह सहकारी इलेक्ट्रिकल इन्स्पेक्टरनें केला कीं नाहीं याची चवकशी जरूर व्हावयास हवी. खाजगी कारखानदारांकडे जेव्हां सरकारी तपासणी होते, तेव्हां बारीकसारीक दोषहि चालत नाहीं; तर मग सर्व जनतेच्या सुखसोयीसाठी जी यंत्रणा चालते तिच्यांतील दोष सरकारी अधिकारी चालवून घेणार नाहींत अशी मला खात्री वाटते. अशा अधिकाऱ्यांनीं शेरे मारूनहि यंत्रसामग्रींत सुधारणा केली गेली कीं नाहीं याचीहि चौकशी अवश्य व्हावयास हवी आहे.

सामान्यपणें दरवर्षीं पावसाळ्यांत विजेचा पुरवठा तुटण्याचा अनेक

ठिकाणी अनुभव येतो. एकाददुसरा दिवस वीज-पुरवठा बंद होतो व जीर्णशीर्ण साहित्यांत थोडीफार सुधारणा करून पुनः सुरू होतो. पण या वेळेस मात्र १५ दिवस नागरिकांची कुचंबणा झाली आहे, ही गोष्ट काणाडोळा करण्यासारखी राहिलेली नाहीं.

(२) या आपत्तीमध्यें वीजकंपनीचे अधिकारीहि भांबावून गेले असावेत असें वाटतें. १५ मे रोजीं जर परिस्थितीची पाहाणी करून आठ दिवस वीज देऊं शकणार नाहीं असें अधिकाऱ्यांनीं निवेदन केलें असतें तर तें फार सुखाचें झालें असतें असें मला वाटतें. दररोज हजारोंनीं कंपनीकडे होणाऱ्या चौकशा थांबल्या असत्या. अधिकारी वर्ग निश्चित कांहीं सांगूं शकत नव्हता व त्यामुळें येणाऱ्या ग्राहकांना कांहींतरी सांगून वाटेस लावण्याच्या उद्योगांत गर्क होता. कंपनीचा टेलिफोन नेहमीं 'एंगेज्ड' राहत होता. पुष्कळ वेळां रिसीव्हर उचलून उत्तर न देतां ठेवून दिला जात असावा असा तर्क करण्यास भरपूर वाव नागरिकांना मिळाला. वीजकंपनीचे अधिकारी व कामगार यांनीं अहोरात्र खटपट केली हें मान्य केलें पाहिजे. पण तरीसुद्धा त्यांनीं योग्य निवेदनें करून जनतेला विश्वासांत घेतलें नाहीं ही गोष्ट खरी आहे. पहिले पांच दिवस अनेक तऱ्हेचे गोंधळ होऊनहि एकहि निवेदन कंपनीतर्फे प्रकट झालें नाही याचा नागरिकांना राग येणें स्वाभाविक होतें.

याचेमागें कोणतीं कारणें आहेत यावर कोणी प्रकाश टाकूं शकेल काय? हा सावळागोंधळ केवळ दैवाधीन कारणांमुळें झाला असें नसून त्यामागे मानवी हलगर्जीपणा हेंहि कारण आहे काय याची जाहीर चौकशी व्हावी असें सुचवावेंसें वाटतें.

—यशवंत जोशी, पुणें.

— २ —

श्री. संपादक यांसी स. न. वि. वि.

आपल्या मासिकांतील 'पत्ररूप परिसंवादाची' कल्पना आवडली. पहिल्याच अंकांत आपण पुण्यांतील विद्युत् अपघातासंबंधीं वाचकाचीं पत्रें मागविलींत हेंहि उचितच आहे. या संबंधींचे माझे विचार मी थोडक्यांत पुढे देत आहे.

(१) पुणें शहरांतील औद्योगिक क्षेत्र दिवसेंदिवस झपाट्यानें वाढत आहे. या औद्योगिक क्षेत्रासाठीं विद्युत्‌शक्तीहि फार मोठ्या प्रमाणावार वापरली जात आहे. यामुळें येथील कंपनीतील विद्युत् यंत्रावरचा ताणहि वाढत आहे. हा ताण ध्यानांत घेऊन त्यानुरूप वाढत्या शक्तीची यंत्रसामग्री कंपनीनें अद्याप बसविल्याचें ऐकिवांत नाहीं.

(२) कंपनीजवळ यंत्रांचे स्पेअरपार्टस् भरपूर प्रमाणांत असणें आवश्यक आहे. याबाबत कंपनी योग्य ती काळजी घेत नसावी असें दिसतें.

(३) मुंबईत विद्युत् पुरवठा केंद्रें अनेक ठिकाणीं विभागलेलीं

# कंपनीची वीज यंत्रणा अधिक कार्यक्षम हवी ...

(३) वीज असतांना विजेचें महत्त्व कळत नाहीं. पण वीज गेल्यावर मात्र आपलें परावलंबित्व ध्यानात येतें. विज्ञानयुगांत मानवानें कितीहि पराक्रम केले असले, तरी क्षणाक्षणाला व प्रत्येक नव्या विक्रमाबरोबर तो परावलंबी होत आहे ही जाणीव बोचक आहे. शहराला होणारा पाणीपुरवठा विजेच्या अभावीं थंडावल्याबरोबर घरोघरी धावपळ सुरू झाली. टेलिफोन ही तर सुशिक्षित जीवनांतील अत्यावश्यक गरज, पण तिथेहि विजेचा अभाव जाणवला. लहान बालकाऱ्या तोंडी पडणारें स्वस्त दूध विजेच्या अभावीं मिळूं शकलें नाहीं. अशा एक ना दोन हरेक बाबतींत वीज नाही हें प्रत्येकाला बोचलें. यापासून बोध काय घेणार? विजेची गरज कमी करणें तर शक्य नाहीं; पण आहे ती वीजयंत्रणा अधिक कार्यक्षम करणें हा एकच उपाय यांतून दिसतो.

वीजकंपनीनें केलेल्या या सावळ्यागोंधळाची चौकशी व्हावयाला हवी व ती चौकशी न्यायालयीन दर्जाची व्हावयास हवी असें एकंदर विचारावरून वाटतें. ग्राहकांना व विशेषत: कारखानदारांना अधिकारी-वर्गानें दररोज चुकीची माहिती दिल्यामुळें कारखाने बंद ठेवतां आले नाहीत व त्यामुळें वेतनाबाबतचें नुकसान झालें. याची नुकसानभरपाई कारखानदारांनीं वीजकंपनीकडे कां मागूं नये? अपघात होऊन वीज-पुरवठा तुटला हें सत्य आहे. पण दुरुस्ती लवकर होऊं शकत नाहीं आहेत. पुण्यांतील पुरवठा केंद्रांची संख्या गरजेच्या मानानें अपुरी आहे. यामुळें एकेका केंद्रावर ताण जास्त पडून विद्युत् पुरवठ्यांत खंड पडण्याचे प्रसंग अनेकदां उद्‌भवतात.

(४) कंपनीच्या मुख्य केंद्रांत व उपकेंद्रांत तांत्रिक विभागासाठीं जो सेवकवर्ग आहे तो बहुतेक निवृत्तीच्या वाटेवरचा आहे. त्यामुळें या विभागाची कार्यक्षमता अपेक्षेच्या मानानें फारच कमी आहे. नवीन पदवीधर तंत्रज्ञांची नेमणूक कंपनी कां लांबणीवर टाकीत आहे—याचें कारण कोणाच्याहि ध्यानांत येईल.

(५) वीज कंपनींत ट्रॅन्स्पोर्टेशन हा भागहि महत्त्वाचा आहे. निदान अपघातांच्या वेळीं तरी जलद वाहनांची गरज नेहमीच भासते. कंपनी आपल्या मोडक्या-तोडक्या वाहनांवरच अद्याप किती दिवस वेळ भागवून नेणार आहे?

या सर्व गोष्टींचा विचार करतां कंपनी खाजगी नफेबाजीच्या आहारीं जाऊन आपल्या कामगारांच्या जीविताशीं खेळत आहे व नागरिकांच्याहि अनंत प्रकारच्या हानीस कारणीभूत होत आहे, असें माझें स्वच्छ मत झालेलें आहे. कळावें.

—भा. ल. कुलकर्णी

# ‘अभिराष्ट्रेण वर्धताम्’ हें वेदवचन आजचा ‘सामाजिक अंधःकार’ दूर करील

पुणें वीज कंपनीच्या एकूण कारभाराबाबत पुण्यांतील नागरिकांच्या मनांत केवढा असंतोष वास करीत आहे याची थोडीफार कल्पना मागे दिलेल्या पत्रांवरून सर्वांना येईलच. सरकारतर्फे या कंपनीच्या कारभाराची जाहीर चौकशी होऊन ज्या प्रमाणांत कंपनीचा चालकवर्ग अपघाताला जबाबदार असेल त्या प्रमाणांत त्याला कडक शासन दिलें गेलें पाहिजे ही सर्वसामान्य नागरिकाची याबाबतची किमान अपेक्षा आहे.

परंतु ज्या राज्यांत काळाबाजारवाले, करचुकवे, साठेबाजी करून भरमसाठ नफा उकळणारे असंख्य समाजद्रोही उजळमाथ्याने वावरत आहेत, त्या राज्यांत नागरिकांच्या न्यायाबाबतच्या किमान अपेक्षा पूर्ण होतीलच असें कांहीं सांगवत नाही. वास्तविक ‘समाजवादी समाजरचना’ अस्तित्वांत आणण्यासाठी वचनबद्ध झालेलें हें कल्याणकारी राज्य आहे! परंतु दहा–वीस खाजगी कारखान्यांच्या जोडीला एक अत्यंत गैरव्यवस्थेंत व नुकसानींत चालणारा प्रचंड सरकारी कारखाना चालू करणे एवढाच आमच्या समाजवादाचा अर्थ आहे. देशाच्या बहुसंख्य शेतकरीवर्गाला खत–पाण्यावाचून तडफडत ठेवून उगाच कोठेतरी हजारो एकरांच्या एखाद्या यांत्रिक शेतीचा डोलारा उभा करणे म्हणजे समाजवाद आणणें अशी आमची चुकीची समजूत होऊन बसली आहे. गलिच्छ वसत्या तशाच कायम ठेवून मध्येच एखादा रंगमहाल कोणी उभा केला तर तो शहरविकास होऊं शकतो कां! तसेंच समाजविकासाबाबत, समाजवादी समाजव्यवस्थेबाबत म्हणतां येईल. समाजवाद म्हणजे सामाजिक न्याय व समता. सामाजिक अन्यायाला व विषमतेला कारणीभूत होणारे समाजद्रोही कंटक प्रथम उपटून टाकल्याशिवाय येथे समाजवादाची शेती पिकेल ही अपेक्षा बाळगणेंच चुकीचें आहे. पण काय करावें! आमचे मोठमोठे नेते अशी वांझोटी अपेक्षा बाळगून आहेत आणि ती फोल ठरल्यावर मग ‘हें काय फळ मम तपाला’ म्हणून दुःखीहि होत आहेत.

ठायींठायीं, वेळोवेळीं, जमेल त्या साधनांनिशी, असेल त्या शक्तीनिशी अन्यायाचा व विषमतेचा प्रतिकार करणारा समाजच ‘लोकशाही समाजवाद’ किंवा ‘समाजवादी समाजव्यवस्था’ अस्तित्वांत आणू शकतो, ती टिकवूं शकतो. पांच वर्षांतून एकदा जागे होण्याने लोकशाही नांदणार नाही किंवा दुर्गापूर-भिलाईच्या कारखान्यामुळे समाजवादहि अवतरणार नाही. सामान्य नागरिक समाजहितदक्ष, जागरूक व प्रतिकारक्षम होणें म्हणजे लोकशाही समाजवाद येणें; समाजकल्याणबुद्धीने आपणहून आपला स्वार्थ मर्यादित करणें याचें नांव समाजवादी समाजव्यवस्था. नव्या समाजरचनेचा हाच मुख्य सात्त्विक अंश आहे.

हा अंश ‘अभिराष्ट्रेण वर्धताम्’ या आमच्या वेदवचनांत उत्तम तऱ्हेने व्यक्त झालेला आहे. ‘समाजासहित आपला विकास साधूं या’ ही विचारसरणी यापुढच्या काळांत जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत आम्ही अनुसरली तर सध्यांचा अंधःकार नाहीसा होण्यास कितीसा वेळ लागणार!

—संपादकीय

# जगरहाटी :

## ( जागतिक घडामोडींचा धांवता आढावा )

—पद्माकर कुलकर्णी

हा अंक हातांत पडेल तेव्हां व्हिएन्ना येथें अमेरिकेचे अध्यक्ष जॉन केनेडी आणि सोवियत युनियनचे पंतप्रधान निकिता खुश्चोव या दोघां बड्यांची 'शिखर-भेट' सुरू झालेली असेल. आज आंतरराष्ट्रीय राजकारणांत या दोन राष्ट्र-गटांतील शीत युद्धानें जी तंग परिस्थिति निर्माण झाली, जें तिसऱ्या विश्वव्यापी महायुद्धाचें संकट छायारूपानें वावरत आहे, त्या परिस्थितीच्या व महायुद्धाच्या भीतीचें कांहीं प्रमाणांत परिमार्जन होण्याचा प्रयत्न या भेटींत होईल असें अखिल जगताला वाटत आहे. त्यांतहि अमेरिकेचे नवे अध्यक्ष या नात्यानें केनेडी हे प्रथमच खुश्चोवना भेटत आहेत ही गोष्ट भावी राजकारणाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची ठरते. खरोखर अखिल मानव जातीचें भवितव्य याच दोन राष्ट्रांच्या व नेत्यांच्या विवेकशक्तीवर अवलंबून आहे यांत मुळींच शंका नाहीं.

गेल्या महिन्याभरांत आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत घडलेल्या मोठ्या घटना म्हणजे लाओस प्रकरणीं जिनीव्हा येथें १४ राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय कमिशनच्या होऊं घातलेल्या बैठकी. यापूर्वी एक हप्ता झाला आहे. तीन आठवडे झाले या बैठकी सुरू होऊन, पण तिची खुली बैठक —अधिवेशन भरण्याची तारीख ता. ३० मे पर्यंत तरी निश्चित झालेली नाहीं व त्यांत निश्चित प्रगति केव्हां होईल ह्याचाहि अंदाज या घडीला देतां येत नाही. ब्रिटिश प्रतिनिधि मॅक्डोनाल्ड आणि रशियन प्रतिनिधि जॉर्जी पुष्कीन यांच्यांत वाटाघाटी मात्र याविषयीं चालू आहेत.

कॉंगोच्या प्रकरणांत या काळांत विशेष उल्लेखनीय वळण लागलेलें नाहीं. तथापि कटांगाचे अध्यक्ष शोम्बे यांची नजरकैद, त्यांचें लिओपोल्डव्हिलला आगमन आणि कॉंगोली पार्लमेंट भरविण्याच्या दृष्टीनें कॉंगोली नेत्यांच्या हालचाली या त्यांतल्या त्यांत उल्लेखनीय घटना. यूनोचे सरचिटणीस डाग हॅमरशील्ड यांचे कॉंगोतील खास प्रतिनिधि श्री. राजेश्वर दयाळ यांनी आपल्या पदाचा अखेर राजिनामा दिल्याची वार्ता प्रसिद्ध झाली असून ते पूर्ववत् कराचींतील भारतीय हायकमिशनरपदीं आतां रुजू होतील. कॉंगो प्रश्नावर यूनोच्या चर्चेच्या वेळीं हॅमरशील्ड यांना सल्लामसलत देण्यासाठीं ते एप्रिल महिन्यांत न्यूयॉर्कला गेले, ते ६ आठवडेपर्यंत तेथेच राहिले. त्यांचें कॉंगोत पुन्हां जाणें होणार किंवा नाहीं याविषयीं पुष्कळ तर्कवितर्क सुरू होते. कॉंगोली नेत्यांना श्री. दयाळ नको होते हें सर्वश्रुतच आहे. पाश्चात्य राष्ट्रांच्या विखारी व बदनामकारक प्रचारानेंहि त्यांची ही उचलबांगडी झाली असें तटस्थ राष्ट्रांनीं प्रकट केलें आहे. पं. नेहरू, दयाळ किंवा हॅमरशील्ड यांनीं हा प्रश्न फारसा प्रतिष्ठेचा मानला नाहीं हें मात्र खरें. हॅमरशील्ड यांनी त्यांच्या कार्याचा गौरवपर उल्लेख केला व स्वतः दयाळ यांनीं आपण शक्तीनुसार यूनोची कामगिरी योग्यप्रकारें बजावली असें म्हटलें आहे. या घटनेचा कांगोतील घडामोडींवर काय परिणाम दिसून येतो हेंच आतां बघावयाचें.

अंगोलांतील पोर्तुगीज सत्तेच्या अत्याचाराच्या वार्ता अधिकाधिक बाहेर येत आहेत, त्या स्वतंत्र व समतावादी मनाला उद्विग्न करणाऱ्याच आहेत. ब्रिटिशमंत्री होम व सालाझार यांची लिस्बन येथें याच धामधुमींत भेट घडून यावी ही गोष्ट एकंदर पार्श्वभूमीवर खेदजनक वाटते. पोर्तुगाल-ब्रिटनच्या संबंधाचें गुणगान तर यावेळीं शोभेसें वाटणार नाहीं.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत भारताच्या दृष्टीनें पाहावयाचें झाल्यास फारसा हितकर कोणताच बदल दिसून येत नाहीं. चीनचें धोरण होतें तसेंच आडमुठेपणाचें आहे. पाकिस्तानचा वैराग्नि काश्मीर—प्रकरणीं पुनश्च भडका घेऊं पाहत आहे. आझाद काश्मीर स्वतंत्र सरकार पुकारून संघर्षाची ठिणगी पडल्यास नामानिराळे होण्याचा डाव पाकिस्तान खेळत आहे. पाक अफगाण संबंधहि सीमेवरील गोळीबार व बॉंबफेकीनें बरबटलेले दिसतात.

• • •

दुर्गापूर येथील अ. भा. कॉंग्रेस कमिटीच्या अधिवेशनांत, आंतरराष्ट्रीय ठरावांत कॉंग्रेसनें चिनी व पाकिस्तानी आक्रमणापासून भारतीय सीमांचें प्राणपणानें संरक्षण करण्याचा निर्धार व्यक्त झाला आहे. मात्र राष्ट्रीय व राजकीय आघाडीवर कॉंग्रेसचें वजन व सामर्थ्य खचत चालल्याचें करुणाजनक दृश्य आतां दिसूं लागलें आहे. राजधानींत जनसंघाकडून दोनदां पराभव खावा लागला. आसाम—बंगाल भाषिक वाद शिगेला पोहोंचला असून मंत्र्यांवर दगडफेक व कॉंग्रेस अध्यक्षांवर सुरीहल्ला करण्यापर्यंत त्यांत माथेफिरूपणाची मजल गेली आहे. वर्षभर वाद जैसे थे ठेवण्याच्या नेहरूंच्या आवाहनाला धूप घातला जाण्याची शक्यता कमी वाटते. राष्ट्रीय एकता व एकसंधता ठरावांत जातीय वादाचें उच्चाटन करण्याचा निर्धार कॉंग्रेसनें केला आहे. पण ठराव हे ठरावच राहतात हा आजवरचा अनुभव.

तिकडे अकाली दलाचे नेते मा. तारासिंगांनीं १५ ऑगस्टपासून आमरण उपोषण करून पंजाबी सुभ्याची मागणी धसास लावण्याची घोषणा केली आहे. तोहि पेंच कॉंग्रेस सरकारपुढें आहेच.

• • •

देशांत निवडणुकीचे वारे वाहूं लागले असून पक्षोपपक्षांची त्या-दृष्टीनें हालचाल सुरू आहे. महाराष्ट्रांतहि तें दिसूं लागले आहे. कॉंग्रेसमधील तिकिटबाजी व गटबाजी अधिकाधिक उघड होऊं लागली आहे.

• • •

पावसाळ्याच्या तोंडींच वादळ व पावसानें महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं विशेषतः कोंकणांत अतोनात हानि झाल्याच्या वार्ता आहेत. लोक त्यामुळें हवालदिल झाले असून कांहींनीं हाय खाऊन अंथरूणच धरल्याच्या वार्ता आहेत. महाराष्ट्र सरकारनें त्वरेनें विमोचनसाह्य पुरविणें याबाबत आवश्यक वाटतें.

# वंदनाके इन स्वरोंमें . . .

# एक स्वर मेरा मिला दो

स्वातंत्र्य मिळाल्यावर ही परिस्थिति पालटली. एक तर शिक्षणाचा प्रसार सर्वत्र होऊं लागल्याने सुशिक्षित-अशिक्षित हा भेद नाहीसा होत चालला; दुसरें म्हणजे दोन्ही ठिकाणचे समाज आता मनोवृत्तींच्या दृष्टीने समपातळीवर येण्याचा संभव वाटला. तंत्रशिक्षण घेणारा शहरांतील पांढरपेशा वर्ग व प्रामुख्याने शेतींत लक्ष घालणारा खेड्यांतील नवा सुशिक्षित समाज या दोघांच्याहि निष्ठा आता शुद्ध व्यावहारिक व व्यावसायिक हिताच्याच राहणार आहेत. 'व्यावसायिक मनोवृत्ति' या दोन भिन्न ठिकाणच्या व आजवर भिन्नभिन्न पातळींवर विचार करणाऱ्या समाजघटकांना एकत्र आणील व त्यांतूनच आपल्याला अभिप्रेत असणाऱ्या सामाजिक समरसतेचा उदय होईल असें दृश्य आज दिसूं लागलें आहे.

या परिवर्तनांत 'माणूस' चें स्थान काय असें आपण विचाराल! उत्तर अगदीं साधें आहे. परिवर्तन घडत आहे. तें इष्ट व योग्यहि आहे. मग जमेल तेवढा हातभार लावणें एवढेंच माणसाच्या हातीं असतें. तेवढेंच काम हा नवा 'माणुस' हि करण्याचा प्रयत्न करणार आहे. 'व्यवसायनिष्ठा' हा या नव्या परिवर्तनाचा मुख्य गाभा आहे. या निष्ठेवर व्यवस्थित आरूढ झाल्याशिवाय आपल्याला व्यापक व विधायक देश-उभारणीच्या कार्यातहि भरीव यश मिळणार नाही, हेंहि तितकेंच सत्य आहे. मग अशा व्यवसायनिष्ठ वैयक्तिक व सामाजिक उभारणीसाठी अवश्य त्या ज्ञानविज्ञानाचा, माहितीचा व तपशीलात्मक संकलनाचा सतत पुरवठा करणें, हें काम कोणीतरी करावयास नको काय? याची आज गरज आहे. 'माणूस' ही गरज पुरी करण्याचा यथाशक्ति प्रयत्न करणार आहे. आशा आहे की, यांत 'तांबडे कंदिल' फारसे अडथळे आणणार नाहीत.

निरनिराळ्या विषयांवरील उपयुक्त माहितीबरोबरच करमणूकहि हवीच. थोडी सकस व उच्च दर्जाची, थोडी हलकीफुलकी व विसरून जाण्यासारखी. आपण म्हणाल, एकच दर्जा कां नाही सांभाळत? अनंतराव, मला वाटते हें जमणें अशक्यच आहे. निरनिराळ्या वाचकांच्या निरनिराळ्या आवडी असतात. एकाच वाचकाच्या आवडीहि सारख्या राहत नाहीत. लांब कशाला! आपणच दिवसाकांठीं किती विविध तऱ्हेचें साहित्य वाचीत असतों तेंच पहा ना! सकाळच्या प्रसन्न वेळीं तुकोबाच्या एखाद्या गोड अभंगाची जीवाला मिठी पडते, तर चहाच्या वेळीं वृत्तपत्र आलें नाहीं तर कसें चुकल्याचुकल्यासारखें वाटतें! आपल्या नित्य व्यवसायाला उपयुक्त अशी निर्जीव आंकडेमोडहि आपण कष्टाने जमवीत असतों, तर इच्छा नसतांनाही मित्रांच्या आग्रहाखातर एखाद्या चित्रपट-गृहांत जाऊन बसण्याची पाळी आपल्यावर कित्येकदा येत राहते. अगदी बुद्धिवाद्यांतला बुद्धिवादी माणूस मुलीचें लग्न जमेनासें झालें की, जोतिषाला शरण जातो तर भविष्य वाचणाऱ्यांची संख्या अक्षरशः हजारोंनीच मोजावी लागेल. या भिन्नभिन्न पातळींवर आपलें मन सारखें वावरत असतें आणि त्यानुरूप साहित्याचा दर्जाहि कमीजास्त ठेवला तर त्यांत चूक आहे असें मला तरी कांही वाटत नाहीं.

अनंतराव! आपण एका संक्रमणकालांत उभे आहोंत. अशा कालांत उभे राहण्यांत लाभहि आहे आणि हानीहि आहे. कालाचा ओघ पाहून आपण आपल्या प्रयत्नांच्या दिशेंत इष्ट ते बदल केले संक्रमणकाळ हा भाग्यकाळहि ठरण्याचा संभव असतो. असे बदल न करतां जुनी चाकोरीच चालू ठेवली तर हानी अटळ असते हेंहि तितकेंच खरें आहे. हा काळाचा ओघ कोणीकडे चालला आहे? मला वाटते तो महाराष्ट्राच्या व भारताच्या विकासाकडे धांवत आहे. आपले व आपल्या नेत्यांचे प्रयत्न अपुरे आहेत, अनेकदा चुकीचेहि होत आहेत, हें खरें! पण याला उपाय नवें नेतृत्व निर्माण करणें एवढाच आहे. असें नेतृत्व खेडीं व शहरें यांच्यातून तयार होणाऱ्या नव्या सामाजिक रसायनांतून पुढे येईल अशीं चिन्हें आज दिसत आहेत. केवळ जुना सुशिक्षित वर्ग किंवा मागासलेला खेडुत समाज नव्या महाराष्ट्राची व नवभारताची उभारणी करण्यास असमर्थ आहे. दोहोंतहि परिवर्तन हवें; दोघांचाहि कायापालट हवा. असें परिवर्तन व कायापालट आज घडून येत असतांना आपण स्वस्थ राहावें हें उचित नव्हे. नवसमाजपुरुषाच्या वंदनेंत 'एक स्वर मेरा मिला दो' या भावनेने मी व माझे सहकारी या नव्या उद्योगाला प्रारंभ करीत आहोंत. विश्वास आहे की, परमेश्वर आम्हाला कांही कमी पडूं देणार नाही. कळावे.

आपला,

श्री. ग. माजगांवकर

---

अंकाची सजावट : दत्ता महाबळेश्वरकर

# पत्ररूप परिसंवादाचें अभिनव व्यासपीठ

प्रतिभेचें कांही विशेष देणें असलेल्या लेखकांचें साहित्य सर्वत्रच प्रकाशित होत असतें. परंतु सर्वसामान्य माणसाजवळहि इतरांना सांगण्यासारखें 'असामान्य' असें पुष्कळच असतें. आपल्यांतील हा 'असामान्य अंश' प्रकट करण्याचा प्रयत्न मात्र आपण नेहमी करीत राहिलें पाहिजे.

आपल्यांतील 'असामान्यत्व' प्रकट करण्यासाठी सतत धडपडणारीं 'सामान्य' माणसें हाच लोकशाही समाजव्यवस्थेचा खरा मूलाधार आहे. अशा धडपडीला प्रोत्साहन द्यावें यासाठी 'माणूस' 'पत्ररूप परिसंवाद' हें एक नवें व्यासपीठ लोकांसमोर ठेवीत आहे.

आपल्या सार्वजनिक जीवनांत उभ्या असणाऱ्या अनेकविध प्रश्नांवर सर्वसामान्य वाचकांचीं मतें पत्ररूपानें या व्यासपीठावर एकत्रित आणावीत असा या प्रयत्नामागील हेतु आहे. लोकमताचें हें दिग्दर्शन राज्यकर्त्यांना, विचारवंत मंडळींना उपयुक्त होईल असा विश्वास वाटतो.

दरमहा एक चालू महत्त्वाचा प्रश्न विचारार्थ वाचकांपुढे ठेवण्यांत येईल. त्यावर आपलें मत-प्रतिपादन करतांना कृपया खालील गोष्टी लक्षांत घ्याव्यात.

पत्रांत केवळ तक्रारींची नोंद नसावी. प्रश्नाचें गुंतागुंतीचें स्वरूप नीट ध्यानांत घ्यावें. 'आपण हा प्रश्न सोडवीत आहोंत' या जबाबदार वृत्तीनें विचार करावा. प्रचलित स्वरूपाविषयी योग्य ती टीका निर्भीडपणें करण्यास हरकत नाही. परंतु त्याबरोबरच उपाययोजनाहि सुचविण्याबाबत विचार करावा.

आपलें पत्र कमींत कमी शब्दांत तयार करून, सुवाच्य अक्षरांत, कागदाच्या एका बाजूस लिहून, प्रत्येक महिन्याच्या १२ तारखेच्या आंत आमचेकडे पाठवावें.

पहिल्या तीन क्रमांकांच्या पत्रांस अनुक्रमें रुपये पंधरा, रुपये दहा व रुपये पांच याप्रमाणे पारितोषिकेंहि दिलीं जाणार आहेत.

जुलैच्या परिसंवादाचा विषय :

निवडणुकीसाठी उभा राहणारा उमेदवार कसा असावा ?

संपादक - मुद्रक - प्रकाशक : श्री. ग. माजगांवकर ● प्रकाशन-स्थळ : राजहंस प्रकाशन, १०१५ सदाशिव, पुणें २
मुद्रणस्थळ : साधना प्रेस, ४३० – ३१ शनवार, पुणें २